
# छात्र प्रबोधन

सौर वैशाख, शके १९३३ । वर्ष ११ अंक ८
मूल्य रुपये वीस

## इतिहास विशेषांक




ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक !




इतिहासाच्या पुस्तकात आपण 'प्रबोधन' हा शब्द अनेक वेळा वाचतो. खरंतर प्रबोधन ही एक प्रक्रिया आहे. शेजारील तक्त्यात ही प्रक्रिया एका चक्राकार आकृतीत उलगडून दाखवली आहे. आकृतीतील प्रत्येक चक्राचा उर्वरित चक्रांशीसुद्धा संबंध आहे. बघा बरं येतोय का लक्षात? आकृतीशेजारी असलेल्या पिरॅमिडमध्ये प्रबोधनाच्या विविध पैलूंची मांडणी केली आहे. शिवाय खालच्या दोन चौकटीतील रंगसंगतीतून काय बरं सुचवायचं असेल?

संकल्पना – राहुल कोकीळ

(अशा 'भारतीय स्वातंत्र्य लढ्या'शी संबंधित तक्त्यांसाठी संपर्क - rahulkokil@gmail.com)

छात्र प्रबोधन
सौर वैशाख, शके १९३३ । वर्ष ११ अंक ८
(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै – ऑगस्ट १९९२) २२६ वा अंक, वर्ष १९ अंक १०

*इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात*

# अंतरंग इतिहास विशेषांक


२. संवाद – महेन्द्र सेठिया

३. कथा... आईशमनची पारध करणारा पीटर मॉल्कीन – निनाद बेडेकर

७. इतिहासाचे अवजड ओझे – सुहासिनी देशपांडे

१०. नाट्यरूपांतर... नातं की कर्तव्य? – राहुल कोकीळ

१३. उत्खननातून इतिहासाकडे – डॉ. प्रमोद जोगळेकर

१८. इतिहासात दडले भविष्य – संतोष भणगे

२०. ललित... साक्षीदार – जयश्री काटीकर

२३. प्रतापगडचे शिवतांडव – मोहन शेटे

२८. शाहिरी परंपरा – शाहीर योगेश

३०. प्रकल्पातून खरे शिक्षण... – शिवराज पिंपुडे

३३. कथा... पुराणे गाती वसुंधरेची महती – आर्या जोशी

३५. नाट्याविष्कारातून इतिहास जगा – सुचेता भालेराव

३९. इतिहासाचे मंगल 'गान' – शैलजा देशमुख

४३. जतन इतिहासाचे – अभिजित बेल्हेकर

४६. युद्धांचे प्रकार... त्यांचे अर्थ – नीलिमा वैशंपायन

४७. कर्मयोगिनी भगिनी निवेदिता – ७ – डॉ. सुरुचि पांडे

मलपृष्ठ पद्य – शतकातुनि – डॉ. स्वर्णलता भिशीकर

**याशिवाय –** तुम्हीही शोधा... (६), हे लक्षात घ्या (१७),
कविता... इतिहासाचे मनन करूया (३८),
साहस सहली, चले जाव... (४२), झलक लिपींची (४८)


**मुखपृष्ठाविषयी –** 'शाहीर' हा लोककलावंत मी या चित्रातून, त्यातील हावभावांतून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. चित्रासाठी पोस्टर कलर व फोटो इंकचा वापर करून टिंटेड पेपरवर चित्र काढलं आहे. काळ्या रेषा काढण्यासाठी जेलपेनचाही वापर केला आहे. शाहिरांच्या वेषभूषेत प्रांतानुसार पुष्कळच भिन्नता आढळते. नागपूरसारख्या काही भागात तर पायात घुंगरू घालण्याचीही परंपरा आहे.

हर्षला सावंत (चाररंगी, गुणवत्ता पुरस्कार), बांदेकर कॉलेज अपरंपरा ाईन आर्ट, सावंतवाडी रवी परांजपे अमृत महोत्सवी समिती आणि 'छात्र प्रबोधन' आयोजित मुखपृष्ठ स्पर्धा – २०१०

**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया

**कार्यकारी संपादक**
जयश्री काटीकर

**अतिथी कार्यकारी संपादक**
शिवराज पिंपुडे

**संपादक मंडळ**
महेन्द्र सेठिया
शैलजा देशमुख
नीलिमा करमरकर
दत्ता श्री. टोळ

**मुखपृष्ठ/मलपृष्ठ**
हर्षला सावंत/ सचिन जोशी

**आतील चित्रे**
अभय पुरंदरे, मंदार मराठे,
साहिल उपळेकर

**संपर्क पत्ता**
**छात्र प्रबोधन,** ज्ञान प्रबोधिनी,
५१०, सदाशिव पेठ, पुणे – 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९

**ई-मेल**
jpchhatra@rediffmail.com

**संकेतस्थळ**
www.chhatraprabodhan.org

**वार्षिक वर्गणी ₹ १८०/-**
**द्वैवार्षिक - ₹ ३४०/-**
**त्रैवार्षिक ₹ ५००/-**
**दशवार्षिक - ₹ १,५००/-**
**या अंकाची किंमत : ₹ २०**
पुण्याबाहेरील धनादेशासाठी ₹ २० जादा.
घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ४० जादा.

## संवाद

***प्रिय इतिहासप्रेमी आणि इतिहास घडवू इच्छिणाऱ्या प्रबोधकांनो,***

*'इतिहास' विषयावर तुमच्या मनात कोणत्या भावना आहेत? स्मरणशक्तीवर आधारित परीक्षांमुळे इतिहासाबद्दल निर्माण झालेली भीती आहे की, शास्त्र-गणिताच्या शाखांकडे जायचे निश्चित असताना 'इतिहास' शिकायची गरज काय, अशी मनातली शंका आहे? सनावळ्यांच्या जंत्रीत अडकलेला इतिहास वाचताना येणारा कंटाळा आहे की रुक्ष भाषेत लिहिलेल्या पुस्तकांमुळे /शिकवण्याच्या रुक्ष पद्धतीमुळे इतिहास विषयाची नावड आहे? आपल्यापैकी बहुतांश विद्यार्थी इतिहास विषयापासून २-४-८-१६ हात लांबच असतात, हो ना? पण इतिहास म्हणजे प्रेरणा मिळण्याचे/घेण्याचे ठिकाण, सार्थ अभिमान फुलविणारे स्थान, चिकित्सक अभ्यासाने गतकाळातील चुकांमधून आणि यशस्वी गोष्टींमधून शिकायची जागा. या दृष्टीने त्याकडे पाहायला लागलो तर मग इतिहासाची नावडीची, कंटाळ्याची भावना केव्हाच पळून जाईल. 'छात्र प्रबोधन'च्या 'इतिहास विशेषांका'मधून तोच प्रयत्न आहे. अगदी आपल्या कुटुंबाच्या इतिहासापासून सुरुवात करत मग आपल्या चाळीचा/सोसायटीचा, आपल्या राज्याचा-देशाचा, जगाचा, संपूर्ण मानवजातीचा आणि संपूर्ण सृष्टीचा इतिहास इथपर्यंत याची व्याप्ती आपण वाढवत जाऊ शकू. इतिहास हा निव्वळ एक विषय नसून भूतकाळातील विविध घटनांकडे बघण्याची, त्याचा चिकित्सक अभ्यास करण्याची, त्यातून शिकण्याची एक दृष्टी आहे.*

*विविध ऐतिहासिक कथा-कादंबऱ्यांपासून सुरुवात करत इतिहासाचे विश्लेषण करणारी विविध पुस्तके वाचता वाचता ही दृष्टी विकसित होत जाईल. ऐतिहासिक महत्त्व असलेल्या वास्तूंना/ किल्ल्यांना प्रत्यक्ष भेटी देऊन, तेथे जाऊन तिथला इतिहास समजून घेताना, उत्तम कथाकथन-इतिहासकथन करणाऱ्या व्यक्तींकडून ऐतिहासिक प्रसंग ऐकताना, मराठी ऐतिहासिक नाटके - चित्रपट पाहताना अंगावर रोमांच उभे राहतील. हजारो वर्षांच्या पराक्रमी परंपरेचे आपण सगळे वंशज आहोत, हा सार्थ अभिमान आपल्यातील सुप्त सामर्थ्याला हाक घालेल. इतिहासाचे विविध प्रकल्प करताना, त्यांचा नाट्याविष्कार करताना इतिहासाची गोडी अजून वाढत जाईल.*

*हे सर्व करायला उद्युक्त करणारे मान्यवरांचे विविध लेख या विशेषांकात समाविष्ट केले आहेत. ते वाचता वाचता अन् त्यात सुचविलेल्या छोट्या-मोठ्या गोष्टी करता करता तुम्हीही 'इतिहास'वेडे व्हाल असा विश्वास वाटतो; पण आपल्याला तिथेच थांबायचं नाहीये बरं का! या इतिहासातून स्फूर्ती अन् बळ मिळवत 'उद्याचा' इतिहास घडवणारे आपण व्हायला हवे आहात. आपण ज्या क्षेत्रात जाऊ इच्छितो त्या क्षेत्रात उत्तुंग पराक्रम करण्याची ऊर्मी मनाशी बाळगून, झटून कामाला लागलात तर खरोखरीच तुम्ही इतिहास घडवाल. त्यातूनच देशाचे उज्ज्वल भविष्य साकार होईल.*

*तुमच्यातील अनेक जण असे इतिहासवेडे आणि इतिहास घडवणारे व्हावेत यासाठी मनापासून शुभेच्छा!*

*मागच्या अंकातील 'संवाद'वाचून आजअखेर महाराष्ट्रातल्या ४० प्रबोधकांनी (२० जोड्या) 'जोडीकार्ये' करायला सुरुवात केली आहे. त्यातून ही सुट्टी त्यांना अधिक समृद्ध करणारी होईल. त्यांचे अनुभव पुढच्या अंकांमधून आपण वाचालच. शिवाय साहस सहलींमध्ये सहभागी होऊन ते प्रत्यक्ष ऐकताही येतील. बाकी सुट्टीत 'धमाल' करताय ना? सहली-भटकंतींमध्ये काढलेली वैशिष्ट्यपूर्ण प्रकाशचित्रे आमच्याकडे पाठवायला विसरू नका.*

**सस्नेह तुमचा,**

**(महेन्द्र सेठिया)**

---

**पानाखालच्या कालरेषेविषयी :** या कालरेषेवर इ.स.पू. ८००० ते इ. स. २००८ असा मोठ्ठा कालखंड दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. कालखंड मोठा असल्याने सर्वच घटनांची नोंद करता आलेली नाही. तरी राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, भौगोलिक दृष्टीने महत्त्वाच्या अनेक घटनांची नोंद कालरेषेवर केलेली आहे. तसेच जागेअभावी कालरेषेवर कालखंड दाखवताना प्रमाणाचा विचार केलेला नाही. तसेच इ. स. पू. घटनांचा संभाव्य कालखंड दिला आहे. सर्व पानांवरील घटना सलग वाचल्यास आपल्या उज्ज्वल इतिहासाची थोडक्यात ओळख होऊ शकेल. (कालरेषेसाठी साहाय्य - श्री. संतोष भणगे)

| सरस्वती संस्कृतीचे अस्तित्व | | मेहगृह - पहिले महानगर स्थापन |
|---|---|---|
| इ. स. पू. ८००० | कालरेषा | इ. स. पू. ६००० |



**प्रायोजक - डॉ. कीर्ती आपटे, येरवडा, पुणे ६**


# आईशमनची पारध करणारा पीटर मॉल्किन

निनाद बेडेकर

११ मे १९६०! अर्जेंटिनाची राजधानी ब्यूनस एअर्सचे उपनगर. सान फर्नांडोच्या गॅरिबाल्डी स्ट्रीटवरील वर्दळ कमी झाली होती. सायंकाळचे सात वाजून पस्तीस मिनिटे झाली होती. काळोख पडत चालला होता. जोरदार वारे वाहत होते. हवा कुंद होती. गारवाही पसरलेला होता.

रस्त्याच्या एका कडेला एक मर्सिडीज गाडी उभी होती. गाडीचे बॉनेट उघडलेले होते. कोणीतरी डोके आत खुपसून काहीतरी करीत होता. एकजण जवळच थांबला होता. त्याने केसांचा टोप घातला होता. झीरो नंबरचा चष्माही घातला होता. त्याचे नाव होते पीटर मॉल्किन! इस्राएलच्या 'मोसाद' चा तो अधिकारी होता. बॉनेटमध्ये डोके खुपसणाऱ्याचे नाव मेयर होते. दोघेही कसलेले कमांडो होते. काही अंतरावर एक क्राईस्लर उभी होती. रस्त्यातही दोन इस्राएली एजंट होते.

मर्सिडीजपासून काही अंतरावर एक बस थांबली. बसमधून 'तो' उतरला. नित्याप्रमाणे 'तो' आपल्या घराचे अंतर आक्रमू लागला. थंडीमुळे त्याने ओव्हरकोटाची कॉलर वर केली



पीटर मॉल्किन

**हिटलरच्या ज्यूद्वेषाने नाझींनी (जर्मन सैनिकांनी) लक्षावधी ज्यूंची कत्तल केली. यात आघाडीवर होता हिटलरचा एक प्रमुख अधिकारी– अ‍ॅडॉल्फ आईशमन. महायुद्धात जर्मनीचा पराभव दिसू लागताच आईशमनने जर्मनीबाहेर पळून जाण्यात यश मिळवलं. तब्बल १२ वर्षांनी इस्राएलच्या गुप्तहेर खात्याला त्याचा ठिकाणा समजला आणि सुरू झाला एक कल्पनातीत पाठलाग... एका नराधमाला पकडण्याचा... प्रतिशोध घेण्याचा...**

होती. हात खिशात घातले होते. तेवढ्यात थोडा पाऊसही सुरू झाला.

मर्सिडीजजवळून 'तो' चालत जात असताना पीटर मॉल्किनने पाठ केलेले शब्द उच्चारले, ''अन् मोमेंतिता सिन्यॉर...''

'तो' थबकला. त्याने मॉल्किनला पाहिले आणि त्याने ओळखले, काहीतरी गडबड आहे खास! आता 'तो' पळत सुटणार एवढ्यात मॉल्किनने त्याच्या अंगावर उडीच घेतली. दोघेही गडगडत रस्त्याच्या कडेला आले; पण पीटर मॉल्किनने त्याला धरून ठेवले होते. त्याच्यावरची पकड क्षणभरही ढिली झाली नव्हती. तेवढ्यात मेयरही आला. मेयरने 'त्या' चे पाय धरून ठेवले. दोघांनी मिळून 'त्या' चे मुटकुळे बांधले आणि मर्सिडीजच्या पाठीमागच्या भागात आदळले. मेयरने गाडी सुरू केली.

रस्त्यावर कोणतीही गडबड झाली नाही. मर्सिडीज शांतपणे मुक्कामावर आली. मॉल्किन आणि मेयरने 'त्या' ला आत खोलीत नेल्यावर मॉल्किनने त्याला विचारले,

''तुझे नाव काय?'' उत्तर

सिंधू संस्कृतीचे अस्तित्व — इ. स. पू. ५५०० | कालरेषा | वेदांची निर्मिती — इ. स. पू. ५०००

आले, ''रिकार्डो क्लेमंट''

मॉल्किनने परत विचारले,

''तुझे नाव काय?''

''ऑटो हेनिंजर''

मॉल्किनने परत एक प्रश्न विचारला, ''तुझा शुल्झ स्टॉफल नं ४५५२६ हाच होता ना?''

तो एकदम थबकला. गोंधळला.

विचार केल्यावर तो म्हणाला,

''नाही, ४५३२६ होता!''

''तुझे नाव काय?''

तो गप्प राहिला. मॉल्किन म्हणाला, ''तुझे नाव आता तू सांगणार आहेस का...''

''इश बिन अॅडॉल्फ आईशमन!''

उत्तर आले आणि मोसादच्या ऑपरेशन अॅटिलाचा, महत्त्वाचा एक टप्पा पूर्ण झाला.

दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनीतून पळालेल्या अनेक नाझींची पारध सुरू झाली. लक्षावधी ज्यू त्यांच्या हातून मारले गेले होते. मोठा नरसंहार झाला होता. नाझी गुन्हेगार शोधून काढून त्यांना शिक्षा देणे हे इस्राएलच्या गुप्तचर संघटनेचे, 'मोसाद' चे महत्त्वाचे काम झाले होते. हे नाझी दक्षिण अमेरिकेतील अनेक देशांत लपून बसले होते. त्यातच एक होता अॅडॉल्फ आईशमन.

मोसादच्या एका उच्च अधिकाऱ्यावर – पीटर मॉल्किनवर या अॅडॉल्फ आईशमनला शोधण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. मोसादच्या काही गुप्तहेरांनी आईशमन अर्जेंटिनामध्ये लपून बसल्याची बातमी आणली होती. पीटर मॉल्किनने सदर प्रकरणी या धाग्यावर स्वत: काम करावयाचे ठरवले.

पीटर मॉल्किन हा अधिकारी असला तरी उत्तम कमांडोदेखील होता. एकदा का कामाची जबाबदारी स्वीकारली की ती मन लावून, जिद्दीने पूर्ण करण्याची त्याची सवय होती. दहशतवाद्यां–विरुद्ध लढा कसा द्यावयाचा याबद्दलचा त्याचा अनुभव निर्विवाद होता. तो उत्तम कराटेपटू होता. वेशांतर करण्यात त्याचा हातखंडा होता. तो पिस्तुलासकट अनेक शस्त्रे चालवण्यात वाकबगार होता. शस्त्राविना झुंज घेण्याचे त्याचे कौशल्य वादातीत होते. पण त्याचा सगळ्यात मोठा गुण म्हणजे दिलेले काम तडीला नेण्याचा ! हरएक प्रयत्नाने तो आपल्याला दिलेले काम पूर्ण करीत असे. म्हणूनच त्याची निवड आईशमनला पकडण्यासाठी झाली होती.

त्याचे सहकारीही त्याला साजेसे होते– मेयर आणि अहेरन. या प्रत्येकाचे कर्तृत्व, गुण, अवगुण, आवडीनिवडी, स्वभाव एकमेकांना पुरता माहीत होता. या सर्वांचाच 'इंटलिजंट कोशंट' उच्च दर्जाचा होता. मोसादच्या कार्यालयात अॅडॉल्फ आईशमनबद्दलची माहिती या संघाला देण्यात आली. आईशमन आणि त्याने नवीन धारण केलेले नाव, त्याचे घर, नातेवाईक, त्याच्या सवयी यांची माहितीही त्यात होती.

ही सगळी माहिती अर्जेंटिनात राहात असलेल्या रिकार्डो क्लेमेंट या व्यक्तीपाशी येऊन थांबत होती. संशयाची सुई रिकॉर्डोकडेच जात होती. मॉल्किन म्हणाला,

''रिकार्डो क्लेमंट हाच 'आईशमन' असावा. त्याला पकडल्यावर ते ठरेल. पण त्याला तेथेच मारायचा नाही. त्याला तेल अवीवला आणून त्यावर खटला भरावयाचा आहे.''

आईशमनला पकडण्याचा आराखडा सुरू झाला. मोसादचा मुख्य हॅरेल आणि मॉल्किन हे ती योजना कागदावर मांडू लागले. गॅरिबाल्डी स्ट्रीटचा आभास निर्माण करून आईशमनला कसा पकडावा याचा सरावही सुरू झाला. पकडणे कदाचित सोपे होते पण त्याला अर्जेंटिनामधून इस्राएलमध्ये आणावयाचे काम मात्र अवघड होते. इस्राएलचे पंतप्रधान डेव्हिड बेन गुरियन यांना तर हे काम अशक्यच वाटत होते. पण अशक्य हा शब्द मॉल्किनच्या शब्दकोशात नव्हता.

खरेतर आंतरराष्ट्रीय नियमानुसार आईशमनला फक्त जर्मनीतच आणता आले असते; कारण त्याचे गुन्हे जर्मनीत घडले होते.

| पहिली दंतशस्त्रक्रिया झाल्याची नोंद | कालरेषा | कपिलमुनींकडून सांख्यशास्त्राची निर्मिती |
|---|---|---|
| इ. स. पू. ४९०० | | इ. स. पू. ४५०० |



प्रायोजक - श्री. अजित भिडे (इव्हेंट मॅनेजर) पुणे

इस्राएलमध्ये त्याला नेण्यास अर्जेंटिनाने परवानगी दिली नसती आणि अनेक अडचणीही आल्या असत्या, पण आईशमनला इस्राएलला आणावयाचेच असा निर्णय घेण्यात आला.

एक सुवर्णसंधी अचानक चालून आली ! अर्जेंटिनाला स्पेनपासून मिळालेल्या स्वातंत्र्याला १५० वर्षे होत असल्याने तेथे एक मोठा समारंभ आयोजित करण्यात येणार होता. या समारंभासाठी इतर राष्ट्रांप्रमाणे इस्राएललाही आपले प्रतिनिधी पाठविण्याचे निमंत्रण अर्जेंटिनाहून आले. मॉल्किन आणि कंपनीला अत्यानंद झाला. बेन गुरियनने ताबडतोब मिटिंग बोलावली. इस्राएलचे प्रतिनिधी अर्जेंटिनाच्या आनंदसोहळ्यात भाग घेण्यासाठी येतीलच आणि तेही खास विमानाने असे अर्जेंटिनाला कळवण्यात आले. आईशमनला पकडून इस्राएलला परत आणण्याच्या संपूर्ण योजनेचे नाव 'ऑपरेशन ॲटिला' ठेवण्यात आले. याबद्दल विलक्षण गुप्तता पाळण्यात आली.

त्या दिवसापासून 'रिकार्डो क्लेमंट' वरची पाळत वाढली. ही योजना यशस्वी करण्यासाठी मॉल्किन दिवसरात्र खपत होता. कष्ट, मेहनत करीत होता. जगाला हादरा देणारीच ही योजना होती.

ब्यूनस एरसच्या थोडे बाहेर एक घर भाड्याने घेण्यात आले.



आईशमनला बुलेटप्रुफ काचेच्या पिंजऱ्यात न्यायालयासमोर उभे करण्यात आले

मॉल्किन आणि कंपनी 'ॲटिला'च्या पारधीसाठी अर्जेंटिनामध्ये आली. त्यांची एखादी चूकही आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रचंड खळबळ माजवणारी ठरली असती. त्यांनी ॲटिलाचे घर, रस्ता, वार्दळ, हवामान सर्व तपासले. ११ मे १९६० हा दिवस 'ॲटिला'ला पकडण्याचा ठरला.

त्या दिवशी मोसादचा मुख्य हॅरेलने सर्वांना आलिंगन दिले. राष्ट्रकार्य करण्यासाठी सर्वच आतूर झाले होते. एकवार सर्वांनीच एकमेकांना मिठ्या मारल्या. कामाची उजळणी करून एक मर्सिडीज आणि एक क्राईस्लर घेऊन मॉल्किनचे पथक निघाले.

सायंकाळी सात वाजून पस्तीस मिनिटांनी 'ॲटिला' ला पकडण्यात आले. फारसा विरोध न करता त्याने आपण अदॉल्फ आईशमन असल्याची कबुली दिली. लक्षावधी ज्यूंना मारणारा हा क्रूरकर्मा अगदी अलगद मॉल्किनच्या हातात सापडला. 'ऑपरेशन ॲटिला' फत्ते झाले.

आईशमनने कोणताही विरोध केला नाही. इस्राएलला नेऊन त्याच्यावर खटला भरण्यात येणार असल्याचे ऐकल्यावरही त्याच्या मनात चलबिचल झाली नाही. खटल्यास तो कबूल झाला. तसा कागदही त्याने लिहून दिला.

इकडे तेल अवीवमध्ये सर्वजण जीव मुठीत घेऊन बसले होते. काय

| सूर्यग्रहणाची पहिली नोंद | | सुमेरबरोबर (प. आशियाशी) व्यापारास सुरुवात |
|---|---|---|
| इ. स. पू. ४००० | कालरेषा | इ. स. पू. ३५०० |

झाले? काय होणार? आईशमनला पकडले का? अशा प्रश्नांनी सर्वांना ग्रासून टाकले. अर्जेंटिना सरकारला याबद्दल काही कळले तर काय होईल? ते सरकार हा प्रश्न किती तडीला नेईल? अशा अनेक शंकांनी डेव्हिड बेन गुरियनपासून सर्वांना सतावले होते.

आईशमन हा आठ दिवस अर्जेंटिनामध्येच इस्राएली एजंट्सच्या कैदेत होता. त्याच्या बायकोने तो बेपत्ता असल्याची तक्रार केली का? केली तर इस्राएलचे विमान आणि आलेल्या लोकांवर पाळत अटळ होती. इस्राएलचे राजनैतिक पथक ॲबा एबनच्या नेतृत्वाखाली तेथे आले होते. हे विमान तात्काळ परत जाणार असल्याचे त्यांनी अर्जेंटिनाच्या अधिकाऱ्यांना कळवले होते. १९ मे या दिवशी आईशमनला या विमानात नेण्यात आले. जादा दारू घेतल्यामुळे तो 'नशेत' होता. अर्जेंटिनामध्ये आनंदोत्सव सुरू असल्याने या अशा क्षुल्लक गोष्टींकडे कुणी लक्षही दिले नाही.

विमान उडाले. खूप लांबचा प्रवास होता. मॉल्किन आणि त्याच्या सहकाऱ्यांच्या चेहऱ्यावर कार्यपूर्तीचा प्रचंड आनंद होता; पण तेल अवीव अजूनही दूर होते. सेनेगलमधील डकार येथे विमान इंधनासाठी थांबविण्यात आले. डकारचा विमानतळ फ्रेंच अंमलाखाली होता; पण तेथेही कोणती अडचण आली नाही. आईशमनला घेऊन विमान सुखरूप इस्राएलला आले.

दोन दिवसांनंतर, साठ लक्ष ज्यूंच्या निर्घृण हत्येला जबाबदार असणाऱ्या आईशमनला मोसादने पकडल्याची बातमी डेव्हिड बेन गुरियनने इस्राएली पार्लमेंटला दिली. इस्राएलमध्ये जल्लोष झाला.

११ एप्रिल १९६२ मध्ये आईशमनवर इस्राएलमध्ये खटला सुरू झाला. गुन्हा शाबीत होऊन १५ डिसेंबरला त्याला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. क्रूरकर्मी ॲडॉल्फ आईशमन १ जून १९६२ रोजी फासावर चढला.

आईशमनला पळवण्याचे नाट्य इस्राएलच्या ज्या राष्ट्रप्रेमी लोकांनी घडवून आणले त्यांची खरी नावे अज्ञात राहिली. पीटर मॉल्किनने 'आईशमन इन माय हॅण्ड' या नावाचे पुस्तक या घटनेनंतर तीस वर्षांनी लिहिले. त्याची आई मृत्यूशय्येवर असताना 'आईशमनला मी पकडले' असे पीटरने सांगितल्यावर तिच्या चेहऱ्यावर जो आनंद पसरला तो अवर्णनीय होता. अर्थात ही गोष्ट गुप्ततेचा भंग करणारी होती. जगाच्या इतिहासात, आईशमनला पकडून इस्राएलला नेणे ही एक अत्यंत आश्चर्यकारक गोष्ट होती. जिद्द, कष्ट, मेहनत, पूर्वतयारी, आराखडा, योजनाबद्धता, सांघिक कार्य आणि लक्ष्यवेध याचे पीटर मॉल्किन हे ज्वलंत उदाहरण आहे.

**निनाद बेडेकर**
'स्वानंद', ५ हरेकृष्ण मंदिरपथ, पुणे-१६
ninadbedekar@gmail.com

## तुम्हीही शोधा...

### विशिष्ट वर्षात, वेगवेगळ्या शतकात काय घडलं ते...

कोणतेही एक वर्ष निवडून वेगवेगळ्या शतकात त्या वर्षात कोणती महत्त्वाची घटना घडली असं शोधता येईल का? जेणेकरून १००-१०० वर्षांच्या कालावधीत कोणकोणत्या टप्प्याने बदल होत गेले हे लक्षात येऊ शकेल.

**उदाहरणार्थ -**

१९५७ - भारतीय संसदेच्या लोकसभेच्या सभागृहाची दुसरी निवडणूक
१८५७ - इंग्रजांविरुद्धचा स्वातंत्र्य संग्राम
१७५७ - प्लासीची लढाई (भारतात ब्रिटीश सत्तेचा पाया घातला गेला.)
१६५७ - छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म

| सरस्वती नदी लुप्त | कालरेषा | हडप्पा संस्कृतीचे अस्तित्व |
|---|---|---|
| इ. स. पू. २७०० | | इ. स. पू. २६०० |


प्रायोजक - श्री. निखिल रामचंद्र कात्रे, डोंबिवली

*इतिहास म्हणजे सनावळ्या, राजेरजवाड्यांच्या वंशावळ्या, लढायांच्या कारणांचा नि तहाच्या कलमांचा गुंतावळा! त्यामुळे नको तो इतिहासाचा अभ्यास! असं तुमच्यापैकी काही जणांना वाटतं ना? इतिहासाचा 'बोअर' तास मग पाठ्यपुस्तकातील तमाम ऐतिहासिक स्त्री-पुरुषांना दाढी-मिशा काढून मनोरंजक बनवण्यात तुमच्यातल्या काही जणांची प्रतिभा बहराला येते. पण खरंच इतिहास इतका बोअरिंग विषय आहे का? एखाद्या विषयाकडे पाहाण्याचा योग्य दृष्टिकोन मिळाला ना, की आपलीही दृष्टी बदलू शकते. नावडता विषय आवडता होऊ शकतो.*

# इतिहासाचे अवजड ओझे

– सुहासिनी देशपांडे



**इतिहास– मानवाची उपजत जिज्ञासा**

इतिहास ही खरेच ज्ञानाची अनावश्यक टाकाऊ शाखा आहे का? नक्कीच नाही. इतिहास ही मानवाची नैसर्गिक कुतूहलाची प्रेरणा आहे. भूतकाळाविषयी स्वाभाविक जिज्ञासेतून माणूस त्याचा शोध घेतो. इतिहास विसरणे, भूतकाळाला मूठमाती देणे मानवजातीला केवळ अशक्य आहे. आपल्या गौरवशाली उदात्त भूतकाळाचं भान माणसाला सोडता येत नाही. तसंच आपल्या अपमानाचं, अपयशाचं (विशेषतः राष्ट्रीय) शल्यही विसरता येत नाही. यातूनच नवा गौरवशाली इतिहास घडविण्याची जिद्द, प्रेरणा निर्माण होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत 'पुढच्या वर्षी नक्की जेरूसलेममध्ये..!' अशी आशादायी पण निर्धारयुक्त प्रार्थना म्हणतच जगभरातील ज्यूंनी दुसऱ्या महायुद्धानंतर इस्राएलची निर्मिती केली.

**संस्कृती आणि सभ्यता हा खरा इतिहास**

इतिहास केवळ राजकीय घडामोडी किंवा उत्तुंग व्यक्तिमत्त्वांची मिरास नाही. सामान्य मानवाने या पृथ्वीवर अवतीर्ण झाल्यापासून प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करून, निसर्गावर मात करून आपले जीवन अधिकाधिक सुखकर करण्याचा नेहमीच प्रयत्न केला आहे. गुहेत राहणारा माणूस शेती करून स्थिर झाला, घरे बांधून राहू लागला. अग्नीचा शोध लावणारा, कुंभाराच्या चाकाचा शोध लावणारा, शेतीचे प्रयोग करीत कृषिसंस्कृती निर्माण करणारा मानव आमचा पहिला शास्त्रज्ञ आहे. आज चाकावर स्वार होऊन जल-स्थल-आकाश नि अवकाशही पादाक्रान्त करणाऱ्या मानवाच्या संस्कृतीचा विकास खरोखर थक्क करणारा आहे. निसर्गाचे सर्वात दुर्बल अपत्य असलेल्या मानवाला बुद्धीचे वरदान लाभले आहे. तिच्या जोरावर मानवाने केलेला भौतिक विकास जसा लक्षणीय आहे; त्याहीपेक्षा त्याचा वैचारिक विकास मोलाचा आहे. भौतिक प्रगतीबरोबरच ईश्वरविषयक चिंतन, धर्म-तत्त्वज्ञान, नैतिक मूल्यांची प्रतिष्ठापना यांचे महत्त्व आहे. श्रीराम, श्रीकृष्ण, भगवान महावीर आणि भगवान बुद्ध, कन्फ्युशियस नि लाओत्से, सॉक्रेटिस-प्लेटो-ॲरिस्टॉटल, येशू ख्रिस्त, महात्मा गांधी या महामानवांनी मानवी संस्कृती समृद्ध केली आहे. थोडक्यात

हडप्पा संस्कृती वैशिष्ट्ये - सार्वजनिक स्नानगृह, भूमिगत गटारे, वैशिष्ट्यपूर्ण दागिने, मनोरंजनाची साधने

इ. स. पू. २५०० — कालरेषा — इ. स. पू. २४००

भौतिक प्रगतीतून बहरलेल्या मोहेंजोदडो- हडाप्पा सारख्या सभ्यता आणि वैचारिक - अध्यात्मिक विकासातून बहरलेल्या वैदिक संस्कृती सारख्या प्राचीन संस्कृतींचा प्रवास जाणून घेणे हे खरोखरच रंजक आहे.

गुहेत राहणाऱ्या नि भटकं जीवन जगणाऱ्या मानवाचा विकास कुठून कुठे कसा झाला हे जाणून घेणे जसे रंजक आहे तसेच मानवी संस्कृतीचा प्रसार जगभर कसा झाला हे जाणून घेणेही थरारक आहे. त्यामागे आदिम काळापासून मानवी समूहाचे जगाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत सातत्याने चाललेले स्थलांतर, अभिसरण हे एक महत्त्वाचे कारण आहे. आज आपण 'ग्लोबलायझेशन' ची बात करतो, परंतु द्रुतगतीच्या संचार आणि संदेशवहनाच्या युगात ग्लोबलायझेशनचे फार कौतुक करण्याचे कारण नाही. ज्या काळात माणूस अप्रगत होता; पायी चालणे, दगडाची हत्यारे वापरणे, अन्नाच्या शोधार्थ भटकणे हीच जेव्हा त्याची जीवनशैली होती तेव्हा त्या काळातील मानवी संस्कृतीचे अभिसरण पाहिले की अचंबित व्हायला होते! बेअरिंग स्टेट, स्टेट ऑफ जिब्रॉल्टर, डार्डेनल्सची समुद्रधुनी अशा अनेक मार्गांवरून मानवसमूह आणि त्याची गुरेढोरे यांची एका खंडापासून दुसऱ्या खंडाकडे जी आवकजावक चालत असे त्याचे पुरावे चकित करणारे आहेत. कुतूहल जागं होतं ते एका ठिकाणच्या वस्तू दुसऱ्या संस्कृतीत सापडतात त्यामुळे. तसेच भाषेद्वारा सुद्धा स्थलांतराचे पुरावे सापडतात. कित्येक शब्द विविध भाषांमध्ये समान आढळतात. भाषांची रचना हा आणखी एक स्थलांतरासाठीचा पुरावा. किंवा स्थळांची नावे हीही माणसाच्या स्थलांतराची दिशा निश्चित करतात. ज्या प्रदेशातून माणूस स्थलांतर करत जातो तेथील भागाला तो आपली नावे देत जातो. (हे करीत असताना अभ्यासकाची दृष्टी किती व्यापक होत असेल याची कल्पना करा! ) थोडक्यात मानवी सभ्यता आणि संस्कृती यांच्या विकासाबरोबरच त्यांच्या प्रसाराविषयी जाणून घेणे, हाही आपल्या नैसर्गिक जिज्ञासेचा भाग आहे. म्हणजेच इतिहासाची उकल करणे ही आपली उपजत प्रेरणा आहे. विविध पुरातत्व विषयक संग्रहालयांना डोळस भेटी दिल्यात तर इतिहास तुम्हाला रंजक वाटू शकेल. ऐतिहासिक वास्तू तुमच्याशी बोलू लागतील. ऐतिहासिक कथा, कादंबऱ्या तुम्हाला इतिहास काळात घेऊन जातील.

**इतिहास- स्फूर्तीचा जिवंत झरा**

इतिहास कशासाठी शिकायचा? याचा विचार केला तर तुम्हीच सांगाल की इतिहास आम्हाला स्फूर्ती देतो तसेच पूर्वजांच्या चुकांमधून सावधानतेचे इशारेही देतो! शिवरायांना जिजाऊंनी कसे घडविले हे सर्वांनाच ठाऊक आहे. केवळ रामायण महाभारतातील स्फूर्तिदायक गोष्टी सांगून ही आई थांबत नाही तर ती वेळोवेळी त्याच्याकडे आग्रह धरते आहे, हट्ट करते आहे. अफजलखानाला भेटण्यासाठी शिवाजी राजाला अनुमती देताना ती त्याला म्हणते, 'सिवबा, वडिलांचे उसने घ्यावे, संभाजीचे उसने घ्यावे! मस कुंतीचे पंक्तीस बैसवावे.' काय महत्त्वाकांक्षी आई आहे पाहा!

राणा प्रतापांचे बालपणसुद्धा रामायण-महाभारताच्या गोष्टी ऐकूनच घडले. किंबहुना राजपुत्रांच्या शिक्षणाचा हा महत्त्वाचा भाग असे. आपल्या वंशाचा सारा इतिहास, पराक्रम त्यांना सांगितला जाई. तेच त्यांचे प्रेरणास्रोत असत.

हिटलरला त्याच्या विरोधकांनी खूपच काळ्या रंगात रंगविले आहे. तथापि, हिटलरची राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम वादातीत आहे. दुसऱ्या महायुद्धात हिटलरने फ्रेंचांना अवघ्या काही आठवड्यातच पराभूत केले, आणि जर्मन नागरिकांच्या मनात खदखदत असलेल्या पहिल्या महायुद्धातील पराभवाचे, अल्सेस-लॉरेनच्या अपमानास्पद तहाचे शल्य पार धुऊन टाकले. कोम्पेन या ठिकाणी ज्या रेल्वेच्या डब्यात फ्रेंचांनी पराभूत जर्मनीवर अल्सेस-लॉरेनचा नामुष्कीचा तह लादला होता तो रेल्वेचा डबा फ्रेंचांनी आपल्या विजयाचे स्मारक म्हणून जतन करून ठेवला होता. दुसऱ्या महायुद्धात त्याच रेल्वेच्या डब्यात बसून हिटलरने फ्रेंच शिष्टमंडळाला आपल्या अटी स्वीकारण्यास भाग पाडले आणि तहानंतर जर्मन सैनिक आणि इंजिनीयर्स हर्षभराने गाणी गात गात तो रेल्वेचा डबा ढकलत, मिरवत बर्लिनला घेऊन गेले. आपल्या पराभवाचं स्मारक पुसून त्याच ठिकाणी त्यांनी आपल्या राष्ट्रीय विजयाची किंबहुना

| लोथल येथे व्यापारी जहाजे उभी करण्यासाठी गोदी | कालरेषा | ब्रह्मवादिनी गार्गी - वेदांची अभ्यासक स्त्री |
|---|---|---|
| इ. स. पू. २२०० | | इ. स. पू. २१०० |

राष्ट्रीय स्वाभिमानाची गाथा लिहिली! आपल्या राष्ट्रीय पराभवाची, अपमानाची अशुभ चिन्हे अशा रीतीने मिटवण्यासाठी राष्ट्रीय स्वाभिमान ज्वलंत, जागा असावा लागतो. भोंगळ विश्वशान्तीच्या नि विश्वबंधुत्वाच्या कल्पनांमध्ये राष्ट्रहिताला मूठमाती देणारे इतिहासात घोर राष्ट्रद्रोही म्हणूनच नोंदविले जातात. स्त्रीचा अपमान आणि राष्ट्राचा अपमान कदापि विसरता कामा नये. द्रौपदीने यासाठीच आपले केस दुर्योधन-दुःशासनांचा पराभव होईतो बांधले नव्हते. चाणक्यानेही 'धनानंदाच्या कुळाचा नाश करेतो शेंडीची गाठ बांधणार नाही,' अशी घोर प्रतिज्ञा केली होती.

इतिहास तुम्हाला हे शिकवतो. परंतु जे इतिहास विसरतात, जे स्वतःच्या सोयीनं इतिहास विकृत करतात; ते जगाच्या नकाशावरून तेजस्वी इतिहास परंपरा असलेल्या आपल्या मातृभूमीचे नाव सदासाठी मिटविण्याचे घोर पाप करतात. इतिहास जे विसरतात त्यांना इतिहास क्षमा करीत नाही. इतिहास हरविलेला मानवसमूह स्मृतिभ्रंश झालेल्या माणसाप्रमाणे दिशाहीन भासेल.

**इतिहासाचे अध्ययन-उच्च-उदात्त नीतीमूल्यांसाठी**

इतिहासातून तुम्ही केवळ स्फूर्तीच घेता असे नाही तर धाडस, शौर्य, धैर्य, क्षमाशीलता, स्वार्थत्याग, चिकाटी, कार्यनिष्ठा, प्रामणिकपणा, सेवाभाव, मानवता, अहिंसा, सत्याचा आग्रह अशी कितीतरी मूल्ये इतिहासातून आपल्यापर्यंत येतात, रुजतात. ज्यामुळे मानवी संस्कृती गौरवशाली बनते, समृद्ध बनते.

चितोडच्या स्वातंत्र्यासाठी साऱ्या राजवैभवाचा त्याग करणारा महाराणा प्रताप, सानवयातच स्वराज्याचे तोरण बांधणारा शिवबा, अवघ्या चौदाव्या वर्षी ब्रिटिशांविरुद्ध लढण्याची आणि चाफेकर बंधूंचे तेजस्वी कार्य पुढे चालू ठेवण्याची शपथ घेणारे स्वा. सावरकर, पोटच्या मुलाचा बळी देऊन राज्याच्या वारसाचे प्राण वाचवणारी स्वामिनिष्ठ आणि त्यागमूर्ती पन्नादायी, अज्ञाताच्या शोधार्थ निघालेला कोलंबस, वादळी भूशीरापर्यंत धाडसाने आलेला बार्थेलोम्यु डायज, पृथ्वी प्रदक्षिणा करणारा धाडसी मॅगेलन, क्रिमियाच्या रणांगणावर जखमी सैनिकांच्या जखमा बांधणारी फ्लॉरेन्स नाइटिंगेल... किती जणांची नावे घ्यावी?

**विशाल दृष्टी आणि उदार व सहिष्णू हृदयासाठी इतिहास**

जगाचा इतिहास अभ्यासताना आपणच काय ते महान, हा अहंकार गळून पडतो. जगाच्या कानाकोपऱ्यात एकाच वेळी विविध संस्कृतींचा बहर येणे; विविध भाषांचा विकास होणे; जगाला थक्क करणारी मंदिरे, स्मारके, पिरॅमिडस, मनोरे, पूल, संरक्षक भिंती, मूर्ती आणि चित्रकलांची अक्षरलेणी उभी रहाणे; ज्ञान-विज्ञान,कला-वास्तुकला, भाषा-साहित्य आदि क्षेत्रात जगभरातल्या मानवसमूहांनी एकाच वेळी प्रगतीची पावले टाकणे; हे पाहिले म्हणजे आपल्या संस्कृतीच्या अभिमानाबरोबरच अन्य संस्कृतींचा आदर करण्यास आपण शिकतो. आपले पूर्वग्रह गळून पडतात आणि खऱ्या अर्थाने आपण या 'वैश्विक नगरी'चे सुजाण, समंजस नि सुसंस्कृत नागरिक बनतो. आणि मानवी संस्कृतीच्या दुष्मनांबरोबर लढा देण्यासही एकजुटीने सज्ज होतो. इतिहासातून ही शिकवण आपल्याला मिळते.

त्यामुळे इतिहासाचे लेखनही वेळोवेळी व्हायला हवे, वेगवेगळ्या दृष्टिकोनातून व्हायला हवे हे मान्य. पण म्हणून इतिहासाचे विकृतीकरण, द्वेषमूलक इतिहास लेखन, प्रचारकी इतिहास कथन, सत्याचा - वास्तवतेचा अपलाप करून इतिहासात फेरफार करणे अत्यंत धोकादायक असते.

असो, इतिहास हा दीपस्तंभासारखा आहे. त्याच्या प्रकाशात वर्तमानाची वाटचाल व्हायला हवी. वर्तमानाचे आकलन इतिहासाच्या प्रकाशातच अधिक सुस्पष्टपणे होते. इतिहासाचे बोट धरूनच आपल्याला उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल करायला हवी. एका कवितेच्या या चार ओळी किती यथार्थ संदेश देतात पाहा-

**इतिहासाचे अवजड ओझे, डोक्यावर घेऊन ना नाचा**
**करा पदस्थल त्याचे आणिक, चढुनी त्यावर भविष्य वाचा!**

**सुहासिनी देशपांडे**
३, पुण्यश्री अपार्ट., डहाणूकर कॉलनी, कोथरुड, पुणे 411038
suhas2652@hotmail.com

| ज्योतिषशास्त्राचा अरबस्तान व इतरत्र प्रसार | कालरेषा | मसाल्याची निर्यात करण्यास प्रारंभ |
|---|---|---|
| इ. स. पू. १८०० | | इ. स. पू. १६०० |

# नातं की कर्तव्य?

राहुल कोकीळ



*मराठ्यांचा एक कट्टर शत्रू म्हणजे निजाम. या निजामानं १७६१ मध्ये पेशव्यांच्या अनुपस्थितीत पुण्याची लूट केली. (पुढे १७६३ मध्ये राक्षसभुवनच्या लढाईत माधवराव पेशव्यांनी निजामाचा पराभव केला.) निजामाच्या या पुणे लुटीमध्ये त्याला भीतीपोटी मदत करणारे पेशव्यांचेच काही आप्त होते. यातीलच एक म्हणजे माधवरावांचे सख्खे मामा मल्हारराव रास्ते! पुण्यात परतल्यावर 'नातं आणि कर्तव्य' या पेचात अडकलेल्या माधवरावांनी याचा निवाडा कसा केला ते समजून घेऊयात या नाट्यरूपांतरातून...*

(माधववराव दरबारात येतात.)

**भालदार :** हुजुरे आलम, रुस्तुमे दख्खन होशीयारऽऽ माधवराव पेशव्यांची स्वारी येत आहे हो ऽऽऽ

(माधवराव दरबारात येऊन बसतात. बापू, नाना फडणीस, रामशास्त्री व रास्ते मामा त्यांना मुजरा करतात. रास्ते मामा सोडून बाकी सर्व खाली बसतात.)

**बापू :** श्रीमंत आपणाला भेटावयास मल्हारराव रास्ते आले आहेत.

**माधवराव :** (शांतपणे) या ! मामा, या!! आज अचानक या भाच्याची आठवण कशी झाली? का निजामानीच आपणाला पाठवले?

**रास्तेमामा :** श्रीमंतांनी असा राग धरू नये.

**माधवराव :** (चिडून) मग इतके दिवस तुमची दरबारात हजेरी का नाही? तुम्हाला पत्र पाठवली, बोलावणी पाठवली त्याला जबाब का नाही? आणि तुम्हीच निजामाला पुणं लुटायला मदत केलीत ना?

**रास्तेमामा :** क्षमा असावी श्रीमंत. पुन्हा अशी चूक घडणार नाही.

**माधवराव :** क्षमा आणि तुम्हाला? मामा तुम्ही क्षमा करण्यासारखं काम केलंय का? तुमच्यामुळे कित्येकांचे संसार उद्ध्वस्त झाले. ते काय तुम्ही भरून देणार आहात? आपल्या दौलतीत नाना, बापू, रामशास्त्री अशांसारखी सर्वस्वाचा त्याग करणारी माणसं आहेत मामा. पण तुम्ही? तुम्ही स्वत:च्या स्वार्थासाठी स्वराज्याचाच उपभोग घेतला. असं करताना तुम्हाला काहीच कसं वाटलं नाही? तुमच्या सारख्या फितुराला

| ऋषभनाथ - पहिले जैन तीर्थंकर | | ब्राम्हणक ग्रंथांची निर्मिती |
|---|---|---|
| इ. स. पू. १३०० | कालरेषा | इ. स. पू. १२०० |

क्षमा तर लांबच तुम्हाला खरंतर सुळावरच चढवलं पाहिजे.

**रास्तेमामा :** (आवाजात जरा जोर आणण्याचा केविलवाणा प्रयत्न करत) श्रीमंतांनी किमान नात्याचा मुलाहिजा ठेवावा.

**माधवराव :** (अधिक जरबेने, एकदम उसळून) बास मामा बास! अपराध करून नात्याआड दडायचा प्रयत्न नको.

**बापू :** क्षमा असावी श्रीमंत. परंतु भूतकाळात पेशव्यांना मामांनी केलेली मदत लक्षात घ्यावी; एवढीच मामांची इच्छा असावी.

**माधवराव :** बापू, भूतकाळातली रास्त्यांची कामगिरी लक्षात घेतली म्हणून त्यांना पत्र पाठवली ! बोलावणं पाठवलं, नाहीतर...

**बापू :** नाहीतर काय श्रीमंत?

**माधवराव :** फितुरांच्या घरदारावरून गाढवाचा नांगर फिरवला जातो. फिर्याद करायलाही काही शिल्लक ठेवलं जात नाही, ही मराठ्यांची परंपरा आहे. आठवा बाजी घोरपडे, खंडोजी खोपडे यांचं थोरल्या छत्रपतींनी काय केलं ते?

**बापू :** परंतु रास्त्यांची प्रतिष्ठा व छत्रपतींबरोबर असलेले संबंध लक्षात घेऊन श्रीमंतांनी निर्णय घ्यावा.

**रामशास्त्री :** वा बापू ! (श्रीमंतांकडे वळून बघत) श्रीमंत आपण न्याय करतो आहोत का व्यापार, असा प्रश्न पडावा असं वातावरण आहे. साक्षात पेशव्यांचे कारभारीच तडजोडीची भाषा वापरतात? प्रतिष्ठा, नाती, परिणाम यांची भीती घालतात? श्रीमंतांनी न्याय करताना इतर कशाचाही विचार करू नये. नाहीतर लोक म्हणतील यापेक्षा मोगलाई बरी !

**माधवराव :** शास्त्रीबुवा, खरंय तुमचं म्हणणं ! आणि बापू ज्यांनी मराठ्यांच्या गादीची प्रतिष्ठा खड्ड्यात घातली त्यांच्या वैयक्तिक प्रतिष्ठेचा मुलाहिजा ठेवायचा? ज्यांनी निजामाला, आमच्या शत्रूला पुणं लुटायला मदत केली त्यांच्या प्रतिष्ठेची आम्ही काळजी घ्यायची? यांच्या नात्याची तुम्ही आम्हाला भीड घालता?

**रास्तेमामा :** श्रीमंत !

**माधवराव :** (मामांना उद्देशून) आठवा थोरल्या छत्रपतींचा आदर्श. आम्ही त्यांची गादी चालवतो. नसल्या भिडेला बळी पडलो तर या गादीचे वारसदार म्हणून नालायक ठरू.
(रामशास्त्रींकडे पाहून)
सांगा शास्त्रीबुवा. अगदी स्पष्टपणे सांगा. न्यायशास्त्रानुसार या प्रसंगाचा आपण निवाडा कसा करणार?

**रामशास्त्री :** श्रीमंत, रास्त्यांनी निजामाला लुटीच्या जागा दाखवल्या. त्यामुळे त्यांना दंडाची रक्कम सरकारात भरावयास सांगावी. रास्ते जोपर्यंत दंडाची रक्कम भरत नाहीत तोपर्यंत त्यांच्या मालमत्तेवर जप्ती आणली जावी.

**माधवराव :** रामशास्त्रींनी सांगितल्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

(दरबार संपल्यानंतर रास्तेमामा गोपिकाबाईंची भेट घेतात आणि त्यांना दरबारात झालेला वृत्तांत कथन करतात.)

**(प्रसंग २)**

**माधवराव :** (मुजरा करतात) आशीर्वाद द्यावा आईसाहेब, तातडीचं बोलावणं पाठवलंत?

**गोपिकाबाई :** हो ! दरबार झाल्यावर मामा आले होते.

**माधवराव :** (कपाळावर नकळत आठी येते.) बरंऽऽ! मग दरबारातला वृत्तांत आपल्याला कळलाच असेल.

**गोपिकाबाई :** त्याबद्दलच बोलायचं होतं.

**माधवराव :** बोला, तुमच्या मनात असेल ते अगदी मोकळेपणानं बोला.

**गोपिकाबाई :** मामा सांगत होते आपण त्यांना दंड केलात व घरादारावर जप्ती आणलीत म्हणून.

**माधवराव :** हो. रास्ते मामांनी निजामाला पुणं लुटायला

गंगेच्या खोऱ्यात संस्कृतीचा उदय — इ. स. पू. ११०० | कालरेषा | संस्कृत व्याकरणकार - पाणिनी — इ. स. पू. ८००

मदत केली म्हणून आम्ही त्यांना दंड केला. हे खरंय!

**गोपिकाबाई :** पण निजामच जर त्यांच्यापर्यंत जाऊन पोहोचला तर ते काय करणार? रास्ते मामा चुकले असतील. नाही कोण म्हणतं? पण ते आपले आहेत. त्यांना पश्चात्ताप झाला आहे. त्यांची चूक पेशव्यांनी पदरात घ्यावी. ज्या थोरल्या महाराजांचा दाखला तुम्ही दरबारात दिला त्यांनी नाही का चुकलेल्या नेताजी पालकरांना आपलंसं केलं? पेशव्यांनी माणसं जपण्यावर भर दिला पाहिजे. दौलतीचं अर्थकारण हे परत उभं करता येईल. पण ते उभं करण्यासाठी माणसंच नसली तर.... रास्ते, शिंदे, होळकर ही सारी थोरल्या श्रीमंतांनी घडवलेली माणसं. त्यामुळे पेशव्यांनी आपला निर्णय फिरवावा, असा आमचा आग्रह आहे.

**माधवराव :** (उपरोधिकपणे हसून) वा! आईसाहेब आपल्या बुद्धिमत्तेची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. आपण छानच युक्तिवाद लढवलात. पण सहज पदरात घ्यावी इतकी क्षुल्लक चूक केलेली नाही मामांनी!

**गोपिकाबाई :** माधवाऽऽऽ!

**माधवराव :** ज्या थोरल्या महाराजांचे दाखले तुम्ही दिलेत त्यांनी चुका माफ केल्या; पण कोणत्या तर अज्ञानातून अथवा गैरसमजुतीतून झालेल्या. स्वत:च्या स्वार्थासाठी राज्याचा वापर करू पाहाणाऱ्यांना अथवा फितुरांना महाराजांनी कधीच माफी केली नाही. उलट त्यांना कठोर शिक्षा केल्या. स्वत:च्या मामांची– मोहितेमामांची तर जहागिरी ताब्यात घेतली. माणसं जपणं हे महत्त्वाचं; पण आपलं राज्य लोकांच्या कल्याणासाठी आहे याचं भान ठेवणं, हा ही आदर्श शिवछत्रपतींचा व थोरल्या श्रीमंतांचा! राज्याची न्यायव्यवस्था ही नि:स्पृहच असली पाहिजे, याबद्‌दल आमच्याही मनात दुमत नाही.

**गोपिकाबाई :** पण एवढ्या एका बाबतीत आपण आमचं ऐकावं, असं वाटतं.

**माधवराव :** आईसाहेब आपल्यासारखा भावनेनं निर्णय घेणं, थोरल्या श्रीमंतांचा उत्तराधिकारी म्हणून आम्हाला शोभणारं नाही.

**गोपिकाबाई :** पण आम्ही मामांशी नात्यानं अन् आता शब्दानं बांधलो गेलो आहोत. या राज्यात आम्हाला एवढी तरी किंमत हवीच.

**माधवराव :** आपण व्यक्तीशी बांधल्या गेल्या आहात. आम्हाला आपला मुलगा म्हणून निर्णय घेता आला असता तर आम्ही जरूर घेतला असता पण आम्ही पेशवे आहोत. कर्तव्यांनी बांधले गेलो आहोत.

**गोपिकाबाई :** माधवा, आमचा शब्द जिथे पाळला जाणार नसेल तिथे थांबण्यात आम्हाला रस नाही.

**माधवराव :** आईसाहेब, अशा निष्ठूर होऊ नका!

**गोपिकाबाई :** मग निर्णय मागे घ्या आणि त्याची कार्यवाही थांबवा.

**माधवराव :** याबाबत आम्ही हतबल आहोत. एका मुलाच्या कर्तव्यापेक्षा पेशव्यांचं कर्तव्य मोठं आहे.

**गोपिकाबाई :** माधवा, मग आमचाही निर्णय ऐक. आम्ही शनिवारवाडा सोडत आहोत.

(हे ऐकताच माधवराव व्याकूळ होतात. त्यांच्या डोळ्यात आसवं उभी राहतात. तर इकडे गोपिकाबाईंचा चेहरा अधिकच करारी होत जातो. आपल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी त्या उठून उभ्या राहतात. माधवरावही त्यांच्या विरुद्ध दिशेला तोंड करून उभे राहतात. त्यांचाही चेहरा तितकाच करारी होतो.)

**– राहुल कोकीळ**
फ्लॅट नं. ३०२, श्रीकृपा अपार्टमेंट,
१८१९ सदाशिव पेठ, पुणे – ३०
rahulkokil@gmail.com

| बौद्धायन ऋषींनी भूमितीची ११३ सूत्रे रचली | कालरेषा | जगातील पहिले विश्व विद्यालय तक्षशिलेत स्थापन |
|---|---|---|
| इ. स. पू. ७५० | | इ. स. पू. ७०० |


प्रायोजक - स्टॅटफिल्ड इक्विपमेंट प्रा. लि., पिरंगुट, पुणे


ओरिसात चालू असलेले उत्खनन


# उत्खननातून इतिहासाकडे

**डॉ. प्रमोद जोगळेकर**

इतिहास म्हणजे आपली मुळे शोधणे आणि प्राचीन काळात काय घडले याचा मागोवा घेऊन भूतकाळात घडलेल्या घटनांचा अर्थ लावणे. मंदिरे, मूर्ती, शिलालेख, नाणी, ताम्रपट, प्राचीन ग्रंथ, किल्ले अशा अनेक गोष्टींचा वापर करून इतिहासकार इतिहास लिहितात. आपली आजची मानवजात किमान अडीच लाख वर्षे अस्तित्वात आहे. त्या तुलनेत लेखनकला ही फार अलीकडची म्हणजे गेल्या सहा ते सात हजार वर्षांमधली आहे. मेसोपोटामिया व इजिप्तमध्ये इसवीसनापूर्वी चार हजार वर्षांच्या सुमारास लेखनास सुरुवात झाली. त्याच्या अगोदर बोलीभाषेचा झालेला उगमही फारसा जुना नाही. मानवजात अन्न गोळा करून व शिकार करून जगत असताना काही लिहून ठेवायची गरज नव्हती. साहजिकच या काळातल्या मानवजातीचा इतिहास समजण्यासाठी लागणारे लेखी पुरावे आज आपल्याकडे नाहीत. याखेरीज अनेकदा लिखित इतिहास फक्त समाजातल्या आर्थिकदृष्ट्या प्रबळ, सत्ताधारी किंवा अभिजन वर्गाचा असतो. पण इतिहास म्हणजे काही फक्त राजेमहाराजे किंवा श्रीमंतांचा इतिहास नव्हे. सामान्यजनांनाही (commoners) इतिहास असतोच की! कारण तेदेखील जगत असतातच. पण अशा निनावी सामान्यजनांचा इतिहास कोण लिहिणार? लिखित स्वरूपाचे काही पुरावे उपलब्धच नसतील तर इतिहास कसा लिहिणार? असे प्रश्न आपल्याला पडतील. सामान्य जनांचा इतिहास लिहिण्याच्या कामात पुरातत्त्वविज्ञानाचा उपयोग होतो, कारण हे विज्ञान सर्वसामान्य लोकांच्या दैनंदिन वापराच्या वस्तूंचा अभ्यास करून त्यातून दिसणारा प्राचीन समाज कसा होता हे सांगते. शिवाय इतिहास फक्त माणसांचा नसून तो प्राणी, वनस्पती, पर्यावरण अशा सर्व घटकांचा असतो; आणि पुरातत्त्वविज्ञानामुळे आता आपण या सगळ्यांचा समग्र इतिहास लिहू शकतो. समग्र इतिहास लेखनाच्या बाबतीत पुरातत्त्वविज्ञानाचे हे योगदान अजोड आहे.

पुरातत्त्वीय संशोधनाची सुरुवात अर्थातच उत्खननाने होते. उत्खनन ही मोठी कष्टाची व फार चिकाटीने करायची गोष्ट असते. त्यात अनेकांचा सहभाग असतो. जमिनीच्या आत लपलेल्या वस्तू कौशल्याने बाहेर काढल्या जातात. त्या नुसत्या उकरून चालत नाहीत तर प्रत्येक वस्तूची

| सुश्रुतऋषींना विविध शस्त्रक्रियांचे ज्ञान अवगत | कालरेषा | बौद्ध धर्माचा उदय |
|---|---|---|
| इ. स. पू. ६५० | | इ. स. पू. ६०० |




**उत्तर प्रदेशात सापडलेल ४५००० वर्षांपूर्वीचा हस्तिदंत**

त्रिमित मोजमापे घेतली जातात. म्हणूनच संशोधकांचे चमू सर्वेक्षण व उत्खनन करण्यासाठी अगदी आडगावातदेखील मुक्काम ठोकतात. पुष्कळदा उघड्या माळरानावर तंबूमध्ये राहातात. काही ठिकाणी वीज व पाणी यांचीही सोय नसते. दिवसचे दिवस दररोज आठदहा किलोमीटर चालणे हे तर अपरिहार्यच असते. कडाक्याची थंडी वा रणरणते ऊन यांची पर्वा न करता उत्खननात मिळणारा पुरावा चिकाटीने गोळा करतात. या सगळ्याबद्दल संशोधकांची काहीही तक्रार नसते. उलट या निमित्ताने देशाच्या कानाकोपऱ्यात फिरून तेथील लोकांशी मिसळता येते म्हणून पुरातत्त्वज्ञ खूष असतात.

आपण आपल्या घरात अनेक वस्तू जमवून ठेवतो. अनेक वस्तू वापरामुळे निरुपयोगी होतात. आपण त्या अडगळीच्या ढिगाऱ्यात किंवा कचऱ्यामध्ये फेकून देतो. मानवी वसाहत असेल अशा सर्व ठिकाणी अशा फेकून दिलेल्या वस्तूंचे अवशेष मिळतात. काही वेळा झोपड्यांना अथवा घरांना आग लागते. दुष्काळामुळे पिके नीट येत नाहीत व पाण्याचा साठा पुरेनासा होतो. वादळामुळे किंवा भूकंपामुळे गावे उद्ध्वस्त होतात. रोगराईमुळे पाळीव व अन्य प्राणी नष्ट होतात. नद्यांना महाभयंकर पूर येतात. अशा कोणत्याही कारणामुळे एखाद्या ठिकाणी राहणे अशक्य झाल्यास वसाहत उठवून माणसे इतरत्र निघून जातात. तथापि, त्या ठिकाणी मागे राहिलेल्या वस्तू पूर्णपणे नष्ट होत नाहीत. सर्व प्रकारचा कचरा, ढासळलेल्या भिंती, शेतशिवारे या सगळ्यांवर हळूहळू मातीचे थर बसतात. मानवी वसाहतीचे अवशेष जमिनीत गाडले जातात. शेकडो, हजारो अथवा काही वेळा लक्षावधी वर्षे जमिनीखाली गाडलेल्या अवस्थेत राहिल्याने हे अवशेष सहसा पूर्ण नसतात. पुरातत्त्ववैज्ञानिकाच्या हाती येणारा पुरावा नेहमीच असा छिन्नविच्छिन्न असल्याने अक्षरश: मिळेल त्या प्रत्येक छोट्या वस्तूचा न कंटाळता अभ्यास करावा लागतो. अर्थातच विज्ञानाच्या वेगवेगळ्या शाखांमधील तंत्रज्ञानाची व ते वापरणाऱ्या तज्ज्ञ व्यक्तींची मदत या कामासाठी घेतली जाते. यासाठी वस्तुनिष्ठ व तर्कशास्त्रीय कसोट्यांचा वापर केला जातो. आधुनिक वैज्ञानिक पद्धतीनुसार गृहितके मांडली जातात व त्यांची साधकबाधक चर्चा करून मगच अनुमाने काढली जातात. अर्थातच त्यामुळे आधुनिक पुरातत्त्वीय संशोधनाचे स्वरूप बहुविद्याशाखीय (multi-disciplinary) झालेले आहे. पुरातत्त्वीय संशोधनासाठी पुरातत्त्वीय भूशास्त्र (Geoarchaeology), पुरातत्त्वीय वनस्पतिशास्त्र (Archaeobotany), पुरा-परागविज्ञान (Palaeopalynology), पुरातत्त्वीय प्राणिशास्त्र (Archaeozoology), पुरातत्त्वीय रसायनशास्त्र (Archaeological chemistry), दूरसंवेदन (Remote sensing) आणि पुरातत्त्वीय संगणकविज्ञान (Archaeological computing) अशा अनेक वैज्ञानिक शाखांचा उपयोग केला जातो.


मानवाने सुमारे आठ ते नऊ हजार वर्षांपूर्वी शेतीला प्रारंभ केला. या काळापासून आपल्याला प्राचीन वसाहतींमध्ये निरनिराळ्या प्रकारच्या वनस्तींच्या बिया मिळतात. पुरातत्त्वीय स्थळांमध्ये धान्याचे अवशेष पुष्कळदा जळालेल्या अवस्थेत मिळतात. अवशेष फार काळजीपूर्वक जमा करून सूक्ष्मदर्शकाचा वापर करून तपासले जातात. या अभ्यासातून प्राचीन काळातील आहाराविषयी अतिशय उपयुक्त माहिती मिळते. उदाहरणार्थ उत्तर प्रदेशात चोपनो-मंडो या

**वर्धमान महावीर - जैन धर्माचा प्रसार** | **कणाद मुनींनी परमाणूचा शोध लावला**

**इ. स. पू. ५४०** | कालरेषा | **इ. स. पू. ४५०**

मध्याश्मयुगातील (इसवीसनपूर्व सुमारे आठ हजार वर्षे) ठिकाणी केलेल्या उत्खननात रानतांदुळाचे अवशेष आढळले आहेत. तर संत कबीरनगर जिल्ह्यातील लहुरादेवा या नवाश्मयुगीन स्थळात माणसाळवलेल्या भाताचे इसवीसनपूर्व सहा हजार वर्षे जुने अवशेष मिळाले आहेत. यावरून गंगेच्या खोऱ्यात इसवीसनपूर्वी सुमारे सहा हजार वर्षे आधी तांदुळाचा (Oriza sativa) आहारात समावेश असावा असे दिसते. भारतीय उपखंडात गहू पश्चिम आशियातून आला. बलुचिस्तानमधे मेहेरगढ (आता पाकिस्तानात) या ठिकाणी इसवीसनपूर्वी सुमारे सहा हजार वर्षे वयाच्या थरांमधे आईनकॉर्न (Triticum monococcum) व इम्मर (Triticum dicoccum) या गव्हाच्या जातींचे दाणे मिळाले आहेत. यानंतरच्या काळात एम्मर जातीच्या गव्हाचा आणि इतर कोणत्या तरी रानटी जातीच्या गवताचा संकर होऊन सहज मळणी करता येईल अशी गव्हाची जात तयार झाली. मेहेरगढ या ठिकाणी गव्हाबरोबरच बार्लीच्या (Hordeum vulgare) अनेक उपजातींचे अवशेष आढळले आहेत. गव्हाचा वापर होण्याआधी दीर्घकाळ रोटी बनवण्यासाठी बार्लीचा उपयोग केला जात असे. भारतात अनेक धान्ये आफ्रिकेतून इतिहासपूर्व काळातच आलेली आहेत. उष्ण हवेत व अत्यंत कमी पावसाच्या प्रदेशातील महत्त्वाचे पीक असलेली ज्वारी (Sorghum vulgare), बाजरी (Pennisetum typhoides) व नाचणी (Elusine coracana) ही त्यातील काही उदाहरणे आहेत. तर तूर (Cajanaus cajanus) चा उगम भारतातच झालेला असून तुरीचे मूळ कजानस कजानिफोलिया (Cajanaus cajanifolia) या ओरिसा व बस्तरमधे आढळणाऱ्या रानजातीमधे आहे.


एखादे पुरातत्त्वीय उत्खनन करताना भांड्यांचे तुकडे आणि सगळीकडे पडलेली हाडे या दोन गोष्टी ठळकपणे दिसतात. प्राचीन मानवी वसाहतींच्या ठिकाणी चाललेल्या उत्खननातून मिळालेल्या सांस्कृतिक अवशेषांमधे प्राण्यांचे अवशेष सर्वात जास्त प्रमाणात आढळतात. याचे मुख्य कारण म्हणजे वनस्पतींप्रमाणे



**श्रीलंकेत सापडलेले इ.स.पू. तिसऱ्या शतकातील हाडांचे अवशेष**

मानवी जीवनामधे प्राणी हे नाना प्रकारे उपयोगी पडत असतात. माणसाची अन्नाची गरज भागवणे हा तर प्राण्यांचा सर्वात महत्त्वाचा उपयोग आहेच. पण त्याशिवाय मानवी जीवनात प्राणी वेगवेगळ्या अनेक भूमिका करतात. सर्व प्रकारच्या प्राण्यांच्या शरीराचे अवेशष उत्खननात निरनिराळ्या स्वरूपामध्ये सापडतात. काही जळालेले असतात तर काही अवशेषांवर कापल्याच्या खुणा आढळतात. बहुसंख्य वेळा प्राणी-अवशेष तुटक्याफुटक्या अवस्थेत असतात. जमिनीत गाडलेल्या अवस्थेत काही काळ राहिल्यावर प्राण्याच्या शरीरात असलेल्या मऊ भागांचा बहुतेक वेळा नाश होतो. फक्त हाडे, दात, शंखशिंपले व शिंग हे कठीण भाग टिकू शकतात. त्यांच्या स्वरूपातही कालानुसार बदल होतात. एकेकाळी जिवंत असणारा प्राणी मृत होतो अथवा माणसांनी मांस खाल्ल्यावर उरलेले भाग फेकून दिल्याने प्राण्यांची हाडे व दात जमिनीच्या थरांमधे समाविष्ट होतात. पुरातत्त्वीय स्थळाच्या ठिकाणी मिळालेल्या प्राणी-अवशेषांचा वापर करून, माणूस व प्राणी यांच्यामधील सहसंबंधाचा अभ्यास पुरातत्त्वीय प्राणिशास्त्रात (Archaeozoology) केला जातो. प्राचीन काळातल्या प्राण्यांमधे काही जैविक अथवा आनुवंशिक बदल घडले होते का याचा अधिक तपशिलात जाऊन मागोवा घेतला जातो. उत्तर प्रदेशात दमदमा या मध्याश्मयुगीन स्थळी

| चाणक्य व चंद्रगुप्ताने नंद साम्राज्याचा शेवट केला | | नालंदा विश्वविद्यालयाची स्थापना |
|---|---|---|
| इ. स. पू. ४०० | कालरेषा | इ. स. पू. ३५० |



झाडाच्या खोडावरील वृद्धीवलये

एखादी घटना कधी घडली हे कळणे इतिहास लेखनासाठी अत्यंत महत्त्वाचे असते. कालमापनासाठी म्हणजेच अभ्यासासाठी निवडलेले पुरातत्त्वीय स्थळ किती जुने आहे हे ठरवण्यासाठी अनेक वैज्ञानिक पद्धती उपलब्ध आहेत. उत्खनन करताना कोळशाचे छोटे तुकडे मिळतात. या तुकड्यांमधील कार्बन - १४ या समस्थानिकाच्या प्रमाणावरून त्याचे वय काढले जाते. या कामात किरणोत्सर्गाशी संबंधित विज्ञानाचा उपयोग होतो. ज्या ठिकाणी कोळसा मिळत नाही अशा वेळी युरेनिअम-थोरीअम व तप्तदीप्तीमापन (Thermo-luminance) अशा इतर पद्धती वापरल्या जातात. या सर्व पद्धतींद्वारे करण्यात येणाऱ्या कालमापनात इतर कोणत्याही वैज्ञानिक पद्धतींप्रमाणे काही प्रमाणात फरक पडणे (error) अपेक्षितच असते. पण संख्याशास्त्राचा उपयोग करून या त्रुटींवर मात केली जाते.

उत्खननात इसवीसनपूर्व सुमारे चार हजार वर्षे एवढे जुने एक हाड मिळाले. ते छोट्या आकाराच्या डुकराच्या एका प्रजातीचे (Sus salvinus) आहे. ही प्रजात या ठिकाणापासून पाचशे किलोमीटर अंतरावरील तराईच्या जंगलात आढळते. याचा अर्थ असा की प्राचीन काळात माणसांनी ही डुकरे मुद्दाम कशासाठी तरी गंगेच्या खोऱ्यात आणली होती.

पुरातत्त्वीय संशोधनात भौतिक विज्ञानाच्या अनेक शाखांचा वापर केला जातो. आज आपण अवकाशात अनेक दूरसंवेदी उपग्रह (Remote sensing satellites) पाठवले आहेत. हे उपग्रह पृथ्वीभोवती फिरून त्यांच्यावरच्या डिजीटल डोळ्यांनी भूपृष्ठाकडे नजर ठेवतात. या तंत्रज्ञानात आपण भारतीय आघाडीवर आहोत. अवकाशाशी संबंधित विज्ञानाचा पुरातत्त्वाशी काय संबंध असे वाटू शकेल. पण दूरसंवेदी उपग्रहांनी पाठवलेल्या प्रतिमांचा वापर करून पुरातत्त्वीय स्थळांचा शोध घेता येतो आणि आजूबाजूच्या भूरूपांमध्ये (Land-forms) काही फरक पडला आहे का ते बघता येते.

फार प्राचीन काळापासून लाकूड ही माणसाच्या जीवनातील एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. इंधन म्हणून, घर -निवारा उभारण्यासाठी, आधाराची काठी म्हणून, धनुष्यबाणासारखी हत्यारे तयार करण्यासाठी, पुतळे किंवा तत्सम वस्तू बनवण्यासाठी, खेळणी व मूर्ती तयार करण्यासाठी, लाकडी भांडी व ढोल बनवण्यासाठी अशा कितीतरी प्रकारे लाकडांचा वापर जगात सर्वत्र हजारो वर्षे चालू आहे. लाकूड म्हणजे वृक्षांच्या अवयवांमधील कठीण भाग. कठीणपणाच्या या गुणधर्मामुळेच तर लाकडाचे हे असे नानाविध उपयोग होतात. कठीण भागाची वाढ झाडांमध्ये विशिष्ट प्रकारे होते व त्यातून वृद्धीवलये (growth rings) तयार होतात.

| सम्राट अशोकाची कारकीर्द | | पतंजलींनी योगसूत्रे रचली |
|---|---|---|
| इ. स. पू. ३०० | कालरेषा | इ. स. पू. २०० |

वृद्धीवलये म्हणजे कमी-अधिक घनता असणाऱ्या वलयांची एक मालिका असते. ते झाड जिवंत असेपर्यंत म्हणजे ते झाड कापले जाईपर्यंत अथवा नैसर्गिकरित्या मृत होईपर्यंत अशी वलये तयार होत जातात. साहजिकच झाड खूप वयस्कर असल्यास त्याच्या बुंध्यात जास्त वलये आढळतात. प्रत्येक वलयाची अथवा वर्तुळाची जाडी वेगवेगळी असल्याने अशी वर्तुळे सहज वेगळी दिसतात. कोणत्या ऋतूमध्ये आणि कोणत्या हवामानात नेमके किती जाड वलय तयार होते याचे मापन केले जाते. यामधून मांडलेल्या सूत्राचा उपयोग करून पुरातत्त्वीय अवशेषांच्यामध्ये मिळालेल्या लाकडाच्या प्राचीन नमुन्याचे वय ठरवता येते. हे वय ठरवण्यासाठी अर्थातच वैज्ञानिकांनी झाडांच्या वाढीचा वेग आणि दीर्घकाळ जगणाऱ्या वृक्ष प्रजातीचा अतिशय सखोल अभ्यास करून गणिती व संख्याशास्त्रीय पद्धती विकसित केलेल्या आहेत. वृक्षवलय मापनासाठी सर्व प्रकारच्या झाडांचा उपयोग करता येत नाही. ही पद्धत यशस्वी ठरण्यासाठी झाडांमध्ये काही विशिष्ट गुणधर्म असावे लागतात. वाढीच्या या गुणधर्माचा उपयोग करून प्राचीन काळातल्या अवशेषांचे वय निश्चित करता येते. या पद्धतीला वृक्षवलय कालमापन (Dendrochronology) असे म्हणतात.

अशाप्रकारे उत्खननातून इतिहासाकडे जाण्याचा प्रवास खूपच मोठा असतो हे लक्षात येईल. कारण मिळालेल्या वस्तूचा (पुरावशेष) अर्थ कसा लावायचा यासाठी कोणी काही लिहून ठेवलेले नसते. म्हणून अनेक वैज्ञानिक पद्धतींचा उपयोग केला जातो. मिळालेल्या प्रत्येक छोट्या तुकड्याचा वापर करून अतिप्राचीन काळात माणसे कशी जगत होती, त्यांचे रीतिरिवाज कसे होते, ते काय खातपीत होते आणि त्यांचे एकूण सामाजिक जीवन कसे होते याचा उलगडा केला जातो. रहस्यमय कादंबऱ्यांमधले गुप्तहेर जसे बारीकसारीक आणि सूक्ष्म पुराव्यांवरून गुन्हा शाबीत करतात; एक प्रकारे पुरातत्त्व संशोधकही तसेच प्रत्येक वस्तूची बारकाईने तपासणी करतात. म्हणूनच पुरातत्त्वीय संशोधनाच्या बाबतीत सुतावरून स्वर्ग गाठणे ही म्हण अक्षरश: खरी आहे.

**डॉ. प्रमोद जोगळेकर**
पुरातत्त्व विभाग, डेक्कन कॉलेज, पुणे
pramjog@gmail.com

## ...हे लक्षात घ्या

दोन राष्ट्रात युद्ध होते ते एक तर राज्य विस्तारासाठी किंवा आपल्यावर केलेले दुसऱ्या राष्ट्राचं आक्रमण परतवून लावण्यासाठी; आपल्या सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी ! अर्थातच युद्धात एक राष्ट्र जिंकते व एक हरते. तेव्हा जिंकलेले राष्ट्र (जेते राष्ट्र) हरलेल्या राष्ट्रावर (जीत राष्ट्रावर) काही अटी लादते. त्याला तह असे म्हणतात. तुम्ही कोणत्याही कालखंडातील तहांचा अभ्यास केला तर जीत राष्ट्रावर खालील प्रकारच्या अटी लादल्या जातात असं तुमच्या लक्षात येईल. (आमचं म्हणणं नक्की तपासून बघा हं !) जेते राष्ट्र जीत राष्ट्राकडून -

* विशिष्ट भूप्रदेशाची मागणी करतात.
* युद्धखर्च म्हणून पैसा/सोने, अन्य पदार्थ मागितले जातात.
* बऱ्याचवेळा शत्रूच्या दरबारात एक वकील ठेवला जातो.
  (जेणेकरून शत्रू राष्ट्रातील अनेक घडामोडी सहजच समजू शकतील.)
* व्यापारासाठी विविध सोयीसवलतींची मागणी केली जाते.
* लष्कर कपात, शस्त्रास्त्र कपात, विशिष्ट प्रदेश निर्लष्करी करणे,
  यासारख्या अटी लादल्या जातात.

| दशांश पद्धती विकसित झाली | कालरेषा | सम्राट विक्रमादित्याची कारकीर्द |
| --- | --- | --- |
| इ. स. पू. १०० | ० | इ. स. ५० |

# इतिहासात दडले भविष्य

संतोष भणगे

''अरे अथर्व, कसला अभ्यास करतोयस? परीक्षा जवळ आली आहे बरं का !'' आईने सांगितले. ''मी इतिहासाचे पुस्तक वाचतोय,'' अथर्व उत्तरला. ''ठेव बघू ते आधी. गणित किंवा विज्ञानाचा अभ्यास करायला घे.'' आईने दरडावले. ''सारखा सारखा इतिहास वाचून काय होणार! पुढे विज्ञान शाखा घ्यायची आहे ना !'' ''पण, मला... इतिहासात करियर करायचंय !'' अथर्व पुटपुटला. हे ऐकताच अथर्वचे बाबा नाखुशीने म्हणाले, ''हे कसले भिकेचे डोहाळे? इतिहासात कसलं आलंय करियर? मास्तर किंवा प्रोफेसर फार तर खोदकाम...'' ''सांगे वडिलांची कीर्ती तो एक मूर्ख'', आजीनेही या संवादात भर टाकली.

इतका वेळ शांत बसलेले विश्वासकाका आता अथर्वच्या मदतीला सरसावले. ''करिअरचा इतका संकुचित विचार का करता तुम्ही सगळे? इतिहासाला इतकं टाकाऊ का समजता तुम्ही? इतिहास हा व्यक्तीसाठी, समाजासाठी पर्यायाने राष्ट्रासाठी एका उत्तम मार्गदर्शकाची भूमिका बजावत असतो. फक्त बघणाऱ्याला तशी दृष्टी पाहिजे.''

''विश्वास, भावनेचा विषय नको ! यात करियर काय आहे ते सांग,'' बाबांनी विचारले. ''हो तर ! अथर्व तू बस ! आणि तुम्हीदेखील समजावून घ्या. करियरच्या अनेक उत्तमोत्तम संधी व व्यवसायाच्या वेगळ्या वाटा यात उपलब्ध आहेत –

**माध्यमातील संधी :**

इतिहासाच्या पदवीधरांकडे उच्च दर्जाची वाचनक्षमता व तार्किक विचार क्षमता असल्यास प्रसार माध्यमांच्या क्षेत्रात त्यांचा जम बसू शकतो. वर्तमानपत्रात बातमीदार, स्तंभलेखक तसेच विविध चॅनेल्समधून समालोचक म्हणून संधी मिळू शकते.

**कला क्षेत्र :**

सर्जनशीलता या गुणधर्माच्या आधारावर कलाक्षेत्रात इतिहास अभ्यासक प्रचंड कार्य करू शकतो. विविध प्रकारचे माहितीपट, चित्रपट, मालिका यांचे लेखन, दिग्दर्शन , निर्मिती तसेच कला दिग्दर्शन, नेपथ्य यातही काम करू शकतो. नितीन चंद्रकांत देसाई या माणसाने या क्षेत्रात केलेलं काम आपल्यासमोर आहेच. याशिवाय ऐतिहासिक वेशभूषा निर्मिती हेसुद्धा फार मोठे क्षेत्र आहे.

**कथाकार :**

इतिहास अभ्यासाला वक्तृत्वाची जोड मिळाली तर उत्तम वक्ता, कथाकार होता येते. व्याख्याने, निरुपण, कीर्तन यांच्याद्वारे समाजप्रबोधन तर होतेच पण हे एक उत्तम व अत्यंत मान्यताप्राप्त अर्थार्जनाचे साधन नाही का? या बाबतीत स्व. राम शेवाळकर, शिवाजीराव भोसले, निनादजी बेडेकर, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे अशी अनेक नावे सांगता येतील. तसेच व्याख्यानांच्या, कथांच्या सी. डी. व डी.व्ही.डींची निर्मिती केल्यास दुधात साखर पडेल.

**साहित्य निर्मिती :**

लेखन परंपरा हा इतिहासाचा प्राण. संशोधन करून ऐतिहासिक साहित्याची – ग्रंथांची निर्मिती करता येते. तसेच महाविद्यालयीन स्तरावर इतिहाससंबंधीच्या क्रमिक पुस्तकांचे लेखनदेखील करता येते.

**प्रशासकीय क्षेत्र :**

प्रशासकीय सेवांच्या परीक्षा देण्यासाठी इतिहासाचा अभ्यास उपयुक्त ठरतो. प्रशासकीय सेवेत दाखल झाल्यावर परराष्ट्र धोरण ठरवणे, विविध अहवाल तयार करणे, विविध संस्थांच्या समन्वयाचे काम करणे अशा कामात इतिहासाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

**शिक्षण क्षेत्र :**

शाळा, महाविद्यालय तसेच विश्वविद्यालय स्तरावर आपल्याला संशोधक, साहाय्यक मार्गदर्शक, व्याख्याता, अधिव्याख्याता, प्राध्यापक होता येते. याशिवाय माध्यमिक व प्राथमिक शिक्षक हे पर्याय तर उपलब्ध आहेतच. या देशाला अशा शिक्षण तज्ज्ञांची खूप गरज आहे. कारण इतिहासच सांगतो की आचार्यांनीच देश

वैज्ञानिक नागार्जुन - विविध रासायनिक प्रक्रियांचा शोध — इ. स. १५०

बुद्धिबळाचा शोध — इ. स. ३५०

कालरेषा



पाहा... चित्रपट - वीर सावरकर

**इतिहास अभ्यासक्रमाच्या काही विशेष शाखा/विद्यापीठे/ संस्था**

1. National museum Institute of History conservation and museology. National Museum, Jan path, New Delhi - M. A. / Ph. D in museology.
2. School of Archival Studies, National Archives of India - Jan path, New Delhi.
3. Gandhinagar Rural Institute - Gandhi gram, Gujrat.
4. Osmania University, Hyderabad, Andra Pradesh.
5. Gujarat Vidyapith - Ahamdabad, Gujrat.
6. Vikram University - Ujjain, Madhya Pradesh.
7. University of Calcutta - Calcutta, West Bengal.
8. Delhi Institute of Heritage Research & Management, New Delhi.

घडविला. आचार्य चाणक्य तर तुम्हाला ठाऊक असतीलच ना?

**संग्रहालय :**

आपण विविध प्रकारची संग्रहालये पाहतो. त्या ठिकाणी व्यवस्थापक, विविध वस्तूंची माहिती सांगणारा विवेचक अशा लोकांची गरज असते. तिथेही आपल्याला संधी मिळू शकते. तसेच विविध ऐतिहासिक दृक्‌श्राव्य प्रकल्पांची निर्मिती करता येते. उदा. पुण्यातील शनिवारवाडा येथील लाईट व साउंड शो.

**पुरातत्त्व खात्यातील संधी :**

हे खाते पुरातन वास्तू शोधणे, त्यांचा कालखंड ठरवणे, उत्खनन करून नवनवीन शोध लावणे, त्यांची देखभाल करणे, जुनी लिपी वाचून त्याचे ऐतिहासिक संदर्भ ठरवणे यासारखे कार्य करते. अर्थात याठिकाणी काम करण्यासाठी पदव्युत्तर व पीएच.डी.पर्यंतचे अभ्यासक्रम पूर्ण करावे लागतात. पुरातत्त्वशास्त्राला मानववंशशास्त्र, रसायनशास्त्र, पुरावनस्पतिशास्त्र, भूगर्भशास्त्र अशा शास्त्रांचे साहाय्य आवश्यक असते. त्यामुळे या शाखांच्या पदवीधर विद्यार्थ्यांनाही पुरातत्त्व खात्यात संधी उपलब्ध असते.

**सहली व यात्रा :**

आजकाल लोकांमध्ये पर्यटनाची आवड आहे. त्यामुळे विविध सरकारी पर्यटन विभागांमध्ये संस्कृती व इतिहासाविषयी माहिती असलेले मार्गदर्शक, व्यवस्थापक यांची आवश्यकता असते. तसेच खाजगी क्षेत्रातदेखील असे अभ्यासक आवश्यक असतात. या अभ्यासकांना भारताचाच नव्हे तर जगाचा इतिहास माहीत असणे आवश्यक असते. आपणही अशा विशिष्ट सहली आयोजित करू शकता.


एवढेच नव्हे तर इतिहासासोबत तुम्हाला एखादी विदेशी भाषा जर उत्तम येत असेल तर त्या त्या भागात खूप संधी उपलब्ध आहेत. उदा. ग्रीक, लॅटीन, जर्मन, फ्रेंच इ.

थोडक्यात काय अथर्व, ज्याला या विषयाची आवड आहे आणि परिश्रम करण्याची तयारी आहे त्याने वर सांगितलेल्या क्षेत्रात पदार्पण करायला काहीच हरकत नाही. त्यामुळे नाव व कीर्तीही वाढेल. इतिहासाचार्य राजवाडे यांचे नाव आजही आपण आदराने घेतोच ना! आणि बरं का आजी केवळ वडिलांची कीर्ती सांगत हातावर हात ठेवून जो बसतो तो समर्थांच्या मते मूर्ख आहे. उलट वडिलांची कीर्ती जाणून घेऊन ती वाढवण्यातच खरे शहाणपण आहे. तुम्हाला जर हे पटत असेल तर ही अनोखी चौकटीबाहेरची वाट चोखाळण्याचा प्रयत्न करा. यश तुमच्या हातातच आहे.''

''विश्वासकाका तुम्ही मला आज खऱ्या अर्थाने आत्मविश्वास दिला.'' अथर्व.

**संतोष भणगे**
२२, योगेश्वरकृपा, आय. टी. आय. कॉलनी,
वडवली, से. अंबरनाथ पूर्व, 421501
sanbh22@gmail.com

| वैभवशाली गुप्तकाळ | कालरेषा | संस्कृत महाकवी व नाटककार - कालिदास |
|---|---|---|
| इ. स. ४०० | | इ. स. ४५० |



# साक्षीदार

जयश्री काटीकर

'इतिहास' म्हटलं की कुठलं चित्र डोळ्यांसमोर उभं राहतं तुमच्या? मला विचाराल तर 'इतिहास' म्हटलं की मी चौथीत असतानाचा एक प्रसंग राहून राहून आठवतो मला. आता तुम्ही म्हणाल इतिहासाचा आणि मी चौथीत असतानाच्या प्रसंगाचा संबंधच काय? पण मी चौथीत असतानाची गोष्ट म्हणजे माझ्या इतिहासातलीच नाही का? इतिहास म्हणजे काय केवळ राजे-महाराजांचा, भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा, फ्रेंच राज्यक्रांतीचा, मोहंजोदडो-इजिप्तमधल्या संस्कृतींचा, दोन महायुद्धांचा अन् त्यातल्या तहांचाच असावा का? असतो का? तुमचा-माझा इतिहाससुद्धा असणारच की! नव्हे तो प्रत्येकाचा असतोच असतो. पाहा बरं जरा विचार करून...

शिवाय आत्ता मी जो प्रसंग तुम्हाला सांगणार आहे तो माझ्या

| खगोलशास्त्रज्ञ वराहमिहिराने सूर्यसिद्धांत मांडला | | सम्राट हर्षवर्धनाची कारकिर्द |
|---|---|---|
| इ. स. ५०० | कालरेषा | इ. स. ५५० |


पाहा... नाटक - वीज म्हणाली धरतीला

इतिहासातला तर आहेच शिवाय आपण ज्याला 'इतिहास विषय' म्हणतो त्यातला देखील आहे.

तर मी चौथीत असतानाची गोष्ट... मला आठवतंय तेव्हा आम्हाला 'शिवरायांचा इतिहास' होता. शिवाजी महाराज आणि त्यांचे मावळे घोड्यावर बसून कुठेतरी निघालेत... वाटेत थांबून महाराज काहीतरी (बहुदा किल्लाच!) दाखवताहेत असं काहीसं चित्र होतं पुस्तकावर आमच्या! वर्गात बाई धडा शिकवत असताना 'काय बरं सांगत असतील शिवाजी महाराज मावळ्यांना?' यावर माझा खल सुरू असायचा. पुस्तकातल्या धड्यातल्या माहितीवरून किंवा बाईंनी सांगितलेल्या माहितीवरून अनेकवेळा मी त्यांच्यातला संवाद रंगवण्यात मग्न असायचो. आणि 'लक्ष कुठाय?' म्हणून बाईंची बोलणी खाल्ल्यावर इतिहासातून वर्तमानात यायचो.

पण त्या दिवशी नेमका काय गुन्हा माझ्या हातून घडला होता; नक्की आठवत नाही... शिवाजी महाराज आणि मावळे यांच्या संवादापलीकडे जाऊन हातात ढाल-तलवार घेऊन मी जणू शत्रूसैन्यावर तुटून पडलो होतो. तलवार गाजवत होतो. पण तेवढ्यात कुणाच्यातरी फंदफितुरीमुळे शत्रूसैन्याने मला कैद करावं आणि काहीही शहानिशा न करता मला कडेलोटाची शिक्षा सुनवावी; तशी अख्ख्या वर्गात बाईंनी फक्त मलाच बाकावर उभं राहण्याची शिक्षा फर्मावली होती. माझा कडेलोटच झाला होता. बाकी अख्खा वर्ग शिवाजीची गोष्ट (हो गोष्टच! धडा-बिडा नव्हताच मुळी तो !) अगदी रंगून जाऊन ऐकत होता. शिवरायांचा प्रताप, त्यांचा गनिमी कावा, शत्रूशी त्यांनी केलेले दोन हात, दिलेली कडवी झुंज... शत्रूची उडवलेली दाणादाण... अख्खा वर्ग भारावला होता ! बाईही कधी नव्हे ते रंगवून सांगत होत्या !

आणि मी? बाई कधी एकदा मला खाली बसायला सांगतायत याची वाट बघत; झालेला अपमान सहन करण्याचा आटोकाट प्रयत्न करत बाकावर उभा... अंगात वीरश्री घुमवणारा तो इतिहास आणि मी यांच्यात बाईंनी नकळत एक भिंतच उभी केली होती. आणि कितीही इच्छा असली तरी त्या इतिहासापर्यंत काही मला पोचता येत नव्हतं. आणि शिवाजीमहाराज त्या मावळ्यांना , त्या किल्ल्याबद्दल काय सांगत असतील, याचं उत्तरही काही केल्या सापडत नव्हतं.

झालं! नंतरच्या काळातले माझे आणि इतिहासाचे ऐतिहासिक संबंध कसे असतील हे सांगायलाच नको. इतिहास म्हटलं की आमच्या हातात पांढरं निशाण कायमच फडकलेलं असे!

तुम्ही काहीही म्हणा पण माझ्या शालेय जीवनात कुठलाही काळ हा 'काळ' बनूनच माझ्यापुढे उभा ठाकला होता. म्हणूनच की काय या 'काळा'पासून मी दोन हात कायमच लांब राहिलेलो आहे. त्यामुळेच कदाचित काळ-काम-वेगाची गणितं माझ्याच्याने कधी सुटली नाहीत. भाषा कितीही आवडत असली तरी वर्तमानकाळ, भविष्यकाळ आणि भूतकाळ या मराठी व्याकरणावर अधिराज्य गाजवणाऱ्या घटकांबरोबर माझं कधीच मेतकूट जमलं नाही.

पुढे माध्यमिक शाळेत असतानाचा असाच एक प्रसंग इतिहास म्हटल्यावर आठवतो. 'तुम्हीच उद्याच्या इतिहासाचे साक्षीदार आहात,' हे कुणाच्यातरी भाषणातलं एक वाक्यं त्या काळात बरेच दिवस मनात घर करून होतं. शाळेत कुठला कार्यक्रम होता, वक्ते कोण होते काही काहीसुद्धा आत्ता लक्षात नाही. 'अरे जरा लक्ष द्या, गप्पा नंतर' अशी बाईंची सूचना जेव्हा 'विशेष' आवाजात ऐकू आली. तेव्हा जे ऐकलं तेच हे वाक्य... 'तुम्हीच उद्याच्या इतिहासाचे साक्षीदार आहात!' वा ! मी भलताच खूष झालो या वाक्यावर. भन्नाटच वाटलं एकदम! इतिहासाचे साक्षीदार? तो कसा असतो? लगेच बॅकग्राऊंडला घोड्यांच्या टापांचा टॉकटॉक

| कैलास लेण्यांची निर्मिती | कालरेषा | पहिला भास्कर - पृथ्वी परिक्रमेचा काळ शोधला |
|---|---|---|
| इ. स. ५७५ | | इ. स. ६०० |

आवाज ऐकू येऊ लागला. अंगात एकदम वीरश्री संचारल्यासारखं वाटू लागलं. शिवाजी महाराजांच्या मावळ्यांच्या ताफ्यातल्या घोड्यावर मीही मांड टाकली. साक्षात महाराज 'त्या' किल्ल्या- बद्दल काय बोलतायत ते मला ऐकू येतंय असाही मला भास होऊ लागला.

छे छे ! काहीही बोलतात ना हे वक्ते, असंही वाटून गेलं. म्हणे इतिहासाचे साक्षीदार! आता त्यासाठी भूत होऊन मागच्या काळात जाणंच तेवढं बाकी राहिलं! छे ! काहीच कळेनासं झालं. तो इतिहास, ते भाषण सगळंच पाच फुटांवरून गेलं. पण मग त्यांच्या बोलण्यातला हा 'उद्या' काही स्वस्थ बसू देईना. उद्याच्या इतिहासाचे साक्षीदार? म्हणजे? इतिहास कालचा असतो की उद्याचा? भविष्यातल्या भुताने वर्तमानातल्या मलाच गिळून टाकले! आता आता कुठे ती काळ-काम-वेगाची गणितं सुटायला लागली होती तर तेवढ्यात भूत-भविष्य-वर्तमानाचा डोक्यात चक्काजाम झाला.

मी जाऊन थेट माझ्या आवडत्या मराठीच्या बाईंपुढे उभा राहिलो. म्हणालो,

''बाई, इतिहास घडून गेलेल्या काळाचा असतो ना? मग त्या काळात जाऊन आपण त्याचे साक्षीदार कसे होणार? आणि इतिहास उद्याचा असला तर आज तो 'उद्याहास' होईल, इतिहास कसा होणार?''

माझ्या मनातला चक्काजाम मी बाईंना सांगितला. कालच्या भाषणाचा संदर्भही सांगितला. बाई हसल्या. म्हणाल्या,

''अरे बरोबर. इतिहास म्हणजे घडून गेलेल्या गोष्टी. वर्तमानातून अलगद निसटून भूतकाळात गेला की तो काळ झालाच इतिहासजमा! मग हा काळ १२०० वर्षांपूर्वीचा असेल, कालचा असेल किंवा १२ सेकंदांपूर्वीचा असेल.

काल पाहुणे बोलताना हेच तर उलगडून सांगत होते; तुम्ही उद्याच्या इतिहासाचे साक्षीदार केव्हा व्हाल जेव्हा 'आज' तुम्ही लक्षपूर्वक, डोळसपणे, भरभरून जगाल! स्पर्श, रूप, रस, गंध, श्रवण या आपल्या संवेदनांमधून आपलं जगणं अधिक सजग, अधिक समृद्ध कराल ! आता असं बघ, कालचं, पाहुण्यांचं भाषण जर तू लक्ष देऊन ऐकलं असतंस तर त्यांचं बोलणं तुला नीट कळलं असतं. काल तू तो अनुभव प्रत्यक्ष घेत होतास. म्हणजे तू त्या कार्यक्रमाचा साक्षीदारच होतास की! आणि ते भाषण आज इतिहासजमा झालंय...''

बाई अजूनही खूप काही बोलत होत्या... बरंचसं कळत होतं; बरंचसं नव्हतंही...

...माझ्या पुस्तकावरच्या आवडत्या चित्रातला शिवाजीमहाराज आणि मावळ्यांतला तो संवाद म्हणजे खरंच घडला होता तर! छे! तेव्हाच कुणी साक्षीदार म्हणून पुढं येऊन लिहून वगैरे का ठेवला नाही तो संवाद? मला तो आज जसाच्या तसा वाचता नसता का आला?

'कालचं भाषण आपण नीट ऐकायला पाहिजे होतं' ही रुखरुख मात्र वाटत होती... 'इथून पुढं कुठलंही व्याख्यान लक्षपूर्वक ऐकायचंच...' माझा निर्धार झाला.

असे काही - बाही विचार मनात घोळत आणि घोळ करतच राहिले.

पुढे वर्गात एकदा मराठीच्या पुस्तकातली 'आज्ञापत्रे' शिकवताना बाई 'बखरी' बद्दल सांगत होत्या. (लक्षपूर्वक ऐकण्याच्या निर्धाराचा मला आता फायदा होत होता.) 'युरेका युरेका' म्हणून मला ओरडावंसं वाटलं एकदम! शिवाजी महाराजांच्या काळाच्या 'साक्षीदार'असणाऱ्या या बखरी मला एकदम जवळच्या वाटू लागल्या !... तो संवाद आता मला कळेल असा विश्वास वाटू लागला...


इतिहासाच्या या साक्षीदाराचा खराखुरा, प्रामाणिक, प्रत्यक्ष अनुभव आपण वाचला. तुमचा काय अनुभव आहे?

**जयश्री काटीकर**
बी-८, शिवामृत सहकारी गृहरचना,
आनंदनगर, सिंहगड रस्ता, पुणे 411051
jayakatikar@gmail.com

**आद्य शंकराचार्यांनी वैदिक धर्माची पुन:स्थापना केली** — **इ.स. ७५०**

**कालरेषा**

**कालव्यांद्वारे जलसिंचन पद्धतीस सुरुवात** — **इ.स. ९००**



# प्रतापगडचे शिवतांडव

मोहन शेटे

*साप विखारी*
*देश जननीचा घे याया चावा।*
*अवचित गाठुनि, ठकवुनि,*
*भूलवुनि कसाही ठेचावा ।।*

*शिवरायांच्या युद्धनीतीचे किती प्रत्ययकारी वर्णन स्वा. सावरकरांनी या पंक्तीत केलंय. प्रतापगडावरील अफजलखानाशी झालेले युद्ध हा आपणा सर्वांच्या परिचयाचा प्रसंग! पण त्या एका प्रसंगातही राजांच्या रणनीतीचे सम्यक दर्शन कसे घडते, याचा परिचय करून घेणं मनोरंजक ठरेल.*

शिवाजी राजांनी साधारणपणे १६४५ पासून उघडपणे स्वराज्य प्राप्तीचे प्रयत्न सुरू केले. त्यांच्यावर पहिले आदिलशाही आक्रमण आले ते १६४८ मध्ये. सरदार फत्तेखान चालून आला. पण पुरंदरच्या पायथ्याशी राजांनी त्याचा पराभव केला. त्या नंतरचे मोठे आक्रमण म्हणजे १६५९ मधले अफजलखानाचे. या दोन युद्धांमध्ये अकरा वर्षांचे अंतर आहे. त्याआधी १६५६ मध्ये राजांनी जावळी घेतली. कोकणात स्वराज्याची पायाभरणी केली होती.

याशिवाय प्रवास करून पुढील पराक्रमाची कर्मभूमी ठरेल असा भूगोल समजावून घेणे, बारा मावळातील अठरापगड जातींशी संपर्क साधून त्यांना आपल्या कार्याची माहिती व महती सांगणे, आदिलशाही दरबारात हेरगिरी करून पुढील संघर्षाचे आडाखे बांधणे; हे देखील त्यांनी केले असणार.

राजांनी मोऱ्यांच्या ताब्यातील जावळी एका झडपेत जिंकून घेतली. त्यामुळे राजांचा प्रदेश वाढला, जावळीचा घनदाट जंगलांनी आणि दुर्गम पर्वतांनी युक्त असा भूभाग मिळाल्याने राजांचे सामर्थ्य वाढले. पुण्याच्या दक्षिणेला आदिलशाहीच्या दिशेने एक भक्कम पाऊल पुढे टाकले गेले. मात्र याचा अर्थ आदिलशाहीला डिवचून आक्रमण ओढवून घेतले असाही होतो. अर्थात,

कलात्मक सात मजली विहिरीचे बांधकाम - गुजराथ — इ. स. १०००
कालरेषा
भास्कराचार्य दुसरे - सिद्धांतशिरोमणी, लीलावती ग्रंथ — इ. स. १११४

येणाऱ्या आक्रमणाला टक्कर देण्याएवढी ताकद निर्माण होण्यासाठीच राजे १६५६ पर्यंत थांबले असावेत, असे वाटते.

राजे शत्रूच्या आक्रमणाला घाबरत नव्हते. हे कधीतरी घडणार होतेच. उलट 'संकटाचे रूपांतर संधीत करतो तो खरा नेता' हे राजांच्या बाबतीत पदोपदी जाणवते. भोसले घराण्याचा हाडवैरी असलेल्या पराक्रमी अफजलखानाला राजांविरुद्ध लढण्याची जबाबदारी मिळाली, हे स्वाभाविकच होते. पण खानाला भीती होती ती इथल्या दुर्गम मुलखाची.

या मुलखातून राजांना बाहेर काढण्यासाठी खानाने बरेच उपाय केले, जसे –

* तुळजापूर, पंढरपूर येथील मंदिरांचा विध्वंस.
* बजाजी निंबाळकर यांच्या धर्मांतराचा प्रयत्न.
* पुणे, सुपे, इंदापूर या राजांच्या मुलखावर ताबा मिळवून राजांवर आणलेला दबाव इ.

पण हे होत असताना राजे शांत राहिले. इथे खानाचा पहिला डाव फसला. राजे सह्याद्रीतून बाहेर आले नाहीत. उलट माघारीचे तंत्र त्यांनी अवलंबिले. यात एक धोका होता. तो म्हणजे आपल्या लोकांमध्ये भीतीची भावना निर्माण होणे. मात्र एक फायदाही होता. मंदिर विटंबना आणि धर्मांतर या मुळे हिंदू समाजात जी चीड निर्माण होणार होती त्याचा फायदा राजांना मिळणार होता.

राजे सह्याद्रीत लपून राहिले याचे आणखीही काही लाभ त्यांना झाले –

* सर्वात महत्त्वाचे म्हणजे पावसाळा आला, त्यामुळे राजांना तयारीला व रणनीती आखायला वेळ मिळाला.
* ऐन पावसाळ्यात वाईत मुक्काम करून खानाचे सैन्य वैतागले.
* मोहीम लांबल्याने विजापूर दरबारातून विचारणा होऊ शकते म्हणून पावसाळ्यानंतर तातडीने काहीतरी हालचाल करणे खानाला भाग पडले.

आता खानाने आपला तळ म्हणून वाईची निवड का केली ते बघू–

* एक म्हणजे खान वाईचा सुभेदार होता.
* दुसरं असं की खान पुण्याच्या दिशेने सरकला असता तर तो आपल्या राज्यात घुसेल या शंकेने मोगलांना राग येऊन ते शिवाजीला मदत करू शकले असते.
* आणि तिसरं म्हणजे वाईच्या दक्षिणेला अदिलशाही मुलूख असल्याने रसदीला तोटा नव्हता.खानाची ही चाल पाहाताच राजांनी आपला मुक्काम प्रतापगडावर हलवला. राजांनी प्रतापगड का निवडला? तर–
* **'शत्रू नेहमी सरहद्दी बाहेर ठेवावा'** या सूत्रानुसार खानाला स्वराज्याच्या गाभ्यापासून म्हणजे राजगडापासून दूर ठेवण्यासाठी राजे प्रतापगडावर आले. तेव्हा खानाला राजगडच्या दिशेने जाण्यात काही मतलब उरला नाही.
* उत्तरेकडून मोगल ताकद व पुण्याच्या दिशेने येणारा खान या दोन ताकदी एकत्र येऊ नयेत यासाठी राजे प्रतापगडावर थांबले. (पूर्वी अदिलशाही व मोगल यांनी एकत्र येऊन शहाजीराजांच्या वर्चस्वाखालील निजामशाही नष्ट केली होती.)

राजांनी खानाशी संघर्ष करण्याचा निर्णय घेतला; कारण भविष्यात जी उत्तुंग भरारी मारायची होती त्यासाठी व हिंदू समाजाची विजिगीषू वृत्ती जागृत करण्यासाठी सर्व शक्ती पणाला लावून यश खेचून आणणे राजांना क्रमप्राप्तच होते.


आता संघर्ष करायचा ठरल्यावर गनिमी काव्याच्या तंत्राप्रमाणे **'कमीत कमी वेळ खर्च करून पूर्ण यश मिळवणे'** हे सूत्र वापरायचे ठरले.

आता जर असे यश पाहिजे तर १) शत्रूला बेसावध ठेवणे आणि २) भूगोलाचा सुयोग्य वापर करणे , या दोन गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. या दृष्टीने विचार केल्यास राजांना प्रतापगडच रणक्षेत्र म्हणून योग्य वाटला. जर येथील जावळीच्या अरण्यात आपण खानाला आणू शकलो तर यश मिळू शकेल असे राजांना वाटत होते.

प्रतापगडची रणक्षेत्र म्हणून योग्यता –

* त्यावेळी राजांकडे राजगड, सिंहगड, पुरंदर असे प्रतापगडच्या तुलनेत जास्त बळकट किल्ले होते; पण

| संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली | कालरेषा | विजयनगरचे साम्राज्य स्थापन |
|---|---|---|
| इ. स. १२९१ | | इ. स. १३३६ |




**अफजलखान युद्धाचे रणक्षेत्र**

कापूरहोळला आल्यावर पुरंदर पायथा, भोरला आल्यावर राजगड पायथा व शिवापूरला आल्यावर सिंहगड पायथा गाठणे शत्रू सैन्याला काहीच अवघड नव्हते व अशा ठिकाणी वेढा घालणेही शत्रूला सहज शक्य होते. मात्र प्रतापगडच्या पायथ्याला जाण्यासाठी महाबळेश्वरचा डोंगर चढणे व उतरणे आवश्यक होते. म्हणजे शत्रू स्वत:हूनच कोंडीत सापडणार होता. तसेच प्रतापगडच्या पश्चिमेला उत्तुंग कोकण कडा असल्याने या गडाला वेढा घालणे शक्य नव्हते.

* खान जरी जावळीच्या प्रदेशाचा माहीतगार होता. तरी प्रतापगड हा राजांनी स्वत: बांधलेला किल्ला असल्याने त्याची रचना खानाला माहीत असणे शक्य नव्हते.

जावळीत जाण्याचे धोके खानाला माहीत होतेच. तरीही तेथे येण्याचा निर्णय त्याला राजांनी घ्यायला लावला. त्यासाठी राजांनी बुद्धिचातुर्याने मानसशास्त्रीय युद्धपद्धती अवलंबली.

खानाने जावळीत येण्याचा निर्णय का घेतला?

* राजांचे वकील पंताजी गोपीनाथ बोकील यांनी खानाच्या भेटीत मौल्यवान नजराणे भेट दिले. खान पैशाचा लोभी होता, भ्रष्टाचारी होता. जावळीत पैसा आहे असे वाटून पैसा लुटण्याच्या मोहाने तरी तो आत येईल असा डाव होता.
* खानाला स्वत:च्या शक्तीचा, पराक्रमाचा अहंकार होता. राजे घाबरले आहेत असे वकिलांनी नाटक केले. त्यामुळे खान गाफील राहिला. राजांना फारशी प्रतिष्ठाही नव्हती; त्यामुळे प्रतिष्ठा जाण्याचा धोकाही नव्हता. खान मात्र साऱ्या देशात दरारा असणारा सेनापती होता. तो जावळीला आला नाही तर तोच घाबरट आहे अशी प्रतिमा निर्माण झाली असती. इथे खानाची प्रतिष्ठा जाण्याचा धोका होता.
* खान पूर्वी शिरेपट्टणचा राजा कस्तुरी रंगा यावर चालून गेला होता. कस्तुरी रंगा राजा घाबरला होता तरी खानाने त्याला भेटीला बोलावून त्याचा खून केला. राजे खानाला आता तोच पूर्वीचा डाव टाकण्यास सुचवत होते व खानाला सोईची परिस्थिती निर्माण करून देत होते.
* राजांच्या दुर्गम मुलखात लढण्यापेक्षा मैत्रीपूर्ण भेट खानाला सोयीची वाटत होती.
* पंताजी सारख्या ब्राह्मणाने ईश्वराची शपथ घेतल्याने

| गुरुनानक - शीख पंथाची स्थापना | कालरेषा | हळदीघाटचा रणसंग्राम |
|---|---|---|
| इ. स. १५०० | | इ. स. १५७६ |

राजे दगा करणार नाहीत यावर खानाचा विश्वास बसला.

* आणि सर्वात शेवटी जर खानाने जावळीला न जाण्याचा निर्णय घेतला असता तर दुसरे तो काय करू शकणार होता? गेले सहा महिने राजांना बाहेर काढण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न त्याने केले होतेच की! पण जर राजे बाहेरच येत नसतील तर ते जिथे आहेत तिथे जाऊन भेटणं खानाला आवश्यकच होतं.
* शिवाय खान एकटा जाणार नव्हता. सैन्यासह जाणार होता. वेळप्रसंगी प्रतापगडावर हल्ला करून राजांना पराभूत करणे त्याला सहज शक्य होते.

या सर्व गोष्टींचा विचार करून खानाने जावळीला जाण्याचा इरादा पक्का केला.

हे रणक्षेत्र राजांच्या सोईचे होते कारण –

* राजांच्या सैन्याला हा भूगोल परिचयाचा होता. शिवाय राजांचे सैन्य महाबळेश्वर व प्रतापगडावर म्हणजे उंचीवर असल्याने शत्रूच्या हालचाली टिपणे, हल्ला करणे सोपे होते.
* जर शत्रूने अचानक हल्ला केला तर प्रतापगडाच्या मागे कोकण असल्याने पटकन पळून जाणे शक्य होते.

खानाला हे रणक्षेत्र गैरसोईचे होते कारण –

* हा दुर्गम डोंगराळ प्रदेश खानाच्या सैन्याला अपरिचित होता. पावसाने तुडुंब वाहणाऱ्या नद्या, ओढे, नाले यामुळे हालचाली करणे अवघड होते. हत्ती, घोडे, उंट, तोफा यांचा इथे फारसा प्रभाव पडणार नव्हता.
* प्रतापगड आणि महाबळेश्वरला मराठे असल्याने जावळीत येणाऱ्या शत्रूची अवस्था कात्रीच्या दोन पात्यात सापडलेल्या कागदासारखी होणार होती.

म्हणून हे रणक्षेत्र खानाच्या गैरसोईचे होते... लढाईची वेळ आली तरीही... पळायची वेळ आली तरीही.

युद्धशास्त्राच्या नियमानुसार **'जो सेनापती आपल्याला सोईच्या व शत्रूला गैरसोईच्या रणांगणात शत्रूला येण्यास भाग पाडतो तो युद्धापूर्वीच निम्मी लढाई जिंकलेला असतो.'** पालखेडला बाजीरावाने निजामाला हरवले याचे कारण ते रणांगण बाजीरावाच्या सोईचे हाते. याउलट पानिपतच्या पराभवाचे एक कारण म्हणजे ते रणांगण मराठ्यांच्या गैरसोईचे होते.

या काळात राजांना शत्रूप्रमाणे स्वकीयांकडेही बारीक लक्ष ठेवायचे होते. सर्वांची ताकद एकत्र करण्याचे प्रयत्न करायचे होते. त्यासाठी राजांनी केलेले उपाय पाहू –

* राजांनी कान्होजी जेध्यांसारखा मातब्बर देशमुख पहिल्यांदा पक्का केला. त्यांनाच अफजलखानाकडे जाण्याचा सल्ला देऊन त्यांची परीक्षा पाहिली. कान्होजींनी राजांच्या पायापाशी वतनावर पाणी सोडले आणि त्यांची निष्ठा पक्की असल्याची राजांना खात्री पटली. तसेच राजांनी कान्होजींचा कुटुंबकबिला तळेगाव ढमढेरे येथे पाठवून त्यांची काळजीही घेतली.
* अफजलखानाच्या येण्याने सर्वच देशमुख धास्तावले होते. अशावेळी कान्होजींकडून सर्वांना आवाहन केले. आणि बारा मावळातली मर्द मावळ्यांची शक्ती आपल्यामागे वळवली.
* राजांना देवीने दृष्टांत दिला ही बातमी पसरवली. त्या वेळचा श्रद्धावंत समाज विश्वासाने राजांच्या बरोबर आला. अशा वेळी रामदास स्वामी व त्यांच्या शिष्यांचीही मदत झाली असण्याची शक्यता आहे.
* एवढे होऊनही राजांनी सर्व योजनांची गुप्तता पाळली. फितुरी होऊ दिली नाही. तसेच खानाचा वकील कृष्णाजी भास्कर प्रतापगडावर आल्यावर तो कोणा सामान्य मावळ्याशी गप्पा मारणार नाही, याची दक्षता घेतली. अशी दक्षता खानाने पंताजींबाबत घेतली नव्हती.

खान जावळीत आला तेव्हा तो भेटीसाठी उतावीळ झाला होता. भेटीची जागा, वेळ व नियम हेही राजांनीच ठरवले. भेटीची जागाही वैशिष्ट्यपूर्ण होती.

भेट गडाच्या माथ्यावरही नाही आणि पायथ्याशीही नाही पण गडाच्या मध्यावर होणार होती. वरवर पाहाता हा नियम दोन्ही बाजूंना समान न्याय देणारा वाटतो पण ती जनीच्या टेंबाची जागा पाहिली की काही गोष्टी लक्षात येतात. इथे भेटीचा शामियाना उभारल्यावर काय चालले

| शिवराज्याभिषेक | कालरेषा | गुरु गोविंदसिंह - खालसा दलाची स्थापना |
|---|---|---|
| इ. स. १६७४ | | इ. स. १७०० |


पाहा... नाटक - रायगडाला जेव्हा जाग येते

आहे हे गडावरच्या मावळ्यांना दिसू शकत होते; पण जावळीतल्या शत्रूसैन्याला शामियान्यातल्या हालचाली दिसणार नव्हत्या.

**'शत्रूच्या सैन्याचे भाग पाडले तर त्यांची ताकद स्वाभाविकपणे कमी होते'**, यासाठीही प्रयत्न केले गेले-

* खानाचा अवजड तोफखाना व काही सैन्य वाईलाच थांबले. म्हणजे सैन्याचा पहिला तुकडा पडला.
* जावळीत एवढ्या (म्हणजे सुमारे तीस हजार) सैन्याला एका ठिकाणी सपाटीची जागा नव्हती. म्हणून जावळी गाव, पार गाव व अन्य वेगवेगळ्या ठिकाणी सपाटी पाहून तंबू-राहुट्या बांधल्या गेल्या. अशाप्रकारे खानाचे सैन्य अनेक तुकड्यात विभागले गेले.
* खान भेटीसाठी निघाला तेव्हा दीड हजार बंदुकधारी पठाण त्याच्या बरोबर होते. पण पंताजींनी मोठ्या चातुर्याने ते सैनिक शामियान्यापासून लांब थांबवले म्हणजे आणखी एक तुकडा पडला. आणि शेवटी खान त्याच्या दहा अंगरक्षकांसह शामियान्यात पोचला. हा शेवटचा तुकडा.

खानाला संपवण्याबरोबर त्याचे प्रचंड सैन्य पराभूत करण्यासाठी मुळात ते बेसावध ठेवणे आवश्यक होते यासाठी-

* ही भेट मैत्रीपूर्ण असल्यामुळे राजांचे लोक खानाच्या तळावर वावरत होते. स्वागत करत होते. यात खानाच्या सैन्याला काही वावगे वाटत नव्हते.
* भेटीची वेळ दुपारी एकची असल्याने भोजनानंतर शत्रूसैन्याला येणारी सुस्ती व झोप मराठ्यांना उपयुक्त ठरणार होती.
* मराठ्यांना हल्ला करण्याचा संकेत म्हणून तोफ वाजणार होती. पण ही तोफ बड्या नेत्यांच्या सन्मानासाठी आहे असे वाटून शत्रू अधिकच बेसावध होणार होता. **'संकेत एक – अर्थ दोन'** अशी ही योजना होती.

भेटीचा दिवस उगवला. १० नोव्हेंबर १६५९, मार्गशीर्ष सप्तमी. राजांनी पंताजींना सकाळपासून खानाबरोबर राहाण्यास सांगितले हे राजांचे सावधपण! राजांनी चिलखत घालून स्वत:ला सुरक्षित केले. खान लवकर येऊन शामियान्यात बसला. राजे गडावरून खाली आले. शामियान्यात सय्यद बंडा आहे असे कळल्यावर त्यास बाहेर काढण्यास सांगितले. खानाने तसे केल्यावर राजांनी शामियान्यात प्रवेश केला. त्यानंतर वाघनखं व बिचवा खुपसून केलेला खानाचा वध आपल्याला परिचित आहेच.

धावत येणाऱ्या सय्यद बंडास जिवा महालाने खलास केले. राजांनी कृष्णाजी भास्करलाही उडवले. राजांनी इशारा करताच तोफा दणाणू लागल्या. लगेचच प्रतापगड पायथ्याशी असणाऱ्या कान्होजी जेधे यांच्या व पारघाटाजवळ असणाऱ्या मोरोपंत पिंगळे यांच्या पायदळाने कूच केली. आंबेतळी घाटातून नेताजी पालकरांचे घोडदळ निघाले. जावळीच्या हिरव्या जंगलात भगव्या ज्वाला धगधगू लागल्या. थोड्या वेळात अंधार पडला. खानाच्या सैन्याची पुरती धुळदाण उडाली. याशिवाय तलवारी, ढाली, भाले, बंदुका, घोडे, तोफा हे अगणित युद्धसाहित्य राजांना मिळाले. हा फायदा मोठा होता.

लगेच दुसऱ्या दिवशी राजे मोहिमेला बाहेर पडले. त्यांनी आनंदोत्सव केला नाही की शत्रूसमोर तहाचा प्रस्तावही मांडला नाही. उलट अदिलशहाला धडका मारत राजे वादळासारखे निघाले आणि पंधार दिवसात कोल्हापूरवर भगवा झेंडा फडकवला. शिवरायांच्या दिग्विजयाने करवीर अंबाबाई प्रसन्न झाली. शत्रूच्या रक्ताभिषेकाने तुळजापूरची आदिशक्ती संतोष पावली. राजांना आसमानी फत्ते मिळाली.

या युद्धाने राजांना नवा प्रदेश मिळाला. प्रचंड युद्ध साहित्य मिळाले, दिगंत कीर्ती मिळाली. पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे या निस्तेज, आत्मविस्मृत हिंदू समाजाला उदंड आत्मविश्वास मिळाला.

ये गोष्ट सामान्य जाहली नाही!

**मोहन शेटे**
४७६, नारायण पेठ, लोखंडे तालमीजवळ, पुणे ४११०३०
mohanshete.itihaspremi@gmail.com

| प्लासीची लढाई | कालरेषा | पेशवाईचा शेवट |
|---|---|---|
| इ. स. १७५७ | | इ. स. १८१८ |

# शाहिरी परंपरा

**शाहीर योगेश**

आपल्या महाराष्ट्रात विविध लोककला प्रकार फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहेत. विविध भागात कलाकार त्या सादर करीत असतात. यातीलच एक महत्त्वाचा प्रकार म्हणजे पोवाडा!

पोवाडा म्हटला की सादर करणारा शाहीर आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो. हा शाहीर अनेक गुणांनी परिपूर्ण असावा लागतो. म्हणजे तो कवी असला पाहिजे, त्याचे शब्दोच्चार स्पष्ट असले पाहिजेत. त्याला ताल, सूर, लय यांची जाण असली पाहिजे. तसेच जो पोवाडा सादर करावयाचा आहे त्याचा सविस्तर इतिहास माहिती असला पाहिजे व त्यासाठी वाचन, मनन त्याने केले पाहिजे. जो पोवाडा सादर करावयाचा आहे तो तोंडपाठ तर असलाच पाहिजे शिवाय पोवाडा सादर करताना त्या-त्या प्रसंगाशी एकरूप होऊन त्याने सादरीकरण केले पाहिजे. शाहिराची शरीरयष्टीसुद्धा भक्कम असावी लागेल. मुख्य म्हणजे त्याचा आवाज हा पहाडी असणे गरजेचे आहे. तरच तो श्रोतृवर्गावर प्रभाव पाडू शकेल. या सर्व गोष्टी साध्य होण्यासाठी त्याला नियमित सरावाची गरज असते. शाहिराचे साथीदार व वादक हेसुद्धा तयारीचे असणे आवश्यक आहे.

सर्व लोककलांचा प्रारंभ त्या-त्या काळातील सामाजिक-राजकीय परिस्थितीत गरजेनुसार झालेला दिसतो. महाराष्ट्राच्या साहित्य- सांस्कृतिक परंपरेत संत, पंत, तंत यांनी विविध प्रकारांतून साहित्याची जोपासना केलेली आहे. संत श्रेष्ठींनी आध्यात्मिक, भक्ती रसातून जनसामान्यांचे प्रबोधन केले तर पंत कवींनी म्हणजे पंडित कवींनी पाण्डित्यपूर्ण रचनातून समाजमन सुसंस्कारित करण्याचे महान कार्य केले. तर तंत म्हणजे तंतूयुक्त वाद्यांच्या साहाय्याने या कवींनी विविध रसांच्या पोवाड्यांनी (त्यातही वीररसप्रधान पोवाड्यांनी) पौरुषत्व संपन्न, पराक्रमी, राष्ट्रप्रेमाने भारलेला समाज निर्माण करण्यात मोलाचा हाताभार लावलेला दिसतो.

'पोवाडा' या शब्दाची उत्पत्ती साधारणपणे ११९० मध्ये झालेली आढळते. पोवाडा या शब्दाचा उल्लेख प्रथम 'महिकावती'च्या बखरीत आढळतो. मुकुंदराजापासून ते संत नामदेवांपर्यंत (इ. स. ११९० ते १३५०), संत एकनाथांपासून ते संत रामदास स्वामीपर्यंत (सन १३५० ते १६५०) आणि त्यानंतर वामन पंडितांपासून ते मोरेपंतांसारख्या (१६५० ते १८१८) प्रतिभावंत कवींच्या रचनामध्ये पोवाडा या शब्दाचा उल्लेख आलेला आहे.

पोवाडा वाङ्मयाचे साधारणपणे तीन कालखंड पडतात. १) इ. स. १६०० ते १८१८ पर्यंतचा म्हणजे मराठेशाही-पेशवाई पर्यंतचा २) इ. स. १८१८ ते



बाल शाहिरांचे पथक



शाहीर कै. विठ्ठल उमप

| मराठीतील पहिले वृत्तपत्र - दर्पण सुरू | कालरेषा | पुणे येथे पहिली मुलींची शाळा सुरू |
|---|---|---|
| इ. स. १८३२ | | इ. स. १८४८ |



पाहा... चित्रपट - सरदार पटेल

स्वातंत्र्यपूर्व काळापर्यंतचा ३) आणि त्यानंतरचा वर्तमान कालखंड.

शिवकालातले आज फक्त दोनच पोवाडे उपलब्ध आहेत. १) अफजलखान वधाचा पोवाडा (प्रतापगड संग्राम) जो स्वत: शाहीर अज्ञानदासाने रचून शिवरायांसमोर सादर केला होता. २) शाहीर तुळसीदासाने रचलेला सिंहगडचा पोवाडा.

याखेरीज या काळात अन्य पोवाडे लिहिल्याची माहिती मिळत नाही. पेशवाईच्या काळात पोवाडे लिहिले गेले. परंतु त्याहीपेक्षा लावण्या जास्त प्रमाणात लिहिलेल्या आढळतात. पानिपतचे पोवाडे, निजामशाहीवरील पोवाडे, श्रीरंगपट्टणची लढाई, खर्ड्याची लढाई, नारायणराव पेशव्यांचा खून, सवाई माधवराव इ. वर पोवाडे लिहिलेलेआढळतात.

दुसऱ्या कालखंडात झाशीची राणी, तात्या टोपे, बापू गोखले यांच्यावर पोवाडे लिहिले गेले तर अस्सल इंग्रजी आमदानीत वासुदेव बळवंत फडके, चापेकर बंधू, स्वा. सावरकर, लोकमान्य टिळक, नेताजी सुभाषचंद्र बोस, भगतसिंह, महात्मा गांधी, पंडित नेहरू, नाना पाटील आदि क्रांतिकारकांवर पोवाडे लिहिलेले आहेत.

आज महाराष्ट्रात पोवाडा म्हणून आपण ज्या लोककला प्रकाराला ओळखतो तो साधारणपणे स्वा. सावरकर, महात्मा फुले, ग. दि. मा. तसेच सर्वश्री शाहीर पां. द. खाडिलकर, दीक्षित बंधू, महादेव नानीवडेकर, लहरी हैदर आणि नंतर शाहीर निकम, शाहीर अमरशेख, अण्णाभाऊ साठे, गव्हाणकर, आत्माराम पाटील, शाहीर हिंगे, मोटे, लोखंडे व अशा अनेक शाहिरांनी विकसित केलेला आहे.

या सर्व पोवाड्यातून देशभक्ती जागृत करण्याचे कार्य शाहिरांनी केलेले आहे. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात व अनेक आंदोलनांत शाहिरांनी केलेले कार्य जनता कधीच विसरू शकणार नाही.

आज आपण ज्या पद्धतीने पोवाडे म्हणतो त्या पद्धतीने शिवकालात पोवाडे गायले जात नव्हते; कारण ते दांगटी पद्धतीने (गद्यकाव्य आपण ज्या पद्धतीनं म्हणतो त्यापद्धतीने) सादर कले जात होते. पोवाडे गाण्याची आजची पद्धत ही स्वातंत्र्योत्तर काळात अस्तित्वात आली आहे. आता कालानुरूप पोवाड्यांच्या चालीत बरेच बदल झालेले असून विविध वाद्यांच्या साथीने पोवाडे सादर करण्याची प्रथा रुढ होत आहे. प्रसंगी पोवाड्याच्या साथीला नाट्यमय प्रसंगसुद्धा सादर होत आहेत. तसेच वेषभूषेतही आधुनिक बदल झालेले आहेत.

गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात शाहीर व शाहिरी परंपरा टिकवण्यासाठी, वृद्धिंगत करण्यासाठी महाराष्ट्र शाहीर परिषद व अन्य काही संस्था कार्यरत आहेत. बालवयापासूनच शाहिरीची गोडी निर्माण व्हावी म्हणून मुला-मुलींना पोवाडे शिकवण्याचे कार्यसुद्धा चालू आहे. तसेच शाहिरी ही केवळ पुरुषांची मक्तेदारी न राहता महिला वर्गसुद्धा मोठ्या प्रमाणात या क्षेत्रात धडाडीने उतरल्या आहेत. शाहिरीला प्रोत्साहन देण्यासाठी परिषदेने शासनाकडून विविध मागण्या मान्य करून घेतल्या आहेत. जसे की वृद्ध शाहिरांना मानधन, शाहिरी महोत्सवाचे आयोजन, शाहिरांना विविध पुरस्कार इ. थोडक्यात परिषदेमार्फत शाहिरांना उत्तेजन देण्याचे कार्य चालू आहे.


शाहिरी परंपरा टिकवून ठेवण्यासंदर्भात आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणे आवश्यक वाटतो. तो म्हणजे ज्ञान प्रबोधिनी (निगडी) शाळेने १९९२ पासून शाहिरीचे प्रशिक्षण वर्ग सुरू केले व ते आठ वर्षे चालवले. तसेच गेली १५ वर्षे शाळेतर्फे राज्यव्यापी पोवाडे गायन स्पर्धा घेतली जाते. दर वर्षी जानेवारी महिन्यात ही स्पर्धा संपन्न होते. नोव्हेंबरपर्यंत बाल-किशोर शाहिरांनी नावानोंदणी करणे आवश्यक असते. शाहिरी परंपरा टिकवण्यासाठी अनेकांनी या प्रकारचे प्रयत्न करणे आवश्यक वाटते.


**शाहीर योगेश**

संस्थापक - अध्यक्ष, महाराष्ट्र शाहीर परिषद

पोस्टल कॉलनी, वाकड , पुणे 411052


(चित्र: राजा शिवछत्रपतीमधून साभार)



# प्रकल्पातून खरे शिक्षण...

– शिवराज पिंपुडे

*प्रकल्प म्हणजे नेमकं काय असतं हो? तुम्हाला काय वाटतं? मला सांगू काय वाटतं? प्रकल्प म्हणजे उत्साही – सळसळतं वातावरण... प्रकल्प म्हणजे पठडीतल्या अभ्यासापेक्षा वेगळं काहीतरी... अधिक आव्हानात्मक... अधिक हवंहवंसं... हो ना ! घेतलाय असा अनुभव तुम्ही कधी? काय म्हणता... नाही? तर मग व्हा सज्ज... प्रस्तुत लेखात इतिहासासंबंधी सुचवलेल्या काही वेगळ्या विषयांवर प्रकल्प करण्यासाठी... चाकोरीबाहेरचा अनुभव घेण्यासाठी !*

**आपल्या वंशाचा इतिहास कालरेषेवर मांडणे –**

इ. सहावी मध्ये तुम्ही कालरेषा शिकला आहात. परीक्षेत सांगितलेल्या घटना योग्य पद्धतीने कालरेषेवर दाखवून तुम्ही गुणही मिळवले असतील. पण याशिवाय तुम्ही स्वत:हून कालरेषा या संकल्पनेचा वापर केला आहे का? उदा. स्वातंत्र्य काळातील महत्त्वाच्या घटना किंवा एखाद्या व्यक्तीचा जीवनपट कालरेषेवर दाखवायचा तुम्ही कधी प्रयत्न केला आहे का? आपल्याला अशाच प्रकारचा प्रकल्प करायचा आहे. स्वत:च्या कुटुंबाचा इतिहास – त्यातील ठळक घडामोडी कालरेषेवर दाखवूया. हा प्रकल्प आपल्याला दोन टप्प्यात करावा लागेल. पहिल्या टप्प्यावर अर्थातच तुम्हाला तुमच्या कुटुंबाचा इतिहास जमवावा लागेल, तोही महत्त्वाच्या घटनांच्या दिनांक–सालासह ! आणि दुसऱ्या टप्प्यात या घटनांचं महत्त्व लक्षात घेऊन त्यांची नेमकी निवड करावी लागेल. आता हा कुटुंबाचा इतिहास मिळवण्याचे स्रोत कोणते असू शकतील? तुम्हाला काय वाटतंय? तुमच्या कुटुंबातील सर्वात ज्येष्ठ व्यक्तीकडून (आजोबा/पणजोबा) तुम्हाला बरीच माहिती मिळू शकेल. तुमच्या सर्व नातेवाईकांची मुलाखत तुम्ही या संदर्भात घेऊ शकाल. त्यांच्यासाठी एखादी प्रश्नावली तयार करू शकाल. (जेणेकरून प्रत्येकाची मुलाखत घेण्यासाठी लागणारा वेळ वाचू शकेल.) आपल्याला ज्या प्रकारची माहिती हवी आहे त्या प्रकारचे प्रश्न तुम्हाला काढावे लागतील. एकीकडे ही सगळी तयारी चालू असताना थोडं शोधकार्यही तुम्हाला चालू ठेवावं लागेल. म्हणजे एक दिवस जरा माळ्यावर चढा. जरा अडगळीच्या खोलीत डोकवा. जुन्या लग्नपत्रिका, जुनी कृष्णधवल छायाचित्रं सापडतात का बघा. या सगळ्या गोष्टीही तुमच्या इतिहास अभ्यासाची महत्त्वाची साधनं ठरू शकतील. तर सांगायचा मुद्दा हा की आधी कुटुंबाविषयी, कुटुंबातील सदस्यांविषयी, पूर्वजांविषयी भरपूर माहिती मिळवा.

आता कुटुंबातील ज्या पहिल्या व्यक्तीपर्यंत तुम्ही पोहोचला असाल त्या व्यक्तीचे जन्मसाल ते आताचे चालू वर्ष हा तुमच्या कालरेषेचा आवाका / पट असेल. उदा. कोणाला आपल्या खापरपणजोबांविषयी माहिती मिळाली असेल आणि त्यांचा जन्म १८८० सालातील

| पहिली भारतीय महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी | | शिकागोच्या परिषदेत स्वामीजींचे सुप्रसिद्ध भाषण |
|---|---|---|
| इ. स. १८८६ | कालरेषा | इ. स. १८९३ |


पाहा... मालिका - चाणक्य (DVD संच)

असेल तर १८८० ते २०११ अशी आखणी कालरेषेवर करावी लागेल. साधारणपणे १० वर्षांचे टप्पे कालरेषेवर करता येतील.

आता तुम्ही जी माहिती मिळवली असेल त्यातील तुम्हाला महत्त्वाच्या वाटणाऱ्या घटना निवडा. महत्त्वाच्या घटना म्हणजे अशा घटना ज्यांच्यामुळे काही महत्त्वाचे बदल तुमच्या कुटुंबात घडले असतील, कुटुंबातील काही परंपरांना सुरुवात झाली असेल (उदा. वारीला जाणे) तसेच तुमच्या कुटुंबातील सदस्यांनी केलेले विशेष पराक्रम, तुमच्या घरातील सदस्यांची जन्मवर्ष, लग्नवर्ष; गावातून शहरात राहायला आला असाल तर ते साल, तुमच्याकडे कोणी सैनिक होऊन गेले असतील, त्यांनी एखाद्या युद्धात सहभाग घेतला असेल तर ते वर्ष अशा अनेक महत्त्वाच्या गोष्टी कालरेषेवर दाखवता येतील. ही कालरेषेची मांडणीसुद्धा तुम्हाला आकर्षकपणे करता येईल. म्हणजे चित्रकलेचे २-३ कागद ऐकमेकांना चिकटवून मोठा कागद तयार करा. त्यावर कालरेषा काढा. नोंदींसाठी स्केचपेनस्‌चा वापर करा. संबंधित घटनांची, व्यक्तींची काही छायाचित्रे मिळाली असतील तर ती कालरेषेवर चिकटवा इ. इ.

पण केवळ कालरेषा काढून प्रकल्प आटपू नका. एक धारणी तयार करा, त्यात पुढील गोष्टींचे कागद/कागदपत्रे जोडा -

* कालरेषेवर दाखवलेली प्रत्येक घटना तुम्हाला कशी समजली, कोणाकडून समजली ते लिहा.
* कालरेषेवरील प्रत्येक माहितीला काही प्रत्यक्ष पुराव्यांची जोड देता आली तर उत्तम. याचं अगदी साधं उदाहरण म्हणजे ज्या व्यक्तीचं जन्मसाल कालरेषेवर असेल त्या व्यक्तीच्या जन्माचा दाखला पुरावा म्हणून तुम्हाला जोडता येईल. तुम्ही समजा गाव सोडून शहरात स्थिरस्थावर झाला असाल तर शिधापत्रिकेवरची नोंद पुरावा म्हणून जोडता येईल. या पुराव्यांमुळे तुमचा प्रकल्प अधिक सत्यनिष्ठ होईल आणि मग आपल्या कुटुंबाचा १५०-२०० वर्षांचा इतिहास त्या कालरेषेवर बघण्यात, इतरांना दाखवण्यात अन् त्यांच्याकडून कौतुक करून घेण्यात जो आनंद असेल तो केवळ अनुभवण्यासारखा असेल, हो ना!

**शोधूया सायकलचा इतिहास –** आणखी एक जरा वेगळ्या प्रकारचा प्रकल्प बघूयात. आपल्या आजूबाजूला असणाऱ्या, आपण वापरत असणाऱ्या अनेक गोष्टींना काही ना काही इतिहास असणार असा विचार तुम्ही केलाय का? एक उदाहरण म्हणून सायकलचा इतिहास शोधण्याचा प्रयत्न करा. एकदा प्रकल्पाचा विषय निश्चित झाला की त्यासंदर्भात अधिकाधिक प्रश्न काढा. त्या प्रश्नांची उत्तरं शोधण्याचा प्रयत्न करा. 'सायकलचा इतिहास' या संदर्भात तुमच्या मनात काय प्रश्न येतील बरं?

* सायकलचा शोध कधी, कोणी व कसा लावला?
* सायकलीचे विविध प्रकार कोणी व कधी शोधले?
* सुरुवातीच्या सायकली व आताच्या सायकली यात किती प्रकारचे बदल झाले आहेत? हे बदल काय क्रमाने व कोणकोणत्या टप्प्यात घडले?
* सायकल बनवण्यासाठी कच्चा माल म्हणून कशाचा वापर होतो.
* कोणकोणत्या कंपन्या सायकली तयार करतात?
* एक सायकल बनवायला किती दिवस लागतात?
* सायकलची किंमत कशी ठरते?
* सायकल विक्रीचे प्रमाण गेल्या १० वर्षात वाढले आहे की कमी झाले आहे?

एकीकडे सायकलचा इतिहास अभ्यासताना दुसरीकडे आपल्याला 'भविष्यातील' सायकल बघता येईल का? म्हणजे भविष्यात सायकलमध्ये आणखी कोणते बदल होऊ शकतात? कोणते बदल व्हायला पाहिजेत असे तुम्हाला वाटते? असाही विचार करून बघा.

सायकलऐवजी तुम्हाला दुसरी कोणती वस्तू /वाहन निवडावेसे वाटले तरी चालेल. उलट तुमच्या मित्रमैत्रिणींना वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू प्रकल्पासाठी निवडायला सांगा. जेणेकरून एकाच वेळी अनेक वस्तूंचा इतिहास तुम्हाला समजू शकेल.

**इतिहासवेड्या व्यक्तीची मुलाखत घेणे –** इतिहास विषयाची आवड असणाऱ्या, त्या विषयाशी

जगदीशचंद्र - रेडिओ संदेशवहनाचे प्रयोग सर्वप्रथम — इ. स. १८९५

कालरेषा

रामानुजन यांनी गणिती सिद्धांत मांडले — इ. स. १९१०

संबंधित महत्त्वपूर्ण काम करणाऱ्या काही व्यक्ती आपल्या आसपास असतात. कोणी अनेक किल्ल्यांवर भटकंती करून त्यांच्या छायाचित्रांचा संग्रह केलेला असतो. कोणी एखाद्या विशिष्ट ऐतिहासिक विषयाचा / व्यक्तीचा सखोल अभ्यास करून तो विषय अनेकांपर्यंत व्याख्यानाद्वारे पोहचवत असतो. कोणी भारतभरातल्या क्रांतिकारकांची माहिती मिळवलेली असते, कोणी वेगवेगळ्या ऐतिहासिक वस्तूंचा संग्रह केलेला असतो. अशा एखाद्या व्यक्तीपर्यंत आपल्याला पोहोचता येईल का? त्या व्यक्तीच्या सहवासात १-२ तास व्यतीत करता येतील का? मुलाखतीद्वारे त्या व्यक्तीचा एकूण जीवनप्रवास व त्यांच्या कार्याची माहिती मिळवता येईल का? हासुद्धा एक मोठा प्रकल्प होऊ शकतो.

अर्थातच यासाठी प्रथम अशा इतिहासप्रेमी व्यक्तींचा शोध तुम्हाला घ्यावा लागेल. ऐतिहासिक पुस्तकांचे लेखक, वर्तमानपत्रातून ऐतिहासिक विषयावर मांडणी करणारे तज्ज्ञ, व्याख्यानमालेतून ऐतिहासिक विषय मांडणारे वक्ते यांची यादी तयार करा. (या अंकातूनही तुम्हाला अशा बऱ्याच इतिहासप्रेमी व्यक्तींची नावे मिळतील बरं का!) त्यांचे पत्ते/संपर्क क्रमांक/ई-मेल मिळवण्याचे प्रयत्न करा. या यादीतून भौगोलिकदृष्ट्या तुम्हाला जवळ असणाऱ्या व्यक्तीची निवड करण्यास हरकत नाही. संबंधित व्यक्तीस संपर्क करून तिला तुमचा हेतू समजावून सांगा. त्यांची वेळ घ्या. भेटायला जाताना एकट्यानेच जाण्यापेक्षा तुमच्याजवळ राहाणाऱ्या मित्र-मैत्रिणींनाही या प्रकल्पात सहभागी करून घेता आले तर अधिक उत्तम.

व्यक्तीची निश्चिती झाल्यावर पुढचे काम म्हणजे मुलाखतीसाठी प्रश्न काढणे. प्रश्न काढण्यासाठी संबंधित व्यक्तीची, तिच्या कामाची किमान माहिती मिळवावी लागेल. जेणेकरून आपल्याला चांगले प्रश्न काढता येतील. हे प्रश्न तुमच्या घरच्यांना दाखवून त्यांनाही त्यात भर घालण्यास सांगा. आता या प्रश्नाचा क्रम तुम्हाला ठरवावा लागेल. उदा. तुम्हाला तुमच्या कामासाठी कोणते पुरस्कार मिळाले आहेत, असा प्रश्न मुलाखतीच्या सुरुवातीला आपल्याला विचारता येणार नाही. प्रश्नांची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घ्या. प्रश्न नम्रतापूर्वक व आत्मविश्वासाने विचारा. शक्य असल्यास मुलाखतीचे रेकॉर्डिंग करा. रेकॉर्डिंग करत असलात तरी मुलाखत चालू असताना महत्त्वाच्या मुद्द्यांची टिपणेही काढा.

एखाद्या प्रश्नाच्या उत्तरावरून आयत्यावेळी नवीन प्रश्न सुचला तर तोही अवश्य विचारा. हा प्रश्न आपल्या यादीतला नाही असा विचार करू नका. उत्तरावरून नवीन प्रश्न सुचणे हे सुद्धा एक कौशल्यच आहे हे लक्षात घ्या. एखाद्या प्रश्नाच्या उत्तरात पुढच्या काही प्रश्नांची उत्तरं मिळाल्यास ते प्रश्न विचारू नका.

नंतर या मुलाखतीचं एक चांगलं टिपण तयार करा. मुलाखतीच्या वेळी काढलेली छायाचित्रे त्यात चिकटवा. मुलाखत घेतल्यावर तुम्हाला काय काय वाटलं हेही अवश्य नोंदवा.

प्रकल्पाचे थोडे 'हटके' विषय बघून नवीन उत्साह संचारला ना? काय तुम्हालाही यातून काही नवीन, वेगळे विषय सुचतायत? मग आता वेळ दवडू नका. या सुट्टीत यातील एक तरी प्रकल्प आवर्जून करून बघाच. प्रकल्प करताना मजा तर येईलच पण इतिहासाविषयी तुमची जाणही वाढेल हे निश्चित. आणि हो, आलेले अनुभव ऐकायला/वाचायला आम्हीही उत्सुक आहेत; हे लक्षात आहे ना?

**- शिवराज पिंपुडे**
२२५/२७ अ, प्राधिकरण, पुणे ४४
shivraj.pimpude@gmail.com

सौर चैत्र (एप्रिल ११) महिन्याच्या अंकात हस्तलिखित स्पर्धेचा निर्णय जाहीर झाला. त्यामध्ये अकोल्यातील किशोर गटात फुलोरा व कुमार गटात झेप या हस्तलिखितांच्या शाळेचा उल्लेख शिवाजी विद्यालय असा झाला आहे, त्याऐवजी फुलोरा - बालशिवाजी प्राथमिक शाळा व झेप - छत्रपती शिवाजी माध्यमिक शाळा असे वाचावे. अनवधानाने झालेल्या चुकीबद्दल क्षमस्व.

**पहिला भारतीय मूकपट - पुंडलिक प्रदर्शित** | **रविंद्रनाथांच्या गीतांजली काव्यसंग्रहाला नोबेल पुरस्कार**

**इ. स. १९१२** | **कालरेषा** | **इ. स. १९१३**

मत्स्य पुराणाच्या दहाव्या अध्यायात आलेली ही कथा. मत्स्य पुराणाचा काळ इ. स.चे दुसरे शतक हा मानला जातो. हीच कथा भागवत पुराणाच्या चौथ्या स्कंधात १५ ते १८ या अध्यायांमध्ये आलेली आहे. या दोन्ही कथांमध्ये थोडासा फरक असला तरी कथेचा आशय मात्र सारखाच आहे.

आपण लहानपणापासूनच ध्रुव बाळाची गोष्ट ऐकतो. हाच ध्रुव मोठेपणी राजा झाला. पुढे त्याच्या वंशात वेन नावाचा राजा होऊन गेला. राजाने आपल्या प्रजेचे रक्षण करायला हवे. मात्र वेन राजा आपल्या प्रजेलाच त्रास देऊ लागला. तो फार दुष्ट असल्याने त्याच्या प्रजेला असुरक्षित वाटू लागले. ऋषींनी वेन राजाला चांगले वागण्याचा उपदेश केला. परंतु वेन राजाने त्याकडे लक्ष दिले नाही. उन्मत्त होऊन देवाचीदेखील निंदा करणाऱ्या वेन राजाला अखेरीस ऋषींनी केवळ आपल्या हुंकाराने ठार केले.

*ऋषी हे प्रजेचे प्रतिनिधी आहेत. त्यांचा हुंकार हा रूपकात्मक आहे. सर्व प्रजाजन आपल्या दुष्ट, अन्यायी राजाविरुद्ध असे हुंकार काढतील तर दुष्ट प्रवृत्तीचे तथाकथित नेते आजही भुईसपाट होऊन जातील. प्रजेचा सत्तेविरुद्धचा असंतोष व्यक्त होणे आजही तितकेच महत्त्वाचे व आवश्यक आहे, असे ही कथा सुचविते.*

वेन राजाच्या मृत्यूनंतर राज्यात आणखीनच अराजक माजले. त्यामुळे प्रजेचे पालन करण्यासाठी चांगल्या प्रवृत्तीचा राजा असणे आवश्यक होते. या कारणास्तव ऋषींनी वेन राजाच्या मृत शरीरातून 'पृथु'ची निर्मिती केली. हा पृथू राजा प्रत्यक्ष परमेश्वराचाच अवतार होता, असे कथेत म्हटले आहे.

# पुराणे गाती वसुंधरेची महती

**आर्या जोशी**

**पुराणे हा भारतीय साहित्यातील महत्त्वाचा ग्रंथसमूह. 'पुरा नवं भवति !' म्हणजेच प्राचीन असूनही जे नवे असते ते पुराण होय. पुराण वाङ्मयामध्ये विविध कथांचा विपुल खजिना आहे. बहुतांश कथा या रूपकात्मक व बोधप्रद अशा आहेत. धर्म, संस्कृती, सदाचार यासारखी तत्त्वे, लहानांपासून मोठ्यांपर्यंत, सोप्या भाषेत पोहोचवण्याचे काम या कथांनी केले आहे.**



सी. व्ही. रामण यांना नोबेल पुरस्कार — इ. स. १९३०
स्वामी भारती कृष्णतीर्थांनी वैदिक गणिताची सूत्रे मांडली — इ. स. १९३३
कालरेषा

*आपण असे म्हणू शकतो की उत्तम गुणांनी युक्त, प्रजेची काळजी घेण्यास समर्थ असा युवक ऋषींनी शोधला व त्याला राजा केले. उत्तम नेतृत्व करण्यासाठी आवश्यक असणारी संघटन वृत्ती, कनवाळू स्वभाव, धाडसीपणा इ. गुण पृथूमध्ये होते. हे गुण आपणही आपल्या व्यक्तिमत्त्वात आणले पाहिजेत. तरच भावी काळात आपणही समाजात संघटनाचे काम प्रभावीपणे करू शकू.*

पृथूचा राज्याभिषेक झाला. त्याप्रसंगी विविध देवतांनी त्याला छान पण उपयुक्त भेटवस्तूही दिल्या. राज्याभिषेक झाला खरा; पण पृथूची प्रजा त्यावेळी खूप दु:खी होती. भूमीकडून प्रजेला अन्न मिळत नव्हते. भुकेने प्रजा तडफडत होती. याचे कारण शोधल्यावर पृथूला समजले की अन्न, उत्तम औषधी भूमीने आपल्या पोटात गडप केल्या आहेत. हे समजल्यावर तो प्रजावत्सल राजा भूमीला मारण्यासाठी धनुष्यबाण घेऊन निघाला. ते कळल्यावर भूमीने गाईचे रूप घेतले आणि ती सैरावैरा पळू लागली.

*भूमीला दिलेले गाईचे रूपक फार सूचक आहे बरं का! आपले संरक्षण करण्यास असमर्थ भूमी 'बिचारी गरीब गाय' झाली. गाय ही आपली माता. दुधासारखे पौष्टिक अन्न देणारी. त्यामुळे भारतीय संस्कृतीत गाईचा वध निंद्य मानला आहे.*

पृथूपासून आपली सुटका नाही, हे समजल्यावर गायरूपी भूमीने त्याची प्रार्थना केली. ''हे वीरा! आचारभ्रष्ट लोक औषधींचा व अन्नाचा नाश करू लागले होते म्हणून मी सर्व औषधी, अन्न माझ्या पोटात घालून त्यांचे रक्षणच केले आहे.''

*गंमतच आहे ! दुसऱ्या शतकातील कथेतील भूमी आणि एकविसाव्या शतकातील कथेतील भूमी यांचं दु:ख सारखंच आहे की ! आपल्या स्वार्थासाठी आजही आपण भूमीवरील नैसर्गिक संपत्ती अक्षरश: ओरबाडून घेत आहोत. एवढंच नाही तर तिचं पोट फाडून खनिज तेल, कोळसा यांचाही धूर करीतच आहोत. किती भयानक आहे हे!*

भूमी पुढे पृथूला म्हणाली, ''तुला जर औषधी आणि अन्न हवे असेल तर मी आता ते माझ्या दुधातून देईन. ज्याला पाहून मला वात्सल्याने पान्हा फुटेल असे वासरू तू तयार कर. माझे 'दोहन' करणारा तयार कर. तसेच पावसाळा संपल्यानंतरही सर्वांना मुबलक पाणी मिळण्यासाठी तू माझा डोंगराळ पृष्ठभाग सपाट कर आणि पाणी अडवण्याची व्यवस्था कर.''

हे ऐकून पृथूने मनूला वासरू केले. स्वत:च्या हातांनी गायरूपी भूमीचे दूध काढले. त्यातून अन्नधान्याची निर्मिती झाली. म्हणजे इथे 'दोहन' हा शब्द उद्धार करणारा या अर्थाने वापरलेला आहे. नंतर संतुष्ट पृथूने या भूमीचा आपली कन्या म्हणून स्वीकार केला. पृथूने जिचा उद्धार केला ती भूमी झाली 'पृथ्वी' – पृथूची कन्या 'पृथ्वी.'

त्यानंतर पृथूने प्रजेसाठी गावे, नगरे, किल्ले, गौळीवाडे सैन्यासाठी जागा, खाणी इ. ची योजना केली. पृथूराजापूर्वी अशी नगररचना अस्तित्वात नव्हती. त्यामुळे सर्वप्रथम सुनियोजित नगररचनेचा शिल्पकार म्हणूनही पृथूचे महत्त्व आहे.

*तर मित्रांनो, या कथेमध्ये 'शोषणा'ची निंदा व 'दोहना'ची स्तुती आहे. आज अनेक सुखसोयींसाठी आपण ऊर्जा वापरत आहोत. स्वयंचलित वाहने, वृक्षतोड यामुळे ओझोनचा थर कमी होतो आहे. ऋतूचक्र ही संकल्पनाच मागे पडते आहे. रासायनिक खतांच्या वापराने जमिनीची सुपीकता कमी होत आहे. प्लॅस्टिकचा वापर पर्यावरण धोक्यात आणतो आहे. खरोखरीच आधुनिक 'वेनराजाच्या' काळात पृथ्वी गरीब गाय झाली आहे. त्यामुळे या कथेपासून प्रेरणा घेऊन वसुंधरेला वाचविणाऱ्या व भावी प्रजेचे कल्याण चिंतणाऱ्या तुमच्यासारख्या अनेक 'पृथूराजां'ची आवश्यकता आजही आहेच.*

**आर्या जोशी**
संत्रिका विभाग, ज्ञान प्रबोधिनी,
५१०, सदाशिव पेठ, पुणे 411030

अंदमान बेटांवर आझाद हिंद सेनेचा ताबा — इ. स. १९४३
कालरेषा
संयुक्त राष्ट्रसंघाचे भारताला सदस्यत्व — इ. स. १९४५



# नाट्याविष्कारातून इतिहास जगा

**सुचेता ज. भालेराव**

आपण शाळेत गणित, विज्ञान, भाषा, इतिहास, कला असे अनेक विषय अभ्यासत अभ्यासतो. त्या सर्वात 'इतिहास' हा विषय तुमच्या आवडीत थोडा मागेच असतो. गणित, विज्ञान, भाषा इ. विषयांचा अभ्यास करीत असताना आपण नेहमीच कृतिशील असतो. बेरीज, वजाबाकी, गुणाकार करताना आकडेमोड करतो. त्रिकोण, चौकोन वर्तुळ काढताना उभ्या, आडव्या, गोल रेषा काढतो. पाढे म्हणतो. विज्ञान शिकत असताना हवा, पाणी, प्राणी, पक्षी, फुले इ. सर्वांना जवळून पहातो / हाताळतो. भाषा अभ्यासताना तर त्यातील शब्द भंडार, निसर्ग, कल्पनाविलास आपल्याला वेगळीच अनुभूती देऊन जातात. त्यामुळे हे सर्व विषय जिवंत – बोलके होऊन आपल्याला अधिक आवडतात. मग इतिहासासाठी तसे होण्यास आपल्याला काही करता येईल का?

तुम्ही दूरदर्शनवर एका गोळीची (मेंटॉसची) जाहिरात पाहिली आहे का? सहज, छान, सोपी आणि जिवंत अशी ती जाहिरात आहे. त्यात आदिमानवाचा इतिहास काही सेकंदात आपल्यासमोर उभा केला आहे. त्यात नाच, गाणे किंवा भडकपणा कुठेच नाही. संवाद देखील अगदी थोडा आहे. आदिमानवाने शिकार करणे, त्याचे गुहेत राहाणे, आग– वस्त्र–चाक यांचा त्याने लावलेला शोध इ. गोष्टी त्या जाहिरातीतून दाखविल्या आहेत. त्यामुळे इतिहास जिवंत होऊन समोर आला आहे. अगदी लहान मुलांनादेखील सहज समजेल असे, 'कृतीतून आकलन' या ठिकाणी आपल्याला पाहायला मिळते. इतिहास विषयाच्या संदर्भात असे चटकन् एखादया गोष्टीचे किंवा मुद्द्याचेआकलन होण्यासाठी वर्गाने, गटाने मिळून काही करता येईल का? तर नक्कीच येईल ते कसे करायचे ते या लेखातून जाणून घेऊ.

**कृतीतून आकलन पूर्वतयारी :**

**सर्वात महत्त्वाचे :** प्रत्येक पायरीवर / कृतीत विषय अध्यापकांचे मार्गदर्शन मोलाचे असणार आहे. त्यामुळे वेळोवेळी त्यांच्याशी नक्की चर्चा करा.

**वेळेचे नियोजन :** हे केवळ इतिहास तासिकेपुरते मर्यादित न राहता त्यासाठी अन्य उपलब्ध वेळेचाही विचार करावा लागेल **१.** शाळेच्या आधीचा व नंतरचा काही वेळ. **२.** दैनंदिन तासिकेमधील अन्य विषयांचे मिळणारे मोकळे तास **३.** शनिवार / रविवार व अन्य सुट्ट्यांमधील वेळ **४.** पूर्ण कालावधी मात्र निश्चित करावा.

**अभ्यासासाठी माहिती मिळविण्याचे स्रोत/ ठिकाणे निश्चित करणे.** **१.** पाठ्य पुस्तक **२.** शाळेचे ग्रंथालय **३.** शाळेच्या जवळपासचे 'इतिहास' ग्रंथालय **४.** व्यक्तिगत पुस्तक संग्रह **५.** सर्व प्रकारे भरपूर माहिती देणारे साधन अर्थात संगणक.

माहिती जमवीत असताना सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे कुठेही 'इतिहासात' नसलेल्या गोष्टींचा मनोरंजनासाठी समावेश करू नये. कल्पनाविलास शंभर टक्के टाळावा.

**प्रत्यक्ष अभ्यास घटकाची निवड**

* आरंभी आपण थोडा वेगळा विषय घेऊया. इ. नववीच्या इतिहास अभ्यासक्रमात इजिप्त, भारत आणि ग्रीक संस्कृतीचा समावेश आहे. 'संस्कृती' ही मानवाची बौद्धिक आणि नैतिक प्रगती सूचित करीत असते. वरील

| हिंदी राष्ट्रभाषा असल्याची घटना समितीची घोषणा | | पहिली पंचवार्षिक योजना कार्यान्वित |
|---|---|---|
| इ. स. १९४९ | कालरेषा | इ. स. १९५१ |

तीनही संस्कृतींना जगातील प्राचीनतम संस्कृती म्हणून मान्यता प्राप्त आहे.

* माणूस हा अन्य प्राण्यांपेक्षा अधिक विचार करतो. शिवाय आपल्या विचारांचे यथासांग प्रदर्शन करण्याची क्षमता त्याच्यात असते. त्यामुळेच संपूर्ण जीवसृष्टीत माणसाला वैशिष्ट्यपूर्ण आणि वेगळे स्थान लाभले आहे.

* माणसाचे राहणे, वागणे आणि त्यानुसार जीवन जगण्यातून 'संस्कृतीचा' जन्म झालेला आहे.

* आपल्याला अशा 'संस्कृतीचा' अभ्यास करीत असताना मिळालेल्या माहितीचे नाट्यरूपाने यथोचित प्रदर्शन करून आपले वैशिष्ट्य जपायचे आहे.

**पायरी क्र. १ – प्रत्यक्ष कृतीस आरंभ**

* शाळेत इ. नववीच्या साधारणपणे दोन ते तीन तुकड्या असतात. त्यामुळे त्या तीनही तुकड्यांना इजिप्त, भारत व ग्रीक या तीन संस्कृतीतील प्रत्येकी एका संस्कृतीचा अभ्यास एकाच कालावधीत करता येईल. (किंवा एखाद्या वर्गातही असे ३ गट पाडून कृतिशील उपक्रम करता येईल.)

* त्यासाठी आरंभी तीनही वर्गांची /गटांची एकत्र बैठक घेऊन त्यात विषय अध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली नाट्य-प्रकल्पाची योजना सांगावी लागेल. नंतर प्रत्येक वर्गासाठी 'संस्कृतीची' निवड करावी लागेल.

* वर्गात वेगवेगळे 'गुण' आणि 'आवड' असणारे विद्यार्थी असतात. उदा. वाचन, लेखन, चित्रकला, वक्तृत्व, अभिनय, संपर्क इ. या प्रत्येक विशेष 'गुण' व 'आवड' असणाऱ्या विद्यार्थ्यांचा एक असे आवश्यकतेनुसार गट करता येतील. (गटाने एकमेकांना मदत करण्याची मोकळीक असेल.) तुमच्या गटात जितके जास्त विद्यार्थी असतील तेवढा कामाच्या विभागणीसाठी त्यांचा उपयोग होऊ शकतो. (पण त्याचवेळी या मोठ्या गटाला एकत्रित 'नांदतं' ठेवणं इथेही तुमच्या व्यवस्थापकीय/नेतृत्व क्षमता तपासल्या जातील.)

* वर्गात एक व प्रत्येक गटाचा एक असे प्रमुख निवडावेत. ही निवड देखील इच्छुक विद्यार्थ्यांच्या नावाच्या चिठ्ठ्या उचलूनच करावी. यामुळे कामाच्या नियोजनात सुकरता येईल. मार्गदर्शनासाठी विषय अध्यापकांकडे जाण्याची जबाबदारी गटप्रमुखांकडे येते.

**पायरी क्र. २– पूर्वतयारी**

* आता वर्गात /गटात प्रत्येकाने धड्याचे वाचन मन लावून करायचे आहे. वाचनाची विशेष आवड असणाऱ्या गटाने एका स्वतंत्र वहीत किंवा कागदावर धड्यातील महत्त्वाच्या मुद्द्यांची नोंद करायची आहे.

* नंतर ह्या गटाने अन्य माहिती मिळणाऱ्या स्रोत / साधनांतून त्या संदर्भात अधिक माहिती मिळवायची आहे. जसे उदा. १) संस्कृतीची माहिती कोणाला, कधी आणि कशी मिळाली. २) शिलालेख किंवा तत्सम साधनांतून मिळालेली माहिती, लिपी, चित्र, चिन्ह किंवा अन्य काही विशेष नोंदी ३) जगात संस्कृतीचे स्थान, नकाशा ४) संस्कृतीच्या संदर्भातील विशेष चित्र–केशभूषा, वेशभूषा, दागिने, खेळ, एकंदरीत राहणीमान ५) समाजव्यवस्था ६) शासनव्यवस्था ७) विज्ञान–कला ८) धार्मिक कल्पना ९) स्थापत्य–विशेष वास्तुकला १०) मनोरंजन इ.

* वरील मुद्द्यांवरून माहिती मिळाल्यावर वक्तृत्वाच्या गटाने त्याचे वर्गात सर्वांना समजेल असे वाचन करायचे आहे.

* मुद्दा क्रमांक दोन, तीन, चारची माहिती चित्रकला व सुंदर हस्ताक्षर असलेल्या गटाला द्यायची आहे. मिळालेल्या माहितीवरून या गटाने वेगवेगळे तक्ते तयार करायचे आहेत.(जसे त्यांना आवडतील तसे) परंतु प्रत्येक तक्त्याच्या तीन प्रती कराव्या लागतील. त्यातील एक प्रत वर्गातील सूचना फलकावर लावण्यास, दुसरी शाळेच्या सूचना फलकावर लावण्यास व तिसरी प्रत आपल्या वर्ग–प्रकल्पाच्या धारिणीत लावण्यासाठी. या तक्त्यांचे आकारमान आपल्याला तो कुठे लावायचा आहे त्यावरून निश्चित करायचे आहे. वर्गात किंवा धारिणीत लावण्याच्या तक्त्यांचे आकारमान फार मोठे असू नये.

**पायरी क्र. ३– नाट्यलेखन**

मिळालेल्या माहितीच्या आधाराने नाट्यलेखन

करण्यासाठी वर्गात चर्चा करून विचार मंथन करून 'नाट्य स्वरूप' कसे असावे, या संदर्भात मते मांडली जावीत. आतापर्यंत इतका अभ्यास झाल्यामुळे मुलांकडून नाट्य-प्रस्तुती करण्यासंदर्भात अनेक सूचना येऊ शकतात. गटप्रमुखांनी त्याची नोंद करून घ्यायची आहे. त्यांत पुढील कल्पनांचा समावेश असू शकतो. उदा. 'इजिप्त संस्कृती'च्या बाबतीत -

१. इजिप्तचा श्रीमंत राजा 'खुफू' किंवा अन्य राजे एकत्र येऊन आपल्या राज्याची माहिती सांगतील.
२. रोझेटाचा शिलालेख जिवंत होऊन 'संस्कृती कशी घडली' हे लहान लहान प्रसंगातून सांगेल.
३. नाईल नदी तिच्या काठावर घडलेला इतिहास विशेष पात्र समुदायांच्या संवादातून सांगेल.
४. इजिप्त मधील सामाजिक - धार्मिक व्यवस्था, प्रशासन व्यवस्थेची संवादातून मांडणी.
५. पिऱ्यामिड व स्फिंक्स जिवंत होऊन बोलू लागले आहेत.

* नाट्यलेखन करणाऱ्या गटाने विषय निश्चित झाल्यावर त्यानुसार संवाद लेखन करावे. संवादाची लांबी वाढविण्यापेक्षा महत्त्वाच्या माहितीवर भर द्यावा. नाटकाची लांबी फार मोठी होणार नाही याची काळजी घ्यावी. (इतिहासाच्या एका तासिकेत सादरीकरण होईल इतकी नाटकाची लांबी असावी २५ ते ३० ओळींच्या संवादाला १ ते १ ।। मिनिट लागतो.)

* लिखित नाट्याची एक प्रत आपल्या धारिणीमध्ये अन्य तक्त्यांसोबत लावावी.

**पायरी क्र. ४- सादरीकरण :**

* आता अभिनयाच्या गटाने आपले नाटक प्रथम आपल्या वर्गात सादर करावे. आणि नंतर इतर वर्गात सादर करावे. विषय अध्यापकांची मान्यता असेल तर संपूर्ण शाळेसमोरही सादरीकरण करता येईल.

* सादरीकरण करताना सजावट, वेशभूषेला जास्त वेळ किंवा पैसे खर्च करू नयेत. त्यामुळे मूळ उद्देशापासून आपण भरकटू शकतो. एखादे बोधचिन्ह किंवा चित्राचा वापर इष्ट ठरू शकतो.

**अन्य इतिहास घटकांविषयी थोडक्यात -**

'कृतीतून आकलन' हेच सूत्र धरून आपल्याला इतिहास अध्ययनाची गोडी प्रत्येक इयत्तेत वाढविता येईल.

* 'स्वातंत्र्य - संग्राम' आणि 'समाजसुधारक' यांना इतिहास अभ्यासक्रमात मानाचे स्थान असते. मनुष्य घडणीत त्यांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे त्या घटकांना कायम स्मरणात ठेवणे आवश्यकच नाही तर अनिवार्य आहे. त्यासाठी 'नाट्य' हे माध्यम प्रभावी आहे.

* दहा- पंधरा मिनिटांच्या नाट्यातून, सहज आणि आनंदी प्रक्रियेतून इतिहासाचा अभ्यास होऊ शकतो. आणि तो फक्त परीक्षेपुरता नाही तर आयुष्यभर लक्षात राहील असा.

म. गांधी, स्वा. सावरकर, डॉ. आंबेडकर यांचा स्वभाव विशेष आणि त्यांच्या जीवनात घडलेल्या प्रसंगाला आपण दहा-पंधरा मिनिटांत सहज सादर करू शकतो. त्याचप्रमाणे म. ज्योतिराव फुले आणि राजाराम मोहन राय सारख्या समाजसुधारकांना आपण नाट्यातून अभ्यासू शकतो.

उदा. म. ज्योतिबा फुले ह्यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या गोष्टी, प्रसंग- जसे त्यांना असलेला समाजसुधारणेचा ध्यास, शिक्षणाचे महत्त्व, स्त्री शिक्षणाचे कार्य, स्वत:च्या पत्नीचा कार्यात सहभाग, समाजाकडून होणारा विरोध, आज स्त्रियांची शिक्षणातील गती इत्यादी. सर्व मुद्दे प्रसंग नाट्यातून परिणामकारक अभ्यासता येतील.

**नाट्यातून अभ्यासलेल्या घटकामुळे काय साध्य होऊ शकते -**

**१)** स्वत:च्या सहभागाने अभ्यास डोक्यात कायम स्वरूपी राहून मनालाही रुचेल. स्वयंअध्ययनाचा आनंद मिळेल.

**२)** फक्त परीक्षेत प्रश्नोत्तरे लिहिण्यापुरता अभ्यास योग्य नव्हे; हे मनोमन पटेल.

**३)** वर्गातील/ गटातील प्रत्येकाचे 'गुण' आणि 'आवड' यांना संधी मिळाल्यामुळे सर्व वर्गाचा नाट्य-

प्रक्रियेत आनंदी सहभाग असेल.

४) नकाशा, तक्ते वर्गात लावल्यामुळे अभ्यास मुलांच्या डोळ्यासमोर सतत राहील.


५) वर्गातले सर्व विद्यार्थी एकत्र, मिळून मिसळून अभ्यास करतील. ही एक सांघिक प्रक्रिया असेल.

६) शाळेच्या सूचनाफलकावर तक्ते लावल्यामुळे आपली अभ्यास करण्याची पद्धती सर्व शाळेसमोर असेल आणि आपण कौतुकास पात्र व्हाल.

मग, आपण असा अनुभव घेणार ना? की ज्यामुळे आपल्याला घडविणारा 'इतिहास' अभ्यासण्याची 'नाट्यरूप' आनंदी प्रक्रिया सर्वांनाच आवडू लागेल.

**सुचेता ज. भालेराव**
सी २०१, श्रीनिवास व्हिला,
कमिन्स इंडिया जवळ, एरवंडणे, पुणे ४
sucheta_tai@yahoo.com

# इतिहासाचे मनन करूया



इतिहासाचे मनन करूया
मंगल स्मृतींचे जतन करूया ।।

दिव्य वारसा नरवीरांचा
झुंजारांचा रणधीरांचा
मस्तक तुटले
तरी न हटले
लढता कटले
त्या पर्वाचे स्मरण करूया ।।

स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी
झेलुन रिपुची निर्घृण लाठी
आत्मबलाने
एक दिलाने
हलाहलाने
न्हाले, त्यांचे पूजन करूया ।।

भारतभूच्या सन्मानास्तव
रचले ज्यांनी शाश्वत गौरव
काळेपाणी
चिणली वाणी
तरीही त्यांनी
मंत्र घुमविला - श्रवण करूया
इतिहासाचे मनन करूया ।।

– **मनिषा जोशी,** १०९, अलिशान रेसिडेन्सी, वायलेनगर, कल्याण (प.)

| महाराष्ट्र राज्याची स्थापना | | गोवा मुक्तिसंग्राम |
|---|---|---|
| इ. स. १९६० | कालरेषा | इ. स. १९६१ |


पाहा... चित्रपट - बाल शिवाजी

# इतिहासाचे मंगल 'गान'

**शैलजा देशमुख**

१९६२ सालची गोष्ट ! भारत–चीन युद्धाचे पडसाद देशातील घराघरांत, मनामनांत उमटत होते. मोठ्या जोशाने स्फूर्तिगीतं गाताना आम्ही शाळकरी मुलं केव्हाच रणभूमीवर पोहोचलेलो असायचो.

**उत्तुंग आमुची उत्तरसीमा इंच इंच लढवू ।**
**अभिमान धरू, बलिदान करू, ध्वज उंच उंच उभवू।।**
**राष्ट्राचा दृढ निर्धार,**
**करू प्राणपणे प्रतिकार ।**
**ह्या नसानसातील रक्त,**
**जाळील आसुरी तख्त।।**
**आम्ही न कुणाचे दास नवा इतिहास पुन्हा घडवू**
**उत्तुंग आमुची उत्तरसीमा इंच इंच लढवू...**

कवी वसंत बापट यांच्या अशा अनेक गीतांच्या बोलांनी अवघा आसमंत दुमदुमून जायचा.

**बर्फाचे तट पेटून उठले, सदन शिवाचे कोसळते**
**रक्त आपुल्या प्रिय आईचे, शुभ्र हिमावर ओघळते...**

कुसुमाग्रजांचे हे भावपूर्ण शब्द वाचताना आम्ही भारावून जायचो.

आज या कविता वाचताना, इतिहासात जमा झालेला तो काळ पुन्हा एकदा नजरेसमोर साकार होतो; कवितेची शब्दशक्ती, भाव जागवण्याचं सामर्थ्य, समाजाला चेतना देण्याचं बळ किती प्रभावी असतं, याची प्रकर्षाने जाणीव होते. जिथे जिथे भारतावर प्रेम करणारे बंधु–भगिनी एकत्र येतात तिथे तिथे इतिहासाचे गौरवगान गाणारी कवनं एकमेकांच्या सुरात सूर मिळवून गायली जातात.

शिवशाही, पेशवाईच्या काळात शाहिरांनी वीररसयुक्त पोवाड्यांची रचना करून इतिहासातील प्रसंग आणि व्यक्ती यांना शब्दरूप दिले. महाराष्ट्राच्या इतिहासाकडे मागे वळून पाहता आजही स्वातंत्र्याविषयी जागृत असणाऱ्या प्रत्येक मराठी मनाचे कुलदैवत म्हणजे शिवाजीराजे ! त्यांच्या पराक्रमाच्या कथा– कविता वाचत आपण सर्वजण लहानाचे मोठे होतो. महाराजांच्या पराक्रमाचे वर्णन करताना कवी वसंत बापट म्हणतात–

**वाजताच याचा डंका**
**जुलुमाची जळली लंका**
**शंका न शहाला उरे, कापरे भरे, ढळे शिरताज**
**हा धन्य धन्य शिवराज ।**
**संगती सोबती आले**
**हातात झेलुनी भाले**
**ते शूर मावळे गडी, उरी घोंगडी, फाटका साज**
**हा धन्य धन्य शिवराज।**

पेशवाईच्या अस्तानंतर इंग्रजांची सत्ता महाराष्ट्रात निरंकुश राज्य करू लागली. त्यानंतर १८५७ च्या स्वातंत्र्यसमरात पारतंत्र्याविरुद्ध एक जोरकस आवाज उठवला गेला. या समराने इतिहासाला एक अनोखे वळण दिले. त्या प्रसंगाचे अतिशय तेजस्वी वर्णन करताना कवी सुधीर मोघे म्हणतात,

**तात्या टोपे, राणी लक्ष्मी, असंख्य अनुयायी**
**प्राणपणाने तुडवून गेले मरणाची खाई**
**जित–जेत्यांना सामर्थ्याचा साक्षात्कार घडे**
**काळोखाला जणु तेजाचे क्षणभर स्वप्न पडे**

या लढ्याचे सतत स्मरण प्रत्येक स्वातंत्र्यप्रेमी माणसाने करायला हवे हे सांगताना कवी बा.ग.खापर्डे एक खडा सवाल करतात, ते म्हणतात –

**स्वातंत्र्याची ज्योत अंतरी जळत ठेवणे आहे का?**
**स्वराज्य अपुले वैभवशाली तुम्हास करणे आहे का?**
**देशासाठी होळी करतील असे दिव्य नर हवेत का?**
**हवे जरी रे रणमर्दानो, सत्तावनला विसरू नका!**

१८५७ च्या युद्धाप्रमाणेच लो. टिळकांचा स्वराज्यमंत्र, गांधीयुगातील १९२०, ३० व ४२ चे लढे, १९४७ साली मिळालेले स्वातंत्र्य, त्यानंतरची चीन–पाकिस्तान आक्रमणे, आणीबाणीचा काळ या सगळ्यांचे

| चीनचे भारतावर आक्रमण - भारत पराभूत | | 'ताश्कंद' कराराने भारत - पाक युद्धाची समाप्ती |
|---|---|---|
| इ. स. १९६२ | कालरेषा | इ. स. १९६५ |

दर्शन मराठी कवितेत झाले. भूपाळी, गोंधळ, आरती, ओवी ही सामान्यत: देवभक्तीसाठी वापरली जाणारी काव्यरूपे! पण कवींनी देशभक्तीची भावना या काव्यरूपातून व्यक्त केली.

कवी कुंजविहारींनी स्वतंत्रता देवीचा गोंधळ मांडला,

**स्वतंत्रते भगवती उदो गे भारतभू माये**
**शिवाभवानी, विश्वशालिनी, गोंधळास ये ये ।**

असे आवतण दिले.

तर कुणी ग्रामकन्या सकाळी जात्यावर दळताना ओव्या गुणुगणू लागल्या त्याही स्वतंत्रतेच्या !

**पहिली माझी ओवी ग । भारतमातेला ।**
**कुशीमंदी जिच्या आम्हा । जन्मचि लाभला ।**
**दुसरी माझी ओवी ग । स्वातंत्र्यदेवीला**
**इंग्रज घालवुन आणु हिजला । आपुल्या देशाला ।**

कुणी शाहीरही पोवाडा गाऊ लागले –

**नव्या युगाचा नवा पवाडा**
**नव्या दमाने दुमदुमणार**
**करा बंधुनो एकमुखाने**
**स्वातंत्र्याचा जयजयकार...**

देशाच्या इतिहासाकडे मागे वळून पाहताना देशाच्या स्वातंत्र्यसंग्रामाचे, वैभवशाली विजयाचे, त्यासाठी दिलेल्या निकराच्या लढ्याचे चित्र डोळ्यांसमोर उभे राहाते. अनेक ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांची नि:श्वासिते ऐकू येतात. स्वा. सावरकरांनी स्वतंत्रता देवीचे स्तोत्र गाताना तिचे केलेले वर्णन म्हणजे कवीच्या उत्कट प्रतिभेचा उत्स्फूर्त हुंकार वाटतो.

सूर्याचे तेज, गांभीर्य, फुलांचे सौंदर्य सर्व काही स्वतंत्रतेच्या ठायी त्यांना एकवटलेले दिसते. शत्रूच्या रक्ताने रंगलेली, सुजनांनी पूजिलेली अशी ही स्वतंत्रता देवी-तिच्याठायी सर्वस्व अर्पण करताना स्वा. सावरकर म्हणतात-

**तुजसाठी मरण ते जनन, तुजवीण जनन ते मरण**
**तुज सकल चराचर शरण**
**भारतभूमिला दृढालिंगना कधी देशील वरदे?**
**स्वतंत्रते भगवती त्वामहं यशोयुतां वंदे !**

जेव्हा जेव्हा 'स्वातंत्र्य' या संकल्पनेचा विचार केला जाईल तेव्हा तेव्हा स्वा. सावरकरांच्या या अमर गीताचे स्मरण मराठी मनाला चेतना देत राहील.

इतिहासकार देशाचा इतिहास लेखणीने लिहितात. देशभक्त तो प्रसंगी स्वप्राण अर्पून घडवतात. परंतु हा इतिहास घडवणाऱ्यांच्या ओठावर मात्र स्फुरतात कवींची, गीतकारांची भान हरपवून टाकणारी गीते!

अशाच गीतांच्या सुरांवर कुणी देशभक्त फाशीच्या तख्तावर हसतमुखाने चढले; तर कुणी बंदुकीच्या गोळीला सामोरे गेले. त्यावेळीही त्यांच्या ओठावर क्रांतीचा जयजयकार होता.

कवी यशवंतांच्या शब्दात –

**वाढू दे कारागृहाच्या भिंतीची उंची किती**
**मन्मना नाही क्षिती**
**भिंतीच्या उंचीत आत्मा राहतो का कोंडुनी?**
**मुक्त तो रात्रंदिनी !**

अशा बेफिकीरीने अनेक देशभक्तांनी कारावास तर हसून पत्करला

कुसुमाग्रजांच्या 'क्रांतीचा जयजयकार' मधील क्रांतिकारक मोठ्या धीराने पारतंत्र्यात असलेल्या भारतमातेची आश्वासक शब्दांत समजूत घालत होता.

**कशास आई भिजविसी डोळे उजळ तुझे भाल**
**रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उष:काल**
**सरणावरती आज आमुची पेटताच प्रेते**
**उठतील त्या ज्वालांतुन भावी क्रांतीचे नेते**
**लोहदण्ड तव पायामधले खळखळा तुटणार**
**आई, खळाखळा तुटणार...**

हा अतुट विश्वास सामान्य जनांच्या मनात जागवण्याचे काम अनेक कवींनी केले. एका सुंदर, तेजस्वी, निर्भय जाणिवेने अवघा समाज उत्तेजित झाला. कवींचे हे कार्य खूप मोलाचे आहे. अनेक कवींच्या प्रतिभेचे विविध रंग घेऊन इतिहास शब्दात पकडणारी कविता फुलली; त्यातून ओसंडणाऱ्या विविध रसात-वाचक अक्षरश: न्हाऊन निघाला.

| कोयना भूकंप | | वाघ हा राष्ट्रीय प्राणी म्हणून घोषित |
|---|---|---|
| इ. स. १९६७ | कालरेषा | इ. स. १९६९ |

देशाचा इतिहास घडवणारे लोकनायक हे कायमच कवींच्या काव्याचा विषय झाले. चाफेकरांसारख्या मनस्वी क्रांतिकारकांपासून ते तेल्यातांबोळ्यांपर्यंत सर्वांच्या मनात स्वातंत्र्याची प्रखर आकांक्षा जागवणाऱ्या लोकमान्यांचा कवी सुधीर मोघे यांनी नेमक्या शब्दात गौरव केलाय...

**जगावेगळा होता... तरी हा जनतेचा नेता**
**'लोकमान्य' या शब्दालागी तो भूषण होता**

१९४२ च्या देशव्यापी आंदोलनात जनसामान्यांच्या मनात अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा जागे करणारे म. गांधी हे एक असामान्य व्यक्तिमत्त्व ! गांधीजींच्या मिठाच्या सत्याग्रहाची थोरवी वर्णन करताना ग. दि. माडगूळकर म्हणतात...

**'उचललेस तू मीठ मुठभर**
**साम्राज्याचा रचला पाया**
**भारतास का मानवमात्रा**
**स्फुरणदायि ती दांडीयात्रा'**

गुलामगिरीच्या काळोख्या रात्रीनंतर स्वातंत्र्याची पहाट उगवली. त्याप्रसंगी प्रत्येक भारतीयाला झालेला आनंद व्यक्त करताना कवी वसंत सबनीसांनी मेघांना संदेश दिला–

**'झरझर झरझर जा मेघांनो, गर्जत गर्जत दाही दिशांना**
**दिसेल मानव सांगा त्याला, भारत माझा स्वतंत्र झाला.'**

देशाचा स्वातंत्र्यलढा जितका महत्त्वाचा तितकेच समाजाच्या उन्नतीसाठी झटणाऱ्या समाजसेवकांचे कार्यही महत्त्वाचे ! त्यामुळे अशा समाजसुधारकांची जीवने हीही अनेक कवींच्या काव्याचा विषय झाली. समाजातील दुष्ट रुढी दूर करून, शेतकरी, दलित, अभागी स्त्रिया यांच्यावरील अन्यायाविरुद्ध लढा देणाऱ्या ज्योतिबांचा गौरव कवी वसंत बापट यांनी पुढील शब्दात केला आहे...

**काळकालियाच्या शिरी**
**तुम्ही रोवला भक्कम पाय**
**जोतिराव तुमचे नाव**
**मऱ्हाटमाती विसरेल काय?**
**विषमतेवर मात करून**
**समतेचे राज्य येईल**
**तुमचा डळमळणारा आत्मा**
**तेव्हाच शांत झोप घेईल.**

आजच्या दलित कवितेतील विद्रोही स्वराला बाबासाहेब आबेडकरांच्या प्रेरणेतून शक्ती मिळाली होती. म्हणूनच त्यांचा गौरव सर्व दलित कवितेच्या कवितेत अपरिहार्यपणे येतो.

**'तू झालास परिस्थितीवर स्वार**
**आणि घडवलास नवा इतिहास**
**तू झालास मूक समाजाचा नायक**
**आणि जागा केलास उभा बहिष्कृत भारत.'**

अस्पृश्यांच्या मुक्तिलढ्याचे पहिले रणशिंग फुंकले गेले ते महाडच्या चवदार तळ्यावर! या लढ्यानेच आपला स्वाभिमान जागवला, लढाऊ वृत्ती दिली, आत्मतेज जागे केले हे सांगताना, 'चवदार तळ्याच्या काठावर' उभे राहिलेले अरविंद इंगळे म्हणतात...

**आता एक घोट पुन्हा पिऊ दे**
**या पाण्यानंच तर माझ्यात पाणी आलं.**

प्रत्येक देशाच्या उज्ज्वल इतिहासाला गालबोट लावणाऱ्याही घटना असतातच. त्यावेळी येणारी अस्वस्थताही अनेकदा कवींच्या शब्दात व्यक्त झालेली दिसते.

स्वातंत्र्ययुद्धाच्या इतिहासात 'जालियनवाला बाग' ही असंख्य निरपराधांच्या रक्तानं लिहिली गेलेली एक दुर्दैवी घटना ! एका सभेनिमित्त एकत्र आलेल्या आबालवृद्धांची 'जनरल डायर'ने केलेली अमानुष हत्या ही अंगावर शहारे आणणारी घटना! हृदय पिळवटून टाकणाऱ्या या प्रसंगाबद्दल कुसुमाग्रज लिहितात –

**'पाचोळ्यापरि पडली पाहून प्रेतांची रास**
**नयन झाकले असशिल देवा तू अपुले खास**
**असेल ही वा सैतानाची प्रभूवरी मात**
**एक जखम अन् नवीन येशू, तुझ्या काळजात !'**

स्वातंत्र्योत्तर काळात देशावर लादली गेलेली आणीबाणी म्हणजे स्वातंत्र्याच्या मूलभूत हक्कावर झालेले आक्रमण होते. जयप्रकाश नारायणांच्या रूपाने त्यावेळी

**पाकिस्तानचा युद्धात पराभव - बांगला देशाची निर्मिती** | **पोखरण येथे भूगर्भात पहिली यशस्वी अणुचाचणी**

**इ. स. १९७१** | **कालरेषा** | **इ. स. १९७४**

समाजाला नेतृत्व लाभले. त्या प्रसंगाचे वर्णन वसंत बापटांनी पुढील शब्दात निर्भयपणे केले...

**'अशा अशुभ मळभाखाली सूर्यदेखील मलीन झाला.**
**मंदिराचा कळस जेव्हा अंधारात विलीन झाला,**
**तेव्हा तुझ्या आत्म्यामधून प्रकाशाचा आला झोत.**
**यात्रिकांना गवसला तो हरपलेला मूलस्रोत,**
**आता आम्हा तमा नाही तमाची वा तामसांची.**
**उज्ज्वल गगन, उज्ज्वल प्राची'**

कितीही संकटे आली तरी प्रकाशाचा किरण दाखवणारे महापुरुष समाजाला सावरायला पुढे येतात, हा इतिहास आहे. कितीही प्रश्न असले तरी...

**नभि नक्षत्रे बहुत एक परि प्यारा**
**मज भरतभूमिचा तारा ।**

ही भावना जोपर्यंत आपल्या हृदयात आहे; तोपर्यंत येणाऱ्या आपत्तींना तोंड देत, देशाला वैभवाप्रत नेण्याची प्रेरणा कवींचे शब्द देत राहतील.

या लेखात उल्लेख न झालेल्या असंख्य व्यक्ती, घटना कवींनी काव्यबद्ध केलेल्या आहेत. ही आहेत त्यातील काही मनात ठसलेली शब्दचित्रं! वाहत्या काळासमवेत इतिहास घडत राहातो; इतिहास घडवणारे महात्मे कार्य करत राहतात. कवी अंत:स्फूर्तीने त्यावर भरभरून लिहीत राहातात, राहातील... कवींच्या अशा प्रेरणादायी शब्दांनी आपली संवेदनशील मनं जागी होतील; समाजात सदैव चैतन्य सळसळत राहील, हे मात्र नक्की !


**शैलजा देशमुख**
सी-१०२, पाटे संस्कृती, सहकारनगर क्र. २, पुणे 411009
sgdeshmukh50@gmail.com



**'छात्र प्रबोधन'तर्फे**

**ऐतिहासिक परिसरात ३ दिवसांच्या साहस सहली**

**युवकांसाठी :** ३० मे ते १ जून २०११
**ठिकाण :** राजगड - तोरणा
**शुल्क :** ₹ ४००/-
**युवतींसाठी :** ३ ते ५ जून २०११
**ठिकाण :** लोहगड - तिकोणा
**शुल्क :** ₹ ४००/-

*वैशिष्ट्ये - किल्ल्यांवर मुक्काम, ग्रामीण जीवनाचा अनुभव, इतिहासकथन, गटकार्ये आणि बरंच काही...*

दोन्ही सहली ८ वी ते १२ वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी असतील.

२५ मे पूर्वी शुल्क भरून नावनोंदणी आवश्यक. सविस्तर माहितीपत्रक मुख्य कार्यालयात उपलब्ध! नोंदणी करणाऱ्या सर्वांना पाठविले जाईल.

*वासंतिक अंकातल्या 'संवाद'मध्ये जाहीर केल्याप्रमाणे १० जोडीकार्यांची मालिका यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्यांना सहल नि:शुल्क असेल.*


## चले जाव...

आपण आजही पाठ्यपुस्तकात, बोलीभाषेत आक्रमकांच्या भाषेतील शब्द अगदी सर्रास वापरतो. या शब्दांना कधीतरी आपण 'चले जाव' असं म्हणणार की नाही? हे शब्द काढून त्यांच्या जागी मातृभाषा किंवा भारतीय भाषांमधील शब्दांची योजना करणार की नाही? अशाच काही शब्दांसाठी प्रतिशब्द सुचवले आहेत. तुम्ही त्यांचा वापर नक्की सुरू करा.

| फारसी भाषेतील शब्द | मराठी भाषेतील प्रतिशब्द |
|---|---|
| नकाशा | भूपट, मानचित्र |
| तख्त | सिंहासन |
| जरब | धाक |
| जल्लोश | आनंदोत्सव |
| दस्तावेज | पत्रसंग्रह |
| तारीख | दिनांक |
| वकील | विधिज्ञ |

सौर चैत्र अंकात प्रसिद्ध झालेली 'लेखन कार्यशाळा' काही अपरिहार्य कारणामुळे जून महिन्यात होऊ शकत नाही. कृपया नोंद घ्यावी.

राष्ट्रीय आणीबाणीचे पर्व सुरू — इ. स. १९७५
सिक्किमचे भारतात विलीनीकरण — इ. स. १९७५
कालरेषा

# जतन इतिहासाचे

**अभिजित बेल्हेकर**

इतिहास म्हटले की ती लढायांची वर्णने आणि सनावळ्यांची लांबलचक यादी, अशी एकच घटना-नोंदीची अभ्यासपद्धती पुढे येते. यातून परीक्षेची उत्तरे सोडवता येतात; पण या विषयाशी नाते काही जुळत नाही. खरेतर हे काम कुठलाही अभ्यास वा पुस्तकापेक्षा एखादी ऐतिहासिक वास्तू वा वस्तुसंग्रहालयच जास्त परिणामकारकरित्या करू शकतात. यातील ऐतिहासिक वस्तू तर इतिहासाची अस्सल साधने. यामुळे इतिहासात त्यांना मोठे महत्त्व आले आणि यातूनच या वस्तुंची - साधनांची पुढे वस्तू संग्रहालये बनली.

कलात्मक, दुर्मिळ, ऐतिहासिक मूल्य असलेल्या वस्तूंचा संग्रह असणारी इमारत, आलय म्हणजे वस्तू संग्रहालय! जगातील बहुतेक संग्रहालये 'इतिहास' या विषयाचे बोट धरूनच सुरू झाली आणि पुढे नावारूपाला आली. आपल्या महाराष्ट्रातही तब्बल दीडशेहून अधिक संग्रहालये आहेत. यातही स्वाभाविकपणे इतिहासावरची सर्वाधिक आहेत.

इतिहासाच्या या पाऊलखुणा मानवाच्या उत्क्रांतीपासूनच सुरू होतात. या उत्क्रांतीचाच वेध घेणारे एक संग्रहालय पुणे विद्यापीठाच्या मानववंशशास्त्र विभागात थाटलेले आहे. डॉ. इरावती कर्वे यांच्या नावाने आकारास आलेल्या या संग्रहालयात 'कपी ते मानव' हा लाखो वर्षांचा प्रवास मांडलेला आहे. त्यासाठी आधार घेतलाय तो प्राचीन मानवी सांगाडे, दगडी हत्यारे आणि आदीम जीवनसंस्कृती यांचा! या साऱ्यांतून ही 'मानवी उत्क्रांती' उलगडत जाते.

वैदिक काळ हा आमच्या संस्कृतीचा अगदी प्राथमिक टप्पा! खरेतर या काळानेच आमच्या जीवनशैलीला आकार आणि चेहरा दिला. पण काळाबरोबर ही संस्कृतीही आता लुप्त, दिसेनाशी होऊ लागली आहे. तेव्हा या मूळ वैदिक संस्कृतीचेच दर्शन पुण्याच्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील वैदिक संशोधन मंडळाने एक संग्रहालय स्थापून घडवले आहे. यज्ञ, त्यांचे प्रकार, रचना, निर्मिती, त्यासाठीचे साहित्य, साधने, उपकरणे, इथपासून ते वैदिक वाङ्मयापर्यंत अशा अनेक गोष्टींचे दर्शन या संग्रहालयातून घडते.



**सिताफळाच्या आकाराची अत्तराची कूपी- तेर**

सिंधु संस्कृती ही अशीच प्राचीन ! तिच्याविषयी साऱ्यांनीच पाठ्यपुस्तकापासून वाचलेले आहे. तेव्हा या अशा हरवलेल्या, जमिनीखाली गाडल्या गेलेल्या जगाचा -संस्कृतीचा शोध घेण्याचे काम पुण्याची 'डेक्कन कॉलेज' ही संस्था करते. या उत्खननामधून आजवर सापडलेल्या जगाचे दर्शन त्यांनी त्यांच्या पुरातत्वविद्या संग्रहालयात घडवले आहे. अगदी अश्मयुगीन हत्यारांपासून महाराष्ट्राचा आद्य राजवंश सातवाहनांच्या काळात वापरली जाणारी माती-धातुची भांडी, नाणी, दागिने, हत्यारे या साऱ्यांचा तपशील या संग्रहालयातून मिळतो.

उस्मानाबाद शहराजवळचे तेर येथील रामलिंगप्पा खंडप्पा लामतुरे संग्रहालयदेखील असेच, सातवाहनांच्या काळात घेऊन जाणारे ! मूळ तेर हे गाव त्याकाळी तगर या नावाने भरभराटीला आलेले शहर होते. पुढे काळाच्या ओघात या नगरीचे आणि इथल्या संस्कृतीचे अध:पतन झाले आणि त्याची पांढरीची टेकाडे बनली. या पांढरीच्या टेकाडांवरच शोध घेत लामतुरे यांनी सातवाहनकालीन

**मराठीत पहिला ज्ञानपीठ पुरस्कार वि.स. खांडेकरांना प्रदान** — **इ. स. १९७६**

**स्वत:च्याच अंगरक्षकांकडून पंतप्रधान इंदिरा गांधींची हत्या** — **इ. स. १९८४**

**कालरेषा**




**सूरसुंदरी – औरंगाबाद : सोनेरी महाल**

हजारो वस्तू जमा केल्या आणि त्यातून हे संग्रहालय उभे राहिले. सुवर्णनाणी, हस्तिदंती मूर्ती, माती–शाडूच्या कलावस्तू, शैलशिल्पं, बाहुल्या, खेळणी, दागिने, बांधकाम साहित्य, घरगुती भांडी असा हा सारा ऐवज त्या काळात घेऊन जातो. इथे दिसणाऱ्या एका हस्तीदंती बाहुलीचे संबंध थेट इटलीतील पॉम्पे नगरीशी आल्याने या संग्रहालयाचे महत्त्व तर खूपच वाढले. यामुळे आता देशोदेशीचे अभ्यासक या संग्रहालयाची वाट शोधत इथे तेरला येतात. ही बाहुली, इथली तरंगणारी वीट, लज्जागौरीच्या वैशिष्ट्यपूर्ण मूर्ती हा सारा या संग्रहालयाचा ठेवा आहे.

इतिहासाचे हेच धागेदोरे विणत सातारा, सांगली, कोल्हापूर, नगर, औरंगाबाद आणि नागपूरमध्येही काही संग्रहालये उभी राहिली. सातारा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयातून सारी 'शिवशाही'च डोकावते. मराठेशाहीतील शस्त्रे, वस्त्रे, दागिने, नाणी, गड–किल्ल्यांची छायाचित्रे, ऐतिहासिक पत्रे, दुर्मीळ चित्रे याबरोबरच या दालनात शिवरायांची जन्मकुंडली, त्यांची मुद्रा, राजगडावरचे तख्त आणि चक्क राजांच्या उजव्या हाताचा ठसाही इथे पाहण्यास मिळतो.

साताऱ्यातील औंधचे श्री भवानी संग्रहालय ही



**रामकृष्ण काव्य – नगर : वस्तुसंग्रहालय**

पंतप्रतिनिधींची निर्मिती ! त्यांनीच गोळा केलेल्या असंख्य ऐतिहासिक दुर्मीळ कलाकृती इथे पाहण्यास मिळतात.

सांगलीचे वस्तुसंग्रहालयही असेच पटवर्धन संस्थानिकांनी उभे केले आहे. इथेही शस्त्र–नाण्यांपासून ऐतिहासिक पत्रे–चित्रांपर्यंत अनेक गोष्टी पाहण्यास मिळतात.

कोल्हापुरात न्यू पॅलेस किंवा नवा राजवाडा आणि टाऊन हॉल ही दोन संग्रहालये त्यांच्याकडील संग्रहाएवढीच त्यांच्या भव्य–दिव्य वास्तूंनी भारावून टाकतात. 'न्यू पॅलेस'मध्ये मराठेशाहीची 'धाकटी पाती' करवीर संस्थानचा सारा इतिहास विविध वस्तूंमधून मांडला आहे. तर टाऊन हॉल संग्रहालयामध्ये या परिसरात मिळालेली शैलशिल्पं, शस्त्रे, शिलालेख, नाणी, उत्खननात मिळालेल्या वस्तू ठेवलेल्या आहेत. त्यातही चंद्र, सूर्य, सूरसुंदरी आणि मदनाची ती शैलशिल्पं, उत्खननामध्ये मिळालेला रोमनांचा तो समुद्रदेव पोसिडॉन, ग्रीक देवता आवर्जून पाहण्यासारख्या आहेत.

नगरचे ऐतिहासिक संग्रहालय तर अशा इतिहासभारल्या वस्तुंनी खच्चून भरलेले आहे. शिल्पं, शिलालेख, ताम्रपट, हस्तलिखिते, पोथ्या, पत्रे, सनदा, फर्माणे, नकाशे अशी ऐतिहासिक वस्तुंची इथे मोठी रेलचेल आहे. पण यातही छत्रपती संभाजी महाराजांचे ते अस्सल चित्र, अखंड हिंदुस्थानचा प्राचीन नकाशा, दोनशे फूट लांबीची जन्मपत्रिका, ज्ञानेश्वरीची मूळ हस्तलिखिते यांच्यासाठी स्वतंत्र वेळ ठेवावा लागतो. इथे असलेला

**पृथ्वी क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी** — इ. स. १९८८

**मालदीव मधील लष्करी कट भारतीय लष्कराने उधळला** — इ. स. १९८८

कालरेषा



सुवर्णगुप्ताचे नाणे
अंजनेरी : मुद्रासंग्रहालय



प्राचीन दागिने
पुणे : डेक्कन कॉलेज



गंधर्व – नाशिक
प्रादेशिक वस्तुसंग्रहालय

'रामकृष्णकाव्य' हा ग्रंथ सरळ वाचला की रामायण सांगतं तर तोच ग्रंथ उलट वाचला तर कृष्णकथा ऐकवतो.

औरंगाबादला बाळासाहेब पाटील आणि डॉ. शांतीलाल पुरवार या दोन विभुतींनी त्यांचे आयुष्य पणाला लावून अनुक्रमे पैठण आणि औरंगाबाद शहरात संग्रहालये उभी केली आहेत. या दोन्ही विलक्षण संग्रहालयांमध्ये सातवाहन ते अगदी कालच्या ब्रिटिश राजवटीपर्यंतच्या अनेक दुर्मिळ वस्तू, कलाकृती थक्क करून सोडतात. याशिवाय औरंगाबाद शहरात विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे आणि शासनाचे सोनेरी महाल या अन्य दोन संग्रहालयांनीदेखील त्या-त्या भागाच्या ऐतिहासिक ठेव्याचे जतन केले आहे.

वरील संग्रहालयांशिवाय मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज, नेहरु सेंटर, पुण्यातील इतिहास संशोधक मंडळ, डेक्कन कॉलेज, विश्रामबाग वाडा, पर्वतीवरील देवदेवेश्वर संस्थान, नाशिकमध्ये शासकीय आणि सार्वजनिक वाचनालय, धुळ्यात राजवाडे संशोधन मंदिर, नागपूरला पुन्हा शासकीय संग्रहालयांमधून त्या-त्या भागातील इतिहासाच्या अंतरंगाचे दर्शन घडते. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय म्हणजे पूर्वीचे 'प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ! महाराष्ट्रात सुरू झालेले हे पहिले संग्रहालय. इथे फक्त महाराष्ट्रातीलच नव्हे तर साऱ्या भारतभरातील इतिहासाच्या ठेव्याचे जतन केलेले आहे. यामध्ये छत्रपती शिवरायांचे एक समकालीन अस्सल चित्र आणि त्यांचा तो दुर्मिळ सुवर्णहोनही पाहाण्यास मिळतो.

मुंबईतील रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे नाण्यांवरचे संग्रहालय, नाशिकच्या अंजनेरीचे मुद्रा संग्रहालय, नाशिक – पाथर्डीचे तोफखाना संग्रहालय, नगरचे रणगाडा संग्रहालय आणि अक्कलकोटचे शस्त्रागार ही एखाद्याच विषयाला वाहिलेली दालनेदेखील आम्हाला इतिहासात घेऊन जातात.

'इतिहास' हा जरी भूतकाळ असला तरी तोदेखील भूगोलाप्रमाणे पाहायचा, अनुभवायचा असतो. यामध्ये संग्रहालये मोठी कामगिरी बजावतात. एखादे पुस्तक वाचून जो इतिहास समजणार नाही तो संग्रहालयातील एखादे नाणे, शस्त्र पाहिल्यावर समजतो. अशा या संग्रहालयांमधून महाराष्ट्राचे, आपल्या देशाचेच संदर्भ कळतात असे नाही तर अनेकदा मानवजातीच्या जीवनाचेच दर्शन घडते, प्रगतीचे टप्पे कळतात, उत्क्रांतीच्या पाऊलखुणा सापडतात. या संग्रहालयांना समाजशिक्षित करणाऱ्या शाळा म्हटले जाते ते उगीचच नाही !

**अभिजित बेल्हेकर**
फ्लॅट नं. २, बी-८, सरितावैभव सोसा.,
पु. ल. देशपांडे उद्यानासमोर, सिंहगड रस्ता, पुणे - ३०
abhibelhekar@gmail.com

परम महासंगणकाची निर्मिती — इ. स. १९९०
पंतप्रधान राजीव गांधींची तमीळ दहशतवाद्यांकडून हत्या — इ. स. १९९१
कालरेषा

# युद्धांचे प्रकार... त्यांचे अर्थ



१८५७ चे स्वातंत्र्य समर



भारत–पाक युद्ध



हिटलरची नाझी सेना



नागासाकीवर अणुबाँब

**१. छापा –** पूर्वी आपलाच असणारा पण आता शत्रूने काबीज केलेल्या भागावर तो भाग पुन्हा मिळवण्यासाठी केलेले युद्ध म्हणजे छापा. उदा. शाहिस्तेखानाचा मुक्काम असणाऱ्या लाल महालावर शिवाजी राजांनी टाकलेला छापा.

**२. हल्ला –** आक्रमक शत्रुशी संधी मिळताच केलेले युद्ध. बऱ्याच वेळा या प्रकारच्या युद्धात शत्रुला बेसावध गाठून त्याच्यावर हल्ला केला जातो. उदा. अफजलखान वधाच्याप्रसंगी झाडाआड लपलेल्या मावळ्यांनी खानाच्या सैन्यावर केलेला हल्ला.

**३. आक्रमण –** दुसऱ्याच्या प्रांतावर तो भूभाग आपल्या भूभागास जोडण्यासाठी केलेले युद्ध म्हणजे आक्रमण. उदा. बाबराने १५२६ मध्ये भारतावर केलेले आक्रमण.

**४. चढाई –** शत्रुने आपल्यावर आक्रमण करण्याआधीच स्वसंरक्षणासाठी आपणच त्याच्यावर आक्रमण करणे. उदा. शिवाजी राजांनी जावळीच्या मोऱ्यांवर केलेली चढाई.

**५. चकमक –** दोन राष्ट्रांच्या सीमेवर होणारी किरकोळ भांडणे.

**६. बंड –** ज्या गटाविरुद्ध युद्ध केले जाते तो गट बेकायदेशीर नसतो. असंतुष्ट सरदार वा पुत्र आपल्याच राज्यकर्त्यांविरुद्ध राजगादी मिळवण्यासाठी अशा प्रकारची बंड करतात. उदा. अकबराच्या मुलाने सलीमने अकबराविरुद्ध केलेले बंड.

**७. यादवी –** एकाच राष्ट्रातील दोन गटात झालेल्या युद्धाला यादवी असे म्हणतात. यादवीमधील दोन्ही गट कायदेशीरच असतात. उदा. अमेरिकेतील यादवी युद्ध

**८. क्रांती –** आपल्याच राज्यातील शासन व्यवस्थेत आपल्याला हवा तसा उत्तम बदल घडवून आणण्यासाठी केलेले युद्ध म्हणजे क्रांती. उदा. फ्रेंच राज्यक्रांती, रशियन राज्यक्रांती.

**९. उठाव –** ज्याच्याविरुद्ध उठाव केलेला असतो तो त्या राष्ट्राचा किंवा राष्ट्रातील नसतो. बलवान आक्रमकाला हुसकवून लावण्यासाठी केलेले नियोजनबद्ध युद्ध म्हणजे उठाव. उदा. इंग्रजांना हुसकावून लावण्यासाठी भारतीयांनी केलेला १८५७ चा उठाव.

**१०. युद्ध –**दोन राष्ट्रातील लढाई. उदा. भारत– पाकिस्तान युद्ध (१९६५).

**११. महायुद्ध –** बहुतांश जगच जेव्हा युद्धात ओढले जाते त्याला महायुद्ध असे म्हणतात. आधुनिक काळात दोनच महायुद्धे झाली आहेत. पहिले महायुद्ध (१९१५ ते १८) तर दुसरे महायुद्ध (१९३५ ते ४५).

**१२. शीतयुद्ध –** यामध्ये दोन्ही गट एकमेकांवर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी आपापल्या गटात अधिकाधिक राष्ट्रे ओढण्याचा प्रयत्न करतात. एखाद्या महत्त्वाच्या प्रश्नावर सतत वातावरण तापते ठेवून एकमेकांची नाकेबंदी करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या एकूण खेळामुळे जगात युद्ध होते की काय अशी परिस्थिती निर्माण होते; पण प्रत्यक्षात युद्ध होत नाही.

– **नीलिमा वैशंपायन,** फ्लॅट क्र. ३, प्रसून पार्क, माणिक वसाहत, तानाजीनगर, चिंचवड, पुणे –३३

**अमेरिकन पेटंटला आव्हान देऊन हळदीचे पेटंट परत मिळवले** — **इ. स. १९९७**

**पाच अणुचाचण्या घेऊन भारत अण्वस्त्रसज्ज** — **इ. स. १९९८**

**कालरेषा**

कर्मयोगिनी
भगिनी निवेदिता
लेखांक - ७



# निवेदितांच्या कार्याचा वाढता व्याप

**डॉ. सुरुचि पांडे**

१८९९ सालचा काळ. रामकृष्ण मठ आता एका संघटनेच्या रूपात स्थिरस्थावर झाला होता. स्वामी विवेकानंद आणि त्यांचे गुरुबंधू नवीन येणाऱ्या तरुण लोकांना प्रशिक्षण देत होते. काम आणि साधना या दोन्ही पैलूंवर सारखाच भर देण्यात येत होता. संन्यासी बांधवांनी विनंती केल्यामुळे निवेदिता वनस्पतिशास्त्र, चित्रकला, शरीरशास्त्र अशा विषयांवर तास घेत. बलराम बसू यांच्या घरी होणाऱ्या बैठकांमध्ये, ब्राह्मो समाजामध्ये त्या व्याख्याने देत. त्यांच्या व्याख्यानांना सुशिक्षित बंगाली महिला उपस्थित राहत. १३ फेब्रुवारी रोजी अल्बर्ट हॉलमध्ये एका सभेत 'काली' या विषयावर त्या बोलल्या. त्या काळात एक इंग्रज बाई कालीवर बोलणार तरी काय, अशा उत्सुकतेनं आलेल्या श्रोत्यांनी सभागृह तुडुंब भरून गेलं होतं. श्रोत्यांना त्यांचे विचार खूप आवडले.

आपल्या व्याख्यानात 'काली' हे प्रतीक स्पष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. काली म्हणजे आदिमाया. विश्वातली क्रिया करणारी शक्ती म्हणजे काली! ती कालरूपी आहे म्हणून काली. माणसाच्या ठिकाणी असलेले दुर्गुण ती नष्ट करते. कालीचे संहारक रूप अनेकांना ठाऊक असते; पण संहारात नव्या अंकुरांची निर्मिती दडलेली असते. ती विश्वाची आई असते. अशाप्रकारे कालीचे प्रतीक निवेदितांनी आपल्या व्यख्यानात मांडले. रामप्रसाद (इ.स. १७१२ - १७७५) नावाच्या कवीनं कालीवर अतिशय सुंदर भक्तिरचना लिहिल्या, त्यांच्याबद्दल निवेदिता भावुकतेनं बोलल्या. रामप्रसाद या संतकवीनं कालीमातेचं गुणकीर्तन करताना देह ठेवला. त्यांच्या एका भक्तिगीतात ते म्हणतात,

'एमॉन दिन की होबे तारा, जबे तारा तारा तारा बोले ।
तारा बोये पोडबे धारा ।।...'

'हे तारामाते, असा दिवस कधी उजाडेल का, की 'तारा' 'तारा' अशी व्याकूळ हाक मारताना डोळ्यांतून आसवं ओघळतील...'

ज्या दुसऱ्या संतांबद्दल निवेदिता बोलल्या, ते होते दक्षिणेश्वरचे रामकृष्ण परमहंस. स्वामी विवेकानंदांचे गुरू. त्यांच्या मुखात नेहमी रामप्रसादांची गीतं असायची.

निवेदिता कालीवर बोलल्या तेव्हा काही सुधारकांनी 'जुन्या प्रथांचीच भलावण करता आहात,' म्हणून त्यांच्यावर टीका केली. तर काही जणांनी निवेदितांच्या स्पष्ट विचारांचं, हिंदू प्रतीकं समजून घेण्याच्या प्रयत्नांचं कौतुक केलं. या भाषणानंतर दोन-तीन दिवसांनी कालीघाट मंदिराच्या व्यवस्थापकांनी निवेदितांना व्याख्यानाचं निमंत्रण दिलं. सामाजिक दृष्टीनं हे निमंत्रण फार महत्त्वाचं होतं. कारण कालीघाट हे देवस्थान सतीचं म्हणजे पार्वतीचं एक शक्तिपीठ मानलं जातं. तिथं कर्मठ उपासना चालते. देशी-परदेशी, जातीचे-परजातीचे असा भेद मिटवण्याच्या कार्याच्या दृष्टीनं हे निमंत्रण खरोखरीच सुधारक पाऊल होतं. बंगाली लोक मनापासून निवेदितांना स्वीकारू लागले होते, याची खूण पटवणारी ही घटना होती. २८ मे रोजी हे व्याख्यान झालं. त्यांचं व्याख्यान ऐकायला सुमारे तीन हजार श्रोते उपस्थित होते. निवेदिता कालीच्या चिंतनात पूर्णपणे बुडून गेल्या होत्या. आईच्या प्रेमात, सौंदर्यपूर्ण निसर्गाच्या रूपात तसंच निसर्गाच्या कडाडणाऱ्या, रौद्र रूपात काली असते, हे त्यांना जाणवू लागले. स्वामी विवेकानंदांनी निवेदितांच्या व्याख्यानाचे कौतुक केले.

कोलकत्यात दोन वेळा प्लेगची साथ आली होती. तेव्हा निवेदितांनी आपल्या संन्यासी बांधवांच्या बरोबरीनं मदतकार्यात काम केलं. निवेदितांनी स्वत:चा आहार कमी करून पैसे वाचवले आणि या कार्यात खर्च केले. स्वच्छतेबाबत माहिती देत त्या गल्लोगल्ली फिरल्या. वेळप्रसंगी रस्ता झाडायलाही त्या उभ्या राहिल्या. अनेकदा

कारगिलच्या डोंगराळ युद्धभूमीवर पाकिस्तानचा पराभव — इ. स. १९९९
भारताचे पहिले चांद्रयान अवकाशात झेपावले — इ. स. २००८
कालरेषा

त्यांचा आहार फक्त दूध व फळे एवढाच असे. पूर्णपणे त्यागी असे जीवन त्या जगत होत्या.

सामाजिक कार्यात जरी त्या व्यग्र असल्या तरी त्यांच्यात लपलेल्या आध्यात्मिक साधिकेचा सूर हरवलेला नव्हता. स्वामी विवेकानंद त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करत होते. परंतु स्वामीजींच्यातील एक महत्त्वाचा गुण म्हणजे त्यांनी कधी कोणाच्या व्यक्तिमत्त्वाची कुचंबणा होऊ दिली नाही. दुसऱ्यांचा विकास खुंटेल अशी बंधनं ते घालत नसत. निवेदितांना फार मोलाचा उपदेश त्यांनी केला होता, 'तुमच्या स्वत:च्या कल्पना निश्चित करा; पण त्यात जेवढे विश्वव्यापित्व आणता येणे शक्य असेल तेवढे आणा. मात्र अशा तऱ्हेचे जीवन जगण्यासाठी अर्धा डझन लोकही एका वेळी पुढे येतील असे मानू नका. तुमच्या निष्ठेत पंथांना वाव द्या; पण पंथोपपंथांच्या पलीकडे जाण्याचीही तयारी असली पाहिजे. अधिकार आणि स्वातंत्र्य यांचा सुंदर मेळ घालण्यातच आपले खरे कौशल्य आहे...' स्वामी विवेकानंदांना कामचलाऊ, वेळ मारून नेणाऱ्या सुधारणा नको होत्या. माणूस अंतरंगातून घडायला लागला की त्याच्या वागणुकीत उदात्तता आपोआप येऊ लागते. अशी माणसं तयार करण्यात स्वामीजींना रस होता. तशा शिक्षणाला ते 'मानुष कोरा बिद्या' (माणूस घडविणारी विद्या) असे म्हणत.

निवेदितांच्या अंगीही अपार सहनशीलता होती. त्यांनी कधीही त्यांच्या वागण्यात अट्टाहास आणला नाही. कारण सुधारणेच्या गोष्टी वास्तवात आणण्याआधी त्यांना स्वत:ला हिंदू समाजाशी मनापासून एकरूप व्हायचं होतं. दक्षिणेश्वरच्या भवतारिणी कालीच्या दर्शनासाठी त्या गेल्या तर बाहेरच्या दारापाशी उभ्या राहत; कुणाला समस्या निर्माण व्हायला नको म्हणून कुठल्याही वस्तूला त्या शिवत नसत; हिंदू परंपरांविषयी त्या कधीही अनादर दाखवत नसत.


निवेदितांच्या शाळेची लोकप्रियता कोलकत्यात वाढू लागली होती. परंतु आर्थिक चणचण तर होतीच. शाळा चालवायची म्हणजे कायमस्वरूपी निधी आणि नियमित उत्पन्न यांची गरज होती. त्यामुळे युरोप-अमेरिकेत व्याख्यानांचा दौरा काढून शाळेसाठी निधी उभा करता येईल, असा विचार स्वामीजींनी त्यांच्यापुढे मांडला. त्यामुळे कोलकता सोडण्याची फारशी इच्छा नसतानाही निवेदिता, स्वामी विवेकानंद आणि स्वामी तुरीयानंद यांच्यासह लंडनला जायला निघाल्या. ३१ जुलै १८९९ रोजी ते लंडनला पोहोचले. पुढे भारतातील स्त्रियांच्या कार्यासाठी पैसा उभा करणे आणि अमेरिकेतील जनतेपुढे भारतीय स्त्री-जीवनाचे आदर्श मांडणे ही दोन कामे त्यांच्यासमोर होती. या कामात त्यांना कडू-गोड अनुभवांना सामोरे जावे लागणार होते. धर्मवेड्या ख्रिस्ती माणसांशी गाठ पडणार होती. तसंच एका प्रतिभावान भारतीय वैज्ञानिकाचा झालेला अवमान पाहून त्यांच्या मनात वेगळ्या विचाराची ठिणगीही पडणार होती.

(क्रमश:)

**डॉ. सुरुचि पांडे**
सी/९, भोसले पार्क, सहकारनगर क्र. २, पुणे 411009
suruchipande@gmail.com

## झलक लिपींची...

## 'भारत इतिहास संशोधक मंडळ २०१०' हे शब्द वाचूया अनुक्रमे मोडी व फारसी लिपींतून



हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ११ वैशाख, शके १९३३, १ मे २०११ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे २ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३० येथून प्रसिद्ध केले.

कै. दिनेश बळवंत बापट स्मरणार्थ। **श्री. बळवंत गंगाधर बापट, अंधेरी**



संजीवनमाची – राजगड, महाराजांची पहिली राजधानी, गडबांधणीचा उत्कृष्ट नमुना, दुहेरी चिलखती तटबंदी

सौर वैशाख, शके १९३३/ मे २०११, पंजीकृत नियतकालिक (Registered Newspaper)
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR/2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001)
L-2/RNP/PNW/M/94/2009-2011, **Posted at S.P. Post Office On 1st of Every Month.**
तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्रमांक License to post without prepayment of postage LWP No. L-172

## शतकातुनि...

शतकातुनि द्रष्ट्यांचे स्वर निनादती
'अग्रेसर हिंदुराष्ट्र हिंदुसंस्कृती'
असे स्वर निनादती ।। ध्रु. ।।

इतिहासा ज्ञात असे शौर्य येथले
यज्ञाग्नी सर्वप्रथम येथ चेतले
देशास्तव प्रथम दिल्या इथुनि आहुती ।। १ ।।

परदास्ये होते जधि राष्ट्र घेरले
संतांनी सद्विचार येथ पेरले
स्वत्वाची ठेवियली ज्योत जागती ।। २ ।।

स्वातंत्र्यास्तव कितीक अथक झुंजले
फाशीचे दोर कुणी हसत चुंबिले
रक्ताला चेतविती प्रखर त्या स्मृती ।। ३ ।।

वाढतसे ज्ञान इथे खडक फोडुनी
साकळल्या रूढींचे बंध तोडुनी
प्रतिभेला नित्य नव्या लाभती मिती ।। ४ ।।

ध्यासांचे ज्वालाबन आज उसळु दे
कर्तृत्वातून नवे स्वप्न उमलु दे
संगर हे आम्हि रथी अम्हिच सारथी ।। ५ ।।

**सौर दिनदर्शिका**
**शके १९३३**

| | मे २०११ | वैशाख / ज्येष्ठ |
|---|---|---|
| र. | 1 | ११ |
| सो. | 2 | १२ |
| मं. | 3 | १३ |
| बु. | 4 | १४ |
| गु. | 5 | १५ |
| शु. | 6 | १६ |
| श. | 7 | १७ |
| र. | 8 | १८ |
| सो. | 9 | १९ |
| मं. | 10 | २० |
| बु. | 11 | २१ |
| गु. | 12 | २२ |
| शु. | 13 | २३ |
| श. | 14 | २४ |
| र. | 15 | २५ |
| सो. | 16 | २६ |
| मं. | 17 | २७ |
| बु. | 18 | २८ |
| गु. | 19 | २९ |
| शु. | 20 | ३० |
| श. | 21 | ३१ |
| र. | 22 | ज्ये.१ |
| सो. | 23 | २ |
| मं. | 24 | ३ |
| बु. | 25 | ४ |
| गु. | 26 | ५ |
| शु. | 27 | ६ |
| श. | 28 | ७ |
| र. | 29 | ८ |
| सो. | 30 | ९ |
| मं. | 31 | १० |

वरील गीत 'छात्र प्रबोधन'च्या संकेतस्थळावर जरूर ऐका.

पत्त्यामध्ये वर्गणीचा कालावधी 11-8 / May 11 असल्यास तुमची वर्गणी संपली आहे. ती त्वरीत भरावी. पत्त्यामध्ये काही चुका असल्यास त्या तातडीने मुख्यकेंद्रावर कळवा.

**संपर्क पत्ता :**
संपादक, छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
ई-मेल : jpchhatra@rediffmail.com
संकेतस्थळ : www.chhatraprabodhan.org

**या अंकाची किंमत : ₹ २०/-**
**वार्षिक वर्गणी : ₹ १८०/-**
**प्रकाशन दिनांक :**
सौर ११ वैशाख, शके १९३३
१ मे २०११

**प्रिय पोस्टमन,**

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति -